# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय


■ अमरावती, ■ शनिवार ३० मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## चालू आर्थिक वर्षात जीडीपी राहणार ६.९ टक्के : आरबीआय



मुंबई : पश्चिम आशियातील संघर्षामुळे विस्कळीत झालेला व्यापार, कच्च्या तेलाच्या भावात झालेली वाढ, यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) ६.९ टक्क्यांवर येईल, असा अंदाज भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शुक्रवारी वर्तवला.

आर्थिक वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाची (जीडीपी) वाढ ७.६ टक्के राहण्याचा अंदाज आहे. ही वाढ मागील वर्षातील ७.१ टक्क्यांच्या तुलनेत अधिक आहे. ा

ागणीच्या बाजूने पाहता, खासगी अंतिम उपभोग खर्च आणि स्थिर गुंतवणूक यामुळे जीडीपीत वाढ झाली आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्कांमुळे (टॅरिफ) सुरुवातीला काही चिंता निर्माण झाली होती. मात्र, अमेरिकेला होणारी निव्वळ निर्यात केवळ ०.१ टक्क्याने घटली आहे. सेवा क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे जीडीपीला हातभार लागला.

**वित्तीय तूट नियंत्रणात**

केंद्र सरकारने २०२५-२६ पर्यंत सकल वित्तीय तूट (जीएफडी) सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ४.५ टक्क्यांपेक्षा खाली आणण्याचे उद्दिष्ट साध्य केले आहे. महसुली खर्चावर ठेवलेले नियंत्रण आणि प्रामुख्याने प्रत्यक्ष कर व करेतर महसुलातून मिळालेल्या वाढीव महसुली प्राप्तीमुळे, २०२५-२६ वित्तीय तूट जीडीपीच्या ४.४ टक्के इतकी राहिली.

# हडपसरमध्ये विषारी दारुने ६ जणांचा मृत्यू

**हडपसर पुणे/प्रतिनिधी ::** येथील पांढरे मळा येथे विषारी दारूमुळे सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मृत व्यक्तींनी परिसरातील दोन बेकायदेशीर दारूच्या अड्ड्यावर जाऊन दारू सेवन केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दारू प्यायल्यानंतर संबंधितांना पोटदुखी, मळमळ आणि प्रकृती बिघडल्याचा त्रास सुरू झाला. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान सर्वांचा मृत्यू झाला.



या मध्ये यशवंत रघुनाथ पवार (वय ६२)रा. पांढरे मळा हे बिगारी काम करत असून सर्वात पहिला बळी यांचा गेला आहे. मात्र त्यांना दारुमुळे त्रास होतो हे समजले नसल्याने आणि हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याआधीच त्यांचा मृत्यू झाल्याने तू कशाने झाला हे समजले नव्हते. अशोक रमेश चव्हाण( वय ५२ वर्षे) रा. सर्वे नंबर ३११/ २७ लेन नंबर १५ ससाणे नगर, राहुल शरद क्षीरसागर (वय ४५ वर्षे) रा.पांढरे मळा सर्वे नंबर २५७ हडपसर, विजय भूकुरलाल शर्मा (वय ४५ वर्षे) रा. पांढरे ☞(पान २ वर)

## हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगलेसह तिघे निलंबित

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्रकरणामुळे निर्माण झालेल्या खळबळीनंतर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मोठी कारवाई केली आहे. हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले यांच्यासह हडपसर चौकी प्रमुख आणि गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्रकरणामुळे निर्माण झालेल्या खळबळीनंतर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मोठी कारवाई केली आहे. हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले यांच्यासह हडपसर चौकी प्रमुख आणि गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

२१ मे २०२६ रोजी हडपसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गावठी/विषारी दारू पिऊन अनेकांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. या प्रकरणात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित भागात अवैध दारू निर्मिती आणि विक्री सुरू असल्याची माहिती असूनही पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

आदेशात नमूद केल्याप्रमाणे, या घटनेमुळे पोलिसांची प्रतिमा जनमानसात मलिन झाली असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आणि☞(पान २ वर)

## शेतजमिनीच्या वादातून सहा जणांचा खून

### महाराष्ट्राच्या सीमेजवळील भयकंर घटना, परिसरात खळबळ!



**विजापूरी/वृत्तसंस्था-** : प्राथमिक माहितीनुसार, गोविंदपूर गावात निराळे आणि गुळगी (गोलगी) कुटुंबांमध्ये अनेक दिवसांपासून जमिनीच्या वादावरून संघर्ष सुरू होता. या जुन्या वैमनस्यातूनच हा रक्तरंजित हल्ला झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. माहितीनुसार, अज्ञात हल्लेखोरांनी गावात येऊन थेट गोळीबार केला. या थरारक हल्ल्यात सहाजणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये रेवणसिद्धप्पा निराळे, दुंडप्पा रेवणसिद्धप्पा निराळे, शिवपुत्र रेवणसिद्धप्पा निराळे, चंद्रशेखर निराळे, शब्बीर अत्तार यांच्यासह आणखी एका व्यक्तीचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेनंतर गावात तणावपूर्ण शांतता असून, सीमाभागातील नागरिकांमध्ये मोठी भीती पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचा मोठा फौजफाटा गावात दाखल झाला असून, परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

या दुहेरी नव्हे तर सामूहिक हत्याकांडामुळे विजापूर जिल्हा हादरला असून, भिमातीर परिसरात पुन्हा एकदा रक्तपाताची ☞(पान २ वर)

## 'सीसीआय'चे माजी प्रमुख धनेंद्र कुमार यांचा आगीत मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** : येत्या ६ जून रोजी असणारा ८० वा वाढदिवस आणि त्यानिमित्ताने ३० मे रोजी होणाऱ्या कौटुंबीक सोहळ्याची तयारी सुरू असतानाच, भारतीय स्पर्धा आयोगाचे (सीसीआय) पहिले अध्यक्ष आणि माजी सनदी अधिकारी धनेंद्र कुमार यांचे दक्षिण दिल्लीतील राहत्या घराला लागलेल्या भीषण आगीत निधन झाले.



या दुर्दैवी घटनेत, वडिलांच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनसाठी खास लंडनहून भारतात आलेला त्यांचा मुलगाही गंभीररित्या होरपळला असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. हरियाणा कॅडरचे १९६८ च्या बॅचचे निवृत्त आयएएस अधिकारी असलेले धनेंद्र कुमार यांनी जागतिक बँकेत (वर्ल्ड बँक) भारताचे प्रतिनिधित्व करताना कार्यकारी संचालक म्हणूनही काम पाहिले होते. बुधवार रात्री उशिरा दक्षिण दिल्लीतील हौझ खास एन्क्लेव्ह येथील त्यांच्या घराला अचानक आग लागली. या आगीच्या प्रचंड धुरामुळे श्वास गुदमरल्याने धनेंद्र कुमार यांचा मृत्यू झाला.

## पोलिस कर्मचा-यालाच चोरट्यांनी लूटले

### शिताफीने चार लाख रूपये लंपास

**भूम** : भूम शहरात अत्यंत शिताफीने घडवून आणलेल्या चोरीच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. वाशी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी अर्जुन सुंदरराव मार्कड (रा. सोनगिरी) यांच्याकडील चार लाख रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. विशेष म्हणजे, ही घटना भरदिवसा घडल्याने पोलिस प्रशासनासमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन मार्कड यांनी भारतीय स्टेट बँकेत सोनं तारण ठेवून चार लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ही रक्कम घेऊन ते पत्नीसमवेत दुचाकीवरून जात असताना




अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या दुचाकीला पंक्चर केले. त्यानंतर पुढे एका ठिकाणी त्यांच्या पत्नीच्या अंगावर अज्ञात पदार्थ अथवा औषध फवारण्यात आल्याने त्यांना तीव्र खाज सुटू लागली.

या प्रकारामुळे घाबरलेल्या मार्कड दाम्पत्याने तत्काळ भूम ग्रामीण रुग्णालय गाठले. उपचारासाठी रुग्णालयात गेल्यानंतर त्यांनी दुचाकी (एमएच ३३ ई २०५७) बाहेर उभी केली होती. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी अवघ्या पंधरा मिनिटांत दुचाकीच्या डिक्कीचे लॉक प्रथम चावीने उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र लॉक न उघडल्याने स्क्रू ड्रायव्हरच्या सहाय्याने डिक्की फोडून त्यामधील चार लाख रुपयांची रोकड चोरून नेली.

ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. भूम पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक संजय जराड यांनी ग्रामीण रुग्णालय परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून पुढील तपास सुरू केला आहे.

## पोहण्यासाठी गेलेल्या बाप-लेकाचा विहिरीत बुडून मृत्यू

**यवतमाळ/प्रतिनिधी : :** पोहण्यासाठी गेलेल्या बाप-लेकाचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. घाटंजी तालुक्यातील रामनगर तांडा (घोटी) येथे गुरुवारी दि. २८ मे रोजी दुपारी ही हृदयद्रावक घटना घडली. या दुर्घटनेत सचिन प्रेमसिंग जाधव (वय ३७) व त्यांचा मोठा मुलगा विहान सचिन जाधव (वय नऊ) यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. मृतकाचा चुलत भाऊ सुभाष जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून पारवा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास सचिन जाधव हे त्यांचा मोठा मुलगा विहान याला सोबत घेऊन गावालगत असलेल्या शोभा आडे यांच्या शेतातील विहिरीवर पोहण्यासाठी गेले होते. त्यांच्यासोबत सात वर्षांचा धाकटा मुलगा सार्थक आणि अन्य एक मुलगा होता. विहिरीवर पोहोचल्यानंतर वडील सचिन आणि मुलगा विहान दोघेही विहिरीच्या पाण्यात उतरले. काही वेळ ते पोहत होते. मात्र, अचानक दोघेही पाण्याखाली गेले आणि वर आले नाहीत अशी माहिती आहे.



घटनेवेळी विहिरीच्या काठावर उभ्या असलेल्या सार्थकने ☞(पान २ वर)

## कुस्तीपटू विनेश फोगाटला 'सर्वोच्च' दिलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** : कुस्तीपटू विनेश फोगाटला सर्वोच्च न्यायालयाने २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत (Trials) सहभागी होण्यास परवानगी दिली आहे. विनेशला चाचणीत भाग घेण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला भारतीय कुस्ती महासंघाने (इघ) सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे कुस्ती महासंघाला मोठा धक्का बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने विनेश फोगाटला तात्पुरता दिलासा दिला असला, तरी तिच्या सहभागाला आव्हान देणाऱ्या कुस्ती महासंघाच्या (WFI) याचिकेवर तिचे उत्तरही मागवले आहे.

उच्च न्यायालयाच्या निर्णयाला इघने दिले होते आव्हान



भारतीय कुस्ती महासंघाने (WFI) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली होती. तीन वेळची ऑलिम्पियन असलेल्या विनेश फोगाटने कुस्ती महासंघाच्या अधिकृत धोरणातील पात्रतेचे निकष पूर्ण केले नसतानाही, तिला चाचणीत उतरू देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला☞(पान २ वर)






## खरीप हंगामावर संकटाचे ढग! जून महिन्यात महाराष्ट्रात सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज

**मुंबई/प्रतिनिधी ::** भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी (दि.२९) नैऋत्य मान्सून २०२६ साठी दुसऱ्या टप्प्याचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला. या अंदाजानुसार महाराष्ट्रासाठी चिंताजनक चित्र समोर आले आहे. देशभरात यंदाच्या मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर २०२६) दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० ऱ पाऊस पडण्याची शक्यता असून, हे प्रमाण सामान्यपेक्षा कमी मानले जाते. महाराष्ट्र हा मुख्यतः मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्प या दोन्ही विभागांत मोडतो. या दोन्ही विभागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता घ्श्ऊ ने वर्तवली आहे – मध्य भारतात ४३ ऱ तर दक्षिण द्वीपकल्पात ४५ ऱ संभाव्यता कमी पावसाची आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश भाग हे मान्सून कोअर झोन मध्ये येतात. हाच झोन देशातील बहुतांश कोरडवाहू शेतीचा कणा आहे. IMD च्या अंदाजानुसार या झोनमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची ४३ ऱ शक्यता आहे. त्यामुळे खरीप हंगामावर



विपरित परिणाम होण्याची भीती शेतकरी वर्गात आहे.

जून २०२६ या महिन्यातही देशभरात सरासरीच्या ९२ ऱ पेक्षा कमी पाऊस राहण्याची शक्यता असून, महाराष्ट्रातही जूनमध्ये पाऊस सामान्यपेक्षा कमीच राहण्याचा अंदाज आहे.

IMD ने जून २०२६ मध्ये महाराष्ट्राच्या अनेक भागांत सामान्यपेक्षा अधिक उष्णतेच्या लाटांचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि काही अंतर्गत भागांमध्ये कमाल तापमान सामान्यपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. किमान तापमानही देशभरात सामान्यपेक्षा जास्त राहणार असल्याने रात्रीही उकाडा कमी होणार नाही.

सध्या प्रशांत महासागरावर (न्यूट्रल ) ENSO परिस्थिती असली तरी, IMD ने स्पष्ट केले आहे की मान्सून हंगामात एल निनो परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. ऐतिहासिकदृष्ट्या एल निनो ☞(पान २ वर)

# ...ती जिवंत असतांना हत्येप्रकरणी वडील व भाऊ तुरुंगात

## -महाराष्ट्र व मध्य प्रदेश पोलिसांचा असाही प्रताप

**धारणी/प्रतिनिधीः-** मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील एक खळबळजनक प्रकरणामुळे पोलिस तपास यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी धारणी तालुक्यातल्या खऱ्यातमारू गावातील एका सुनेची हत्या झाल्याचे सांगण्यात आले आणि त्या प्रकरणी तिचे वडील व भावाला तुरुंगात टाकण्यात आले होते. आता ती जिवंत परत आली आहे. या खुलाशाने पोलिस विभागात खळबळ उडाली असून, पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

हे प्रकरण मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यातील खाकनार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खडकी गावातील आहे. खडकी गावातील रहिवासी शिवानी कलमाकर एप्रिल महिन्यात अरुण नावाच्या एका तरुणासोबत अचानक गायब झाली होती. तिच्या कुटुंबीयांनी १ मे रोजी खाकनार पोलिस ठाण्यात ती हरवल्याची तक्रार दाखल केली. पोलिस महिलेचा शोध घेत असतानाच, या प्रकरणाला एक अनपेक्षित वळण लागले. सुमारे दहा दिवसांनंतर महाराष्ट्रातील जळगाव जामोद परिसरात एका अज्ञात महिलेचा धड नसलेला आणि जळालेला मृतदेह सापडला. मृतदेहाची अवस्था इतकी वाईट होती की तिची ओळख पटवणे अशक्य होते. दरम्यान, महाराष्ट्र पोलिसांना खाकनार परिसरातून एक तरुणी बेपत्ता झाल्याची माहिती मिळाली आणि सखोल तपास न करताच तो मृतदेह शिवानीचा असल्याचे गृहीत धरण्यात आले. डीएनए चाचणी किंवा [illegible] पुष्टीकरणाशिवाय पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर, घाईघाईने शिवानीचे वडील बापूराम कळमेकर आणि भाऊ अजय कळमेकर यांना खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. दोघांनाही न्यायालयात हजर करून बुलढाणा तुरुंगात पाठवण्यात आले.



अलीकडेच शिवानी पुन्हा समोर आल्यावर संपूर्ण प्रकरणाला कलाटणी मिळाली. ती अरुण नावाच्या एका तरुणासोबत आढळली आणि पोलिसांसमोर हजर होऊन तिने आपण जिवंत असल्याचे आणि आपले वडील व भाऊ पूर्णपणे निर्दोष असल्याचे स्पष्टपणे सांगितले. शिवानीने प्रशासनाकडे आपल्या कुटुंबीयांच्या तात्काळ सुटकेची मागणीही केली. खाकनार पोलिस ठाण्याचे अधिकारी अभिषेक जाधव यांनी महिला सुखरूप सापडल्याची पुष्टी केली. जळगाव जामोद पोलिसांच्या तपास प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. योग्य ओळख, वैज्ञानिक चाचण्या आणि ठोस पुराव्यांशिवाय खुनाचा गुन्हा दाखल करून निरपराध लोकांना तुरुंगात पाठवणे ही पोलिसांची एक मोठी चूक मानली जात आहे. आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, ज्या अज्ञात तरुणीचा मृतदेह सापडला होता, ती कोण होती. तिची ओळख अद्याप पटलेली नाही. दरम्यान, निरपराध वडील आणि भावाने तुरुंगात घालवलेल्या वेळेची जबाबदारी कोण घेणार, हा देखील एक मोठा मुद्दा बनला आहे. स्थानिक रहिवासी आणि सामाजिक संघटनांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, असा निष्काळजीपणा पुन्हा घडू नये यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सध्या, शिवानी सुखरूप सापडली आहे हा सर्वात मोठा दिलासा आहे, परंतु तिच्या कुटुंबाला पूर्ण न्याय कधी मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आपत्कालीन परिस्थितीसाठी विभागात २४ तास नियंत्रण कक्ष सज्ज

## नागरिकांनी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा- विभागीय आयुक्त नयना गुंडे

### मान्सूनच्या काळात नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हानिहाय संपर्क क्रमांक जारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभागामध्ये मान्सूनच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. मान्सूनच्या काळात अतिवृष्टी, पूर किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे नागरिकांना तातडीने मदत मिळावी या उद्देशाने विभागीय आयुक्त कार्यालयासह विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिय) 'आपत्कालीन नियंत्रण कक्ष' (Emergency Control Rooms) स्थापन करण्यात आले आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी मदतीसाठी प्रशासनाने जारी केलेल्या अधिकृत दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.



शासनाच्या विशेष निर्देशानुसार, हे सर्व आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ तास आणि ३६५ दिवस अविरतपणे सुरू ठेवण्यात येणार आहेत. जेणेकरून कोणत्याही क्षणी नागरिकांना तातडीची मदत, बचावकार्य आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे प्रशासनाला शक्य होईल.

नागरिकांच्या सुविधेसाठी जिल्हानिहाय संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले असून, विभागीय आयुक्त कार्यालयासाठी ०७२१-२६६१३६४ आणि अमरावती जिल्हासाठी ०७२१-२६६२०२५ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. तसेच अकोला (०७२४-२४२४४४४), यवतमाळ (०७२३२-२४०७२०), बुलढाणा (०७२६२-२४२६८३) आणि वाशिम (०७२५२-२३४२३८) येथील नियंत्रण कक्षांशी नागरिकांना संपर्क साधून आवश्यक ती मदत मिळवता येईल.

# चिखलदऱ्यात कॉफीच्या मूल्यवर्धनासाठी संशोधन

## -एमगिरी चमूचे निरीक्षण,सकारात्मक परिणामाची शक्यता

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** कॉफी उत्पादनावर कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, राज्य शासनाच्या कृषी विभागाद्वारे अभ्यास, संशोधन होणे गरजेचे असताना केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या एमगिरीच्या चमूने चिखलदऱ्याच्या स्फूर्ती क्लस्टर संस्थेने दिलेल्या प्रस्तावावर कॉफी उत्पादन आणि संशोधन प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. संस्थेचे कार्य निदेशक डॉ. आशुतोष मुरकुटे, डॉ. आदर्शकुमार अग्निहोत्री, डॉ. शितल शर्मा यांचे प्रत्यक्ष निरीक्षण सुरू झाले आहे.

चिखलदऱ्यात यापूर्वीच ६५ हेक्टर वरती उत्पादीत कॉफीतून सौंदर्यप्रसाधने तयार करण्यात आली असून स्थानिक ६० महिला बचत गटांना सदरील दहा प्रकारच्या सौंदर्यप्रसाधनांचे वाटप प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले होते. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रत्येक महिलेकडून गुगल फॉर्म भरून सौंदर्यप्रसाधनाबाबत सूचना व आवड याबाबत प्रतिक्रिया घेण्यात आल्या आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार करून कॉफी उत्पादन वाढी संदर्भात व त्यातून रोजगार निर्मिती बाबत स्फूर्ती योजनेअंतर्गत प्रकल्पहाती घेण्यात यावा अशा सूचना दिल्या आहेत.



स्थानिक वनविभाग, लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे व राजाश्रयाच्या दुर्लक्षतेमुळे महाराष्ट्रात एकमेव चिखलदार येथे उत्पादित होणाऱ्या कॉफीचे उत्पादन वाढ होत नसाल्याची खंत पर्यटक व्यक्त करीत होते. परंतु, पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती आणि कृषी विभाग, प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी , गाविलगड रेंज फॉरेस्ट ऑफिसर व उपविभागीय कार्यालय परतवाडा वनविभाग यांच्याकडे विविध प्रकारचे प्रस्ताव कॉफी उत्पादनात वाढ व्हावी करिता देण्यात आले. स्थानिकांना रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे कार्यालयाद्वारे नाविन्यपूर्ण योजनेतून मधाचे गाव आमझरी गार्डन या ठिकाणी नेचर कॅफे करिता ७७ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहेत. यालाच पूरककार्य होणे गरजेचे असल्याने स्फूर्ती क्लस्टर खादी ग्राम उद्योग आयोग यांचे द्वारे महात्मा गांधी ग्रामीण औद्योगीकरण संस्था वर्धा या स्वायत्त्य संस्थेस संचालक स्फूर्ती क्लस्टर यांनी दिलेला प्रस्ताव कॉफी उत्पादन आणि संशोधन मूल्यवर्धन यासाठी स्वीकृत करण्यात आला व त्याकरिताच चिखलदरा कॉफीवरती आरएनडी प्रकल्पास भारत सरकारच्या उपरोक्त मंत्रालयाने मंजुरी देण्यात आली असून विशेष निधी या कार्याकरिता एमगिरी वर्धा संस्थेस हस्तांतरित करण्यात आला आहे. एमगरी संस्थेच्या वन उत्पादन व मूल्यवर्धन विभागाने चिखलदराच नव्हे तर मध्य प्रदेशातील कुकरू गावाला भेट देऊन तेथील ४४ हेक्टर वरील कॉफी उत्पादनाचे स्त्रोत समजावून घेतले आहे. चिखलदऱ्यातील दुर्लक्षित कॉफीचे नमुने प्रकाश होमस्टे आमझरी गार्डन, खटकाली, मयमपूर या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संकलीत करण्यात आले आहे. चिखलदरा कॉफीला जिओ टॅग मिळवून देण्याच्या दृष्टीने कार्य सुरू केले आहे. याबाबतची माहिती प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास सिद्धार्थ शुक्ला यांना देण्यात आली. एमगिरीच्या चमूने स्थानिक शेतकरी, कॉफी विक्रेते यांची भेट घेऊन प्रतिक्रिया जाणून घेतल्या. एमगिरीच्या चमूसोबत स्फूर्ती क्लस्टरचे संचालक सुनील भालेराव होते.

# उष्माघाताने ५३ वर्षीय इसमाचा मृत्यू

**नांदगाव खंडेश्वर :** नांदगाव खंडेश्वर शहरात एक अत्यंत वेदनादायी व मन सून्न करणारी घटना घडली. अति उष्णतेमुळे स्थानिक बस स्टॉप परिसरात रिक्षाने पाणी वाहणारे असंघटित ५३ वर्षीय कामगार राजेंद्र उकंडराव श्यामसुंदर यांचा उपचारादरम्यान २७ मे रोजी मृत्यू झाला. सविस्तर वृत्त असे की, दिवसभर कडाक्याच्या उन्हात स्थानिक बस स्टॉप परिसरातील हॉटेल व्यवसायिकांना पाणी पुरविण्याचे नित्य नियमाचे काम ते करीत होते. सर्व काम आटोपून रात्री आठ वाजता जेवण केल्यानंतर फिरत असताना अचानक चक्कर आल्याने जागीच कोसळले. शेजाऱ्यांनी व परिवारातील सदस्यांनी तात्काळ दवाखान्यात हलविले. बेशुद्ध अवस्थेत अमरावती येथे नेण्यात आले. पीडीएमसीमध्ये उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली. अति उष्णतेमुळे ब्रेन स्ट्रोक झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला.

त्यांच्या जाण्याने कुटुंबावर प्रचंड दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, पत्नी, भाऊ असा परिवार आहे. स्थानिक मोक्षधाममध्ये अंत्यविधी पार पडला. अंत्यविधीला समाज बांधव, आप्त परिवार, सामाजिक कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुले शिक्षण घेत आहे. घरचा कर्ता पुरुष गेल्याने मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त करण्यात आली.

# १ व १० वरील उर्वरित

### हडपसरमध्ये विषारी दारु ने ६

मळा ससाणे नगर, अरुण डाडर, (वय ६० वर्ष )रा. पांढरे मळा ससाणे नगर, दत्तात्रेय माधवराव सूर्यवंशी (वय ५५ वर्षे) रा. श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स काळे कॉलनी जवळ ससाणे नगर यांचा मृत्यू झाला आहे.

या घटनेनंतर परिसरातील महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, पांढरे मळा परिसरात अनेक दिवसांपासून बेकायदेशीररित्या दारू विक्री सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. याबाबत वारंवार पोलिसांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पोलीस केवळ तात्पुरती कारवाई करून निघून जातात आणि काही दिवसांत पुन्हा दारूचे अड्डे सुरू होतात. असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. तसेच काही पोलिसांकडून हप्ते घेतले जात असल्याचाही गंभीर आरोप स्थानिक महिलांनी केला आहे. या निष्काळजीपणामुळे निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याचा आरोप करत संबंधित यंत्रणा आणि बेकायदेशीर दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. पुणे शहरातून बेकायदेशीर दारू विक्री पूर्णपणे बंद झाली पाहिजे. मुख्यमंत्री यांनी या गंभीर प्रकरणाकडे तातडीने लक्ष द्यावे.अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

### हडपसर पोलीस ठाण्याचे

देखरेखीत अपयश ठेवल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये : वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, चौकी प्रमुख हसीना शिकलगार, पोलीस उपनिरीक्षक हसम मुलाणी (गुन्हे शोध पथक), यांचा समावेश आहे.

मुंबई पोलीस अधिनियम कलम २५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार ही कारवाई करण्यात आली आहे. निलंबन काळात संबंधित अधिकाऱ्यांचे मुख्यालय पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर येथे राहणार असून त्यांना परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

विषारी दारू प्रकरणात आतापर्यंत अनेकांचे बळी गेल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, अवैध धंद्यांवर पोलिसांनी वेळीच कारवाई का केली नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाने या प्रकरणात कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांवर थेट निलंबनाची कारवाई केल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

### शेतजमिनीच्या वादातून सहा

पुनरावृत्ती झाल्याची चर्चा सुरू आहे. पोलिसांकडून अधिकृत माहिती आणि मृतांची संपूर्ण ओळख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

### पोहण्यासाठी गेलेल्या बाप-लेकाचा

ही बाब पाहिली. त्याने घाबरून घरी धाव घेत कुटुंबीयांना याबाबत सांगितले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. गावकऱ्यांनी आणि पोलिसांनी दोघांनाही विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना तातडीने घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. शुक्रवारी (ता. २९) रोजी मृतकांचे शवविच्छेदन करण्यात आले. बापलेकाच्या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. पारवा पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### कुस्तीपटू विनेश फोगाटला

या याचिकेत आव्हान देण्यात आले होते.

काय म्हणाले होते उच्च न्यायालय

गेल्या आठवड्यात दिल्ली उच्च न्यायालयाने निकाल देताना म्हटले होते की, 'मातृत्व हा कोणताही 'अपात्रतेचा' निकष असू शकत नाही किंवा व्यावसायिक संधी नाकारण्याचे ते कारण ठरू शकत नाही.' त्यानुसार न्यायालयाने कुस्ती महासंघाला ३० आणि ३१ मे रोजी होणाऱ्या निवड चाचणीत विनेशला सहभागी करून घेण्याचे निर्देश दिले होते.

**'तिने देशाची मान उंचावली आहे' : सर्वोच्च न्यायालय**

संबंधित व्यक्ती कोणी सामान्य असती तर परिस्थिती वेगळी असती. पण तिने (विनेशने) देशाची मान उंचावली आहे, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने केली. आज या टप्प्यावर, उच्च न्यायालयाने आदेश जारी केल्यानंतर (विनेशच्या) आशा आणि अपेक्षा वाढल्या आहेत. अशा वेळी 'आम्ही काही करू शकत नाही, त्यामुळे तू घरी परत जा' असे तिला सांगणे योग्य ठरणार नाही. हे आम्ही तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगत आहोत.'

### खरीप हंगामावर संकटाचे ढग!

वर्षामध्ये भारतात, विशेषतः मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात, पावसाची तूट अधिक जाणवते.

शेती, पाणी आणि वीजनिर्मितीवर परिणाम

घ्श्ङ ने आपल्या अहवालात नमूद केले आहे की सामान्यपेक्षा कमी पावसाचे दुष्परिणाम शेती, पाणीपुरवठा, जलविद्युत निर्मिती आणि पर्यावरण यांवर होऊ शकतात. महाराष्ट्रात आधीच पाणीटंचाईची समस्या असलेल्या मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांसाठी हा अंदाज अधिकच चिंताजनक आहे.

### अधिक मासाच्या पुण्यस्नानासाठी

सुरू केली. सुमारे दुपारी ३.१५ वाजता प्रथम रेबीनाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर गुंजन आणि अखेरीस अतुल किनकर यांचे मृतदेहही शोधण्यात यश आले. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला.

दरम्यान, रेती घाटाचा लिलाव झाल्यानंतर संबंधित एजन्सीकडून विविध घाटांची जणू हिस्सेवाटणीच करण्यात आल्याची चर्चा असून, नियमबाह्य पद्धतीने मोठ्या प्रमाणावर रेती उपसा सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रेती माफियांच्या लालसेपोटी निष्पाप जीव गेले, याला जबाबदार कोण असा प्रश्न आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

या दुर्घटनेनंतर प्रशासनाने अवैध रेती उत्खननावर कठोर कारवाई करावी, नदीपात्रातील जीवघेणे खड्डे बुजवावेत आणि मृतांच्या कुटुंबीयांना न्याय द्यावा, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

### हर्षजीत देशमुख काँग्रेसचे

उबाठा २२,शरद पवार राकंपा ११, एमआयएम १६, बसपा, समाजवादी पार्टी, वंचित बहुजन आघाडीच्या मतदारांची संख्या ३४ आहे. जर भाजपा आणि महायुती मतदारांना महाविकास आघाडीने आपल्याकडे केले तर त्यांच्याकडे २०३ मतदार होणार आहेत. यामुळे मविआचे पारडे जड होणार आहे. या निवडणुकीत आता महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये पुन्हा एकदा चांगलीच लढत पाहायला मिळणार आहे.

### बँकेचा विश्वास धुळीस

बचत गटाच्या सदस्या आपले पैसे काढण्यासाठी गेल्या, तेव्हा त्यांना खात्यात रक्कम नसल्याचे सांगण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलांनी संताप व्यक्त केला, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सुरुवातीच्या चौकशीत महिला बचत गटांच्या खात्यांमधून सुमारे ३३ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे समोर आले आहे. मिनी बँक संचालकाने ग्राहकांच्या रकमेचा स्वतःच्या मौजमजेसाठी वापर केल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत आहे. अद्याप अनेक खातेदारांच्या तक्रारी येणे बाकी असून, हा घोटाळ्याचा आकडा ३३ लाखांच्या पुढे जाण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.या घटनेनंतर दोन दिवस तणावाचे वातावरण होते. अखेर तिसऱ्या दिवशी संबंधित मिनी बँक चालवणाऱ्या पीएसपी कंपनीने या ठगबाजावर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अंजनगाव सुर्जी शाखेचे व्यवस्थापक राहुल वाठोळकर यांनी या प्रकरणाला दुजोरा दिला आहे. राष्ट्रीयकृत बँकेचा अधिकृत लोगो पाहून डोळे झाकून विश्वास ठेवणाऱ्या सर्वसामान्य खातेदारांचे धाबे दणाणले आहेत. आपल्या कष्टाची पुंजी सुरक्षित नसल्याचे पाहून मुऱ्हा देवी परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आता या प्रकरणात पोलीस प्रशासन काय कारवाई करते आणि पीडित महिलांना त्यांचे पैसे परत मिळतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### श्वानाला वाचवण्यासाठी उतरलेला

त्यांना बाहेर पडणे कठीण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन केंद्रप्रमुख सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली फायरमॅन हर्षद दहातोंडे, निलेश काटपेलवार, प्रणित पेठे, मो. फरहान व इतर जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. विहिरीत विषारी वायूचा धोका असतानाही, जवानांनी अत्यंत शिताफीने आणि धाडसाने 'रोप शिडी'च्या (दोरखंडाची शिडी) साहाय्याने विहिरीत प्रवेश केला.काही वेळातच जवानांनी युवराज परतानी आणि त्याचा श्वान 'शकूर' या दोघांनाही कोणतीही दुखापत होऊ न देता अत्यंत सुखरूपपणे बाहेर काढले. अग्निशमन विभागाच्या समयसूचकतेमुळे आणि तत्परतेमुळे एका तरुणाचा आणि मुक्या प्राण्याचा अमूल्य जीव वाचला. दोघेही सुखरूप बाहेर आल्यानंतर परतानी कुटुंबाने सुटकेचा निःश्वास सोडला आणि अग्निशमन दलाच्या सर्व जवानांचे मनःपूर्वक आभार मानले. परिसरात जवानांच्या या धाडसी कामगिरीचे कौतुक होत आहे.

### माजी सैनिकाच्या पत्नीने

वातावरण तापू लागले होते. यावेळी माजी सैनिकांनी आम्ही देश सेवा केली दुरवर राहून आम्ही देशाचे रक्षण केले. त्याचे आम्हाला आमची घरे पडून फळ मिळाले असा सवाल सुद्धा यावेळी उपस्थित करण्यात आला. काही वेळ चर्चा झाल्यावर यानंतर उर्वरित आमची घरे पाडण्यात येऊ नये असे लेखी आश्वासन देई पर्यंत आम्ही मुख्याधिकारी यांचे दालन सोडणार नाही अशी भूमिका माजी सैनिकांनी घेतली होती.

त्यांना मुख्याधिकारी यांनी सैनिक कॉलनी येथिल अतिक्रमण धारक माजी सैनिकांचे घराचे नुकसान होणार नाही याची पूर्ण खबरदारी घेण्यात येईल असे लेखी आश्वासन माजी सैनिकांना दिले. मुख्याधिकारी यांच्या दालनात चर्चेदरम्यान एका माजी सैनिकाच्या पत्नीने आपली व्यथा मांडत माझ्या पतीने मुलाबाळांना सोडून अनेक वर्ष देश सेवा देत देशाचे रक्षण केले. आता तुम्ही आमचे घर पाडत आहे असे म्हणत त्यांना डोळ्यात अश्रू अनावर झाले होते.

### घनकचरा डेपो परिसरात

मृत अवस्थेत आढळून आले. मृत्यू उष्माघातामुळे झाला की यामागे अन्य काही कारण अथवा घातपात आहे का, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा व पुढील तपासाची कारवाई सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

### पत्रकार कॉलनीत बिबट्या

अमरावतीत आला होता आणि पत्रकार कॉलनीतील विधी अधिकारी बोहरा यांच्या घरासमोर हा बिबट्या आढळला , सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाल्याची आवई उठवण्यात आली होती. वास्तविक परिसरात असा बिबट्या नसल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. वन विभागाने अशा अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन केले आहे. विशेष म्हणजे सोशल मीडियावर अशा प्रकारच्या अफवा पसरण्याची स्पर्धा सुरू झाली आहे आणि या आधारित खोटे छायाचित्र देखील अवफेला बळ देण्यासाठी वापरल्या जातात. पोलीस प्रशासनाकडून अशा लोकांवर कारवाईची मागणी होत आहे.

### अभ्यासासाठी वडील रागावल्याने

झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात गुन्हे प्रकटीकरण पथकाने तातडीने शोधमोहीम सुरू केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, ती मुलगी एकटीच रेल्वेच्या जनरल बोगीतून प्रवास करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. मुलीच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाल्याने पोलिसांनी रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधला आणि तांत्रिक तपासाच्या आधारे तिचा माग काढला. पीएसआय गणेश राऊत यांच्यासह पोलीस कर्मचारी राजिक खान, निलेश साविकर, शोएबउद्दीन सय्यद आणि वैभव तिखीले यांच्या पथकाने अवघ्या ३ तासांच्या आत रात्रीच भुसावळ रेल्वे स्टेशन गाठून बालिकेला सुरक्षित ताब्यात घेतले.

मुलीला सुखरूप अमरावतीत आणून तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. अवघ्या काही तासांत आपली मुलगी सुखरूप परत मिळाल्याने पालकांनी पोलिसांचे आभार मानले. सदर यशस्वी कामगिरी अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला , उपायुक्त (परिमंडळ) श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव पेठ पोलिसांनी पार पाडली. पोलिसांच्या या तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### वाढत्या उकाड्यात 'व्होल्टेज'चा

आहे. अनेक नागरिकांच्या घरातील टीव्ही, फ्रिज, एसी, पंखे तसेच इतर विद्युत उपकरण जळून बंद पडली आहे.तसेच व्होलटेज कमी जास्त होत असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर बाबीकडे अत्यंत गांभीर्याने लक्ष देऊन तांत्रिकी तपासणी करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावे. परिसरात नवीन डीबी बसवून त्या अंतर्गत सर्व विद्युत खांबावर योग्य प्रकारे तीन फेज वीजवाहिनी जोडण्यात यावी जेणेकरून नागरिकांच्या विद्युत उपकरणाचे होणारे नुकसान टाळता येईल. योग्य निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना रंजना उके, अनिता अवसरे, कौशल्य ठाकरे, माया मोहनकर, ललिता सयाम, अंजली टोपरे, मंगला टोपरे, जया रदंडे, गिरीजा जावरकर, सोनू जावरकर, भावना किल्लेवाले, ममता किल्लेवाले, प्रिया शेंडे, ज्योती शेंडे, कल्पना शेंडे, पूर्वा किल्लेवाले, भोजराज माने, दीपक राऊतसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अचलपूर-परतवाड्यात 'चार्ली

सांगितले.याशिवाय गुन्हे प्रतिबंध, गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांची दृश्यमान उपस्थिती वाढविण्यासाठीही या वाहनांचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. सदर कार्यक्रमावेळी अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, सहायक पोलीस अधीक्षक सागर भामरे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक अशोक लांडे, पोलीस निरीक्षक संजय पवार यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

### धावत्या रेल्वे समोर

त्रस्त झाला होता. नेहमी होणाऱ्या वेदना असहनीय झाल्यामुळे त्याने हे आत्मघाती पाऊल उचलले असावे अशी परिसरात चर्चा आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

### गाळ माफियांना अभय?

जाळे मात्र अधिकच बळकट होत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. प्रादेशिक परिवहन विभागाच्या विशेष मोहिमेचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात केला जात असला तरी अनेक वाहनधारकांनी या कारवाईत दुजाभाव होत असल्याची नाराजी व्यक्त केली आहे. प्रभावशाली घटकांशी संबंधित वाहनांकडे दुर्लक्ष करून छोट्या चालकांना लक्ष्य केले जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे 'कारवाई की दिखावा?' असा सवाल आता उपस्थित होत आहे.

ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांची दुर्दशा, अपघातांचा वाढता धोका आणि पर्यावरणाचे होणारे नुकसान याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मात्र एवढ्या गंभीर प्रकारानंतरही महसूल व परिवहन विभागातील समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसून येत असल्याने अवैध गौणखनिज वाहतुकीमागील मोठे रॅकेट अद्यापही सुरक्षित असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून सुरू असलेल्या कारवाईची निष्पक्ष चौकशी करून मोठ्या माफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ३० मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शेतकरी व दिव्यांगांच्या मागण्यांसाठी मनसेचा रास्ता रोको

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मनीष डांगे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी तसेच दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शुक्रवार, दि. २९ मे रोजी सकाळी ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष मनीष भास्कर डांगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.*



या आंदोलनामध्ये शेतकरी व दिव्यांगांच्या विविध मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये मानधन मंजूर करण्यात यावे, तसेच सक्षम वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेल्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारक लाभार्थ्यांना सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तात्पुरते दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या लाभार्थ्यांना संजय गांधी योजना व इतर शासकीय योजनांचा लाभ मुदत संपेपर्यंत सुरू ठेवावा, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेतील दारिद्र्यरेषेच्या प्रमाणपत्राची अट रद्द करावी, तसेच दिव्यांगांना रोजगारासाठी शासन निर्णयानुसार २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्ये दिव्यांग नागरिकांना निवेदन अथवा अर्ज सादर करताना तळमजल्यावर आसन व्यवस्था व मोफत पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच सध्या बंद असलेले दिव्यांग सहायता पोर्टल तात्काळ सुरू करून दिव्यांग नोंदणी प्रक्रिया पूर्ववत करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

आंदोलनानंतर जिल्हाधिकारी तसेच दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास भविष्यात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

या आंदोलनात माजी शहराध्यक्ष रवी वानखडे, माजी शहराध्यक्ष गणेश इंगोले, अशोक इंगळे, फकीरा कर्डिले, गणेश खुणारे, मनविसे सरचिटणीस अमोल गाभणे, महेश देशपांडे, शाहरुख मांजरे, जुम्मा बेनीवाले, शुभम घोडे, हनुमान घोडे, धनीराम बाजड, लक्ष्मण वानखडे, संजयराव सरनाईक, रमेश चव्हाण, गुलाब मनोहर, सतीश कोकणे, शरद देशमुख, संतोष चौधरी, गजानन पांडे, अशोकराव सरनाईक, योगीराज लाडवेकर, संतोष पडघान, माधवराव देशमुख, वंदना पडघान, रामराव सरनाईक, गंगाराम खंडारे, अथर्व सरनाईक, सविता सरनाईक, कविता पुंड, लिलाबाई देशमुख, प्रवीण सपाटे, मीना लोटे, मंजुळा पुंड, कडूबा गुडदे, चंद्रभागा पांढरे, नथू पांढरे आदी महाराष्ट्र सैनिक व कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी आणि दिव्यांग बांधव सहभागी झाले होते. यावेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# अग्निशमन दलाची धाडसी कामगिरी; कारंजा बायपासवरील आग आटोक्यात

■ प्रतिनिधी | कारंजा ■



शहरातील कारंजा बायपास परिसरात बुधवारी रात्री उशिरा भीषण आग लागल्याची घटना घडली. दि. २८ मे रोजी रात्री सुमारे ११:०५ वाजताच्या सुमारास सिंध ट्रॅव्हल्स जवळ असलेल्या जगदीश बिरुल यांच्या फ्रुट दुकानाला अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या आगीत दुकानातील आंब्याच्या पेट्या, फळांचा साठा तसेच इतर साहित्य मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले.

घटनेची माहिती मिळताच कैलास बारबोले व अजय घोडेस्वार यांनी तत्काळ अग्निशमन दलाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अग्निशमन दलाच्या समयसूचकता आणि तत्पर कारवाईमुळे आग आसपासच्या दुकानांपर्यंत पसरली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी काही काळ नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. या बचाव कार्यात अग्निशमन दलाचे फायरमन सचिन ठाकूर, शुभम झोपाटे, इमरान खान, अनुराग बारबोले आणि सादिक खान यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच चालक चंदू खराडे यांनी अग्निशमन वाहन वेळेत घटनास्थळी पोहोचवले. संपूर्ण कारवाई अग्निशमन अधिकारी विवेक वळसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून घटनेमुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# दिशा समितीत आमदार नितीन देशमुखांचा प्रशासनावर हल्लाबोल

- चान्नी फाट्यावरील टोल हटविण्याची ठाम मागणी
- पारस अंडरपास प्रश्नावर अधिकाऱ्यांना फटकारले



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीच्या बैठकीत बाळापूर मतदारसंघातील नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर आमदार नितीन देशमुख यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. चान्नी फाट्यावर प्रस्तावित टोल नाका, पारस येथील रेल्वे अंडरपासमध्ये साचणारे पाणी, निकृष्ट रस्ते आणि घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणींवरून अधिकाऱ्यांची कानउघाडणी करण्यात आली.

गुरुवारी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडलेल्या बैठकीत शेगाव–पातूर राष्ट्रीय महामार्गावरील चान्नी फाट्यावर उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित टोल नाक्याचा मुद्दा चांगलाच गाजला. 'स्थानिक नागरिकांच्या खिशावर टोलचा डाका टाकण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही,' असा इशारा देत आमदार नितीन देशमुख यांनी सदर टोल नाका तातडीने अन्यत्र हलविण्याची मागणी केली. भविष्यात स्थानिकांना आर्थिक फटका बसणार असल्याने प्रशासनाने जनतेच्या भावना लक्षात घ्याव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मौजे पारस येथील रेल्वे अंडरपासमध्ये दर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होते. अनेकदा नागरिकांना जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो. या गंभीर प्रश्नावर संताप व्यक्त करत आमदार देशमुख यांनी संबंधित विभागाला कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आदेश देत अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेवरूनही बैठकीत संताप व्यक्त करण्यात आला. रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर पाच वर्षांपर्यंत देखभाल करण्याची जबाबदारी कंत्राटदारांची असतानाही अनेक ठिकाणी निकृष्ट कामे आणि दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले. 'वेळेत दुरुस्ती न करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाका,' अशा कठोर शब्दांत प्रशासनाला निर्देश देण्यात आले.

घरकुल लाभार्थ्यांना मुरूम व रेतीची मोफत रॉयल्टी देण्याचा मुद्दाही बैठकीत गाजला. गरीब लाभार्थ्यांना घरकुल उभारणी करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी करण्यात आली. यावर संबंधित यंत्रणेला सकारात्मक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या. विधवा महिलांना घरकुल योजनांमध्ये प्राधान्याने लाभ देण्यात यावा, याबाबतही बैठकीत गंभीर चर्चा झाली. अनेक पात्र महिला योजनांपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. दिशा समितीच्या बैठकीत विकासकामांतील त्रुटींवरून प्रशासनाची चांगलीच झाडाझडती घेण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत प्रशासनाने अधिक संवेदनशील होण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

# जिल्हयाला पोहचला ८ लाख ७५ हजार लिटर इंधन साठा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हयात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अतिरिक्त इंधन खरेदी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. दि. २७ मे २०२६ रोजी विविध ऑईल कंपन्यांकडून जिल्हयाला एकूण ८ लाख ७५ हजार लिटर इंधन साठा प्राप्त झाला आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीकडून ६४ हजार लिटर पेट्रोल व २ लाख ४६ हजार लिटर डिझेल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीकडून ६८ हजार लिटर पेट्रोल व १ लाख ६६ हजार लिटर डिझेल, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीकडून ५६ हजार ५०० लिटर पेट्रोल व १ लाख ६२ हजार ५०० लिटर डिझेल प्राप्त झाले आहे. तसेच जिओ कंपनीकडून ४ हजार लिटर पेट्रोल व ४८ हजार लिटर डिझेल तर नायरा कंपनीकडून २० हजार लिटर पेट्रोल व ४० हजार लिटर डिझेल जिल्हयाला प्राप्त झाले आहे.

यामध्ये एकूण २ लाख १२ हजार ५०० लिटर पेट्रोल व ६ लाख ६२ हजार ५०० लिटर डिझेल असा मिळून ८ लाख ७५ हजार लिटर इंधन साठा उपलब्ध झाला असून यापुढेही दररोज इंधन साठा प्राप्त होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या तसेच पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून जिल्हयातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल व डिझेल सुरळीतपणे उपलब्ध होत आहे. पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होऊ नये व इंधन वितरण सुरळीत राहावे यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील कलम ३ व ७ अन्वये विहित मर्यादेपेक्षा जास्त इंधन साठा करणे, साठेबाजी करणे अथवा नफेखोरी करणे हा गंभीर फौजदारी गुन्हा आहे. अशा प्रकारे अतिरिक्त व अनधिकृत इंधन साठा करणारे नागरिक, व्यापारी तसेच पेट्रोल पंप चालक अथवा मालक यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व साहित्य वाटप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भगवान महावीर विकलांगता सहायता समिती, जयपूर (नवी दिल्ली शाखा) व दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व सहाय्यक साहित्य वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील तीन ठिकाणी अनुक्रमे कवठा, वाशिम, कारंजा येथे प्रत्येकी दोन दिवशीय पार पडलेल्या या शिबिरांना लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिव्यांग सहायता कक्षाचे प्रमुख शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांच्या पुढाकारातून या शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आणि जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार विविध सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले.

# महात्मा फुले भाजी मार्केट हागणदारी मुक्त करा - गणेश इंगोले

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वाशिम शहरातील पाटणी चौक येथे असलेले महात्मा फुले भाजी मार्केटची झालेली दूर अवस्थेबाबत मनसे चे मा जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनात मनसे चे मा शहर अध्यक्ष गणेश इगोले यांनी नगरपरिषद चे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन महात्मा फुले भाजी मार्केट समस्या बाबत अवगत केले महात्मा फुले भाजी मार्केटच्या कमानीला अनेक वर्षापासून रंगरंगोटी नाही महात्मा फुले भाजी मार्केट मध्ये घाणीचे साम्राज्य, महात्मा फुले भाजी मार्केटचा पडलेला जिना, पडलेला स्लॅप मार्केट मध्ये ग्राहकांना ये जा करण्यासाठी लावण्यात आलेल्या पिल्लर मधील लोखंडी खांबा चोरून नेल्या आहेत या सर्व बाबी बाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मा. शहराध्यक्ष गणेश इंगोले यांनी वारंवार निवेदन देऊनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही सात दिवसात कारवाई करा अन्यथा महात्मा फुले भाजी मार्केट वर बोंबाबोंब आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात येत आहे.

# नोकरीच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपी जेरबंद

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■



मूर्तिजापूर शहरात मानवतेला काळीमा फासणारी संतापजनक घटना उघडकीस आली असून, नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे. या घटनेमुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी शिक्षणासाठी भंडारा येथे आपल्या काकांकडे राहत होती. उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त ती मूर्तिजापूर येथे आई-वडिलांकडे आली होती. दरम्यान, काही कामानिमित्त ती रेल्वे स्थानक परिसरात गेली असता आरोपी जितेश पद्माकर हेंड (वय ३४, रा. बरडे प्लॉट, अंजणगाव रोड नाका, अकोट) याने तिच्याशी ओळख वाढवली. 'चांगली नोकरी लावून देतो,' असे आमिष दाखवत आरोपीने अल्पवयीन मुलीला विश्वासात घेत अकोट येथे नेले. तेथे तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. पीडितेच्या तक्रारीवरून मूर्तिजापूर शहर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली.

तपासादरम्यान आरोपीने यापूर्वीही काही मुलींना अशाच प्रकारे जाळ्यात ओढल्याची माहिती समोर येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. स्वतः अपंग असल्याचा फायदा घेत आरोपी मुलींचा विश्वास संपादन करत असल्याची बाबही तपासात उघड झाली आहे.

या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. अल्पवयीन मुलींना नोकरीचे आमिष दाखवून फसवणाऱ्या विकृत प्रवृत्तीच्या आरोपींविरोधात कठोर पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मूर्तिजापूर शहर पोलीस करीत आहेत.

# देशी झाडे लावण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मादागास्करमधून आलेला गुलमोहर, ऑस्ट्रेलियातील निलगिरी तसेच सुबाभूळ, पेल्ट्रोफोरम, अकेशिया, स्पॅथोडिया, कॅशिया, ग्लिरिसिडीया, सप्तपर्णी आणि रेन ट्री यांसारख्या विदेशी वृक्षांच्या वाढत्या लागवडीमुळे स्थानिक जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर देशी वृक्षांचे संवर्धन आणि लागवड करण्याचे आवाहन राष्ट्रीय हरित सेना समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले आहे.

# मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आज वाशिम जिल्हा दौऱ्यावर



## पोहरादेवी येथील बंजारा विरासत संग्रहालयाची करणार पाहणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे शनिवार, दि. ३० मे रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते जिल्ह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे भेट देणार असून, त्यांचा अधिकृत दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

नियोजित दौरा कार्यक्रम (३० मे): सकाळी ०९:०० वाजता नागपूर हेलिपॅडवरून हेलिकॉप्टरने पोहरादेवी (ता. मानोरा, जि. वाशिम) येथे आगमन.

सकाळी ०९:०० ते १०:३० वाजता पोहरादेवी येथील 'बणजारा विरासत संग्रहालयाची' प्रत्यक्ष पाहणी व आढावा सकाळी १०:३० वाजता: पाहणी दौरा आटोपून हेलिकॉप्टरने पुढील कार्यक्रमासाठी यवतमाळकडे रवाना होतील.

# पांगरी रस्त्याच्या कामातील दिरंगाईविरोधात उद्या समृद्धी महामार्ग रोखण्याचा इशारा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील पांगरी महादेव गावासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०२३ मध्ये मंजूर झालेल्या रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

संबंधित ठेकेदाराने अपुरे व निकृष्ट दर्जाचे काम करून रस्ता अर्धवट अवस्थेत सोडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पांगरी गाव गेल्या सुमारे २६ वर्षांपासून चांगल्या रस्त्यापासून वंचित असून रस्ता मंजूर व्हावा यासाठी ग्रामस्थांनी अनेक वर्षे प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला होता.

अखेर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता मंजूर झाल्यानंतरही काम पूर्णत्वास न गेल्याने ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. ज्योती कन्स्ट्रक्शन, मध्य प्रदेश या कंपनीकडे रस्त्याच्या कामाची जबाबदारी असून कंपनीकडून केवळ थातूरमातूर काम करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. रस्त्याची दुरवस्था पाहता मागील आठवड्यात तहसीलदार, पोलीस निरीक्षक तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे उपअभियंता झळके यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. यावेळी संबंधित ठेकेदाराला ३० मेपर्यंत काम पूर्ण करण्याचे निर्देश देत तंबीही देण्यात आली होती.

मात्र ३० मेची मुदत संपत आली तरी कामाला गती मिळालेली नसल्याने ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात तहसीलदार, उपअभियंता झळके तसेच संबंधित विभागाला निवेदन देण्यात आले असून राज्य शासनालाही याबाबत माहिती देण्यात आली आहे. शासनाच्या आदेशांचे पालन न करता कामात जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून ठेकेदाराविरोधात कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, रस्त्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास ३१ मे २०२६ रोजी 'पांगरी रस्त्यासाठी, न्याय हक्कासाठी' या घोषवाक्यासह पांगरी परिसरातून जाणारा समृद्धी महामार्ग रोखण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे प्रशासन या प्रश्नावर कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पांगरी महादेव गावाचा रस्ता २०२३ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाला, मात्र कामाची जबाबदारी असलेल्या ज्योती कन्स्ट्रक्शनकडून सातत्याने दिरंगाई होत आहे. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही काम सुरू झालेले नाही. त्यामुळे गावकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी मी स्वतः त्यांच्या सोबत असून, ३१ मे रोजी समृद्धी महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. शासनाने संबंधित ठेकेदारावर योग्य कारवाई करून रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, ही आमची मागणी आहे.

**किशोर देशमुख,**
सामाजिक कार्यकर्ते तऱ्हाळा

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८२ ■ शनिवार, ३० मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# रेती उत्खननाच्या मृत्यूखड्डयांनी घेतले तिघांचे बळी

## वना नदीत पुण्यस्नानासाठी गेलेल्या बाप-लेकीसह मैत्रिणीचा दुर्दैवी अंत

**मांडगाव (वर्धा) । जनमाध्यम :** अधिक महिन्यात पुण्यस्नानासाठी गेलेल्या तिघांचा वना नदीतील खोल खड्डयात बुडून मृत्यू झाल्याने मांडगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेडगाव (आजदा) येथील अतुल लक्ष्मणराव किनकर (४५), त्यांची मुलगी रिधीमा अतुल किनकर (१६) आणि तिची मैत्रीण गुंजन रमेश मेश्राम (१६) यांचा शुक्रवारी सकाळी दुर्दैवी मृत्यू झाला. नदीपात्रात अवैध रेती उत्खननामुळे निर्माण झालेल्या खोल खड्डयांमुळे ही दुर्घटना घडल्याची चर्चा परिसरात असून नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

माहितीनुसार, अधिक महिन्याचे औचित्य साधून हे तिघे शाईन दुचाकी क्रमांक एम ३२ ई ६५३९ ने वना नदी पात्रात आंघोळीसाठी गेले होते. सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास त्यांनी नदीकिनारी दुचाकी व कपडे ठेवून स्नानासाठी पाण्यात प्रवेश केला. मात्र नदीपात्रात रेती उपशामुळे तयार झालेल्या खोल खड्डयांचा अंदाज न आल्याने तिघे अचानक खोल पाण्यात गेले आणि बुडाले.

बराच वेळ उलटूनही तिघे घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. नदीकाठी दुचाकी आणि कपडे आढळल्यानंतर अनर्थाची भीती निर्माण झाली. काही वेळातच गावकऱ्यांनी घटनास्थळी गर्दी केली. माहिती मिळताच हिंगणघाट व समुद्रपूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

त्यानंतर मांडगाव येथील पोहण्यात तरबेज किशोर बावणे आणि पुरुषोत्तम बावणे या भावंडांनी नदीत उतरून शोधमोहीम सुरू केली. अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर प्रथम रिधीमाचा, त्यानंतर गुंजनचा आणि शेवटी अतुल किनकर यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. नदीकाठावर नातेवाईकांचा आक्रोश पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

दरम्यान, वना नदीच्या पात्रात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणावर रेती उत्खनन सुरू असल्याची चर्चा आहे. बोट आणि पोकलँडच्या सहाय्याने नदीपात्रात २५ ते ३० फुट खोल खड्डे तयार करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नदीचे नैसर्गिक स्वरूप बदलल्याने हे खड्डे आता मृत्यूचे सापळे ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, घटनेची माहिती मिळताच नदीपात्रात काम करणारी यंत्रसामग्री हटविण्यात आल्याची चर्चा घटनास्थळी रंगली. त्यामुळे अवैध उत्खननाला नेमके संरक्षण कुणाचे, असा प्रश्न उपस्थित

### अवैध उत्खननावर संताप



केला जात आहे. महसूल आणि प्रशासन यंत्रणा केवळ कागदोपत्री कारवाई करत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

अधिक मासामुळे सध्या मोठ्या प्रमाणावर भाविक नदीकाठावर पुण्यस्नानासाठी जात आहेत. अशा परिस्थितीत नदीपात्रातील खोल खड्डे नागरिकांच्या जीवावर उठत असल्याने प्रशासनाने तातडीने धोकादायक ठिकाणांची पाहणी करून सुरक्षेची उपाययोजना करावी, अशी मागणी पुढे येत आहे. या घटनेमुळे शेडगाव (आजदा) परिसरात शोककळा पसरली असून किनकर आणि मेश्राम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मात्र या तिहेरी मृत्यूने एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### रेती माफियांच्या हैदोसाने घेतले तीन निष्पापांचे बळी; अंकुश 'कुणा' चा

पुलगावचा 'दादा' आणि हिंगणघाटचा 'भाऊ' यांच्या आशीर्वादाने फोफावलेल्या अवैध रेती उत्खननाने अखेर तीन निष्पाप जीवांचा बळी घेतल्याने जिल्हा हादरला आहे. नदीपात्रात बेधडक उत्खननामुळे निर्माण झालेल्या खोल खड्डयांमध्ये अडकून तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना संतापजनक ठरत आहे. पर्यावरणाचा विध्वंस, महसुलाची लूट आणि नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ नेमका कुणाच्या संरक्षणाखाली सुरू आहे, असा प्रश्न आता जनतेतून उपस्थित होत आहे. प्रशासनाचे डोळे झाकून बसणे आणि कारवाईचा फक्त दिखावा यामुळे रेती माफियांचे मनोबल वाढल्याची चर्चा आहे. अंकुश 'कुणा'चा हा प्रश्न आता संतप्त नागरिक थेट सत्ताधाऱ्यांना विचारू लागले आहेत.

# काँग्रेसमध्ये 'दादागिरी'चा स्फोट; जनमाध्यमच्या वास्तववादी वृत्ताने खळबळ

## 'राजकारणाचा दादा' उघडा पडताच फोनची रिंग थांबेना; कार्यकर्त्यांनी सांगितल्या भीतीच्या थरारक कहाण्या

**वर्धा । रवींद्र लाखे :** गुरुवारच्या जनमाध्यमच्या अंकात प्रकाशित झालेल्या 'राजकारणाचा दादा' या वास्तववादी वृत्ताने जिल्ह्यातील काँग्रेसच्या राजकारणात अक्षरशः भूकंप घडवून आणला आहे. बातमी प्रसिद्ध होताच अनेकांचे फोन जनमाध्यमच्या कार्यालयात खणखणले. 'जे लिहिलं ते शंभर टक्के खरं!' 'पहिल्यांदाच कुणीतरी धाडसाने सत्य मांडलं,' अशा प्रतिक्रिया देत अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी वृत्तपत्राचे आभार मानले. वर्षानुवर्षे पक्षात घुसमट सहन करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भावना आता जणू धरण फुटल्याप्रमाणे बाहेर पडू लागल्या आहेत. 'दादा' नावाच्या राजकीय सावलीने पक्षात कशी भीतीची दहशत निर्माण केली, कोणाला कसे जवळ केले, कोणाला गळामिठी देत राजकीय खड्डयात ढकलले, तर कोणाच्या पायाखालची वाळूच सरकवली, याचे थरारक किस्से आता समोर येऊ लागले आहेत. विशेष म्हणजे, निवडणुकीच्या काळात 'आपला माणूस' म्हणून खांद्यावर हात ठेवणारे हेच राजकीय दादा निकालानंतर अनेकांना राजकीय वनवासात ढकलत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांमधून होत आहे. ज्यांनी आयुष्य घालवलं त्यांनाच संपवण्याचा डाव रचला गेला, अशी खदखद आता उघडपणे बोलली जात आहे.

काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांमध्ये एकच चर्चा रंगली आहे , पक्षात नेतृत्व आहे की 'दरबारशाही निष्ठावान कार्यकर्त्यांच्या खांद्यावर उभे राहून स्वतःची राजकीय पोळी भाजणाऱ्यांना आता आरसा दाखवण्याची वेळ आली असल्याचे बोलले जात आहे. अनेकांनी तर थेट आरोप केला की, दादांच्या भीतीमुळे अनेक कार्यकर्ते आजही उघड बोलायला तयार नाहीत. दरम्यान, जनमाध्यमकडे अनेक धक्कादायक माहिती, बैठकीतील चर्चांचे तपशील आणि निवडणुकीतील कथित राजकीय डावपेचांचे पुरावे जमा होऊ लागली आहे. कोणाला उमेदवारीपासून दूर ठेवण्यासाठी कसे जाळे विणले गेले? कोणाच्या पराभवासाठी आतूनच कशी फिल्डिंग लावली गेली? कोणाला जवळ करून वेळ येताच राजकीय काटा काढला गेला? या सर्वांचा लवकरच पर्दाफाश होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देणार, हा जनमाध्यमचा निर्धार असून, ही दगडावरची काळी रेघ आहे, असा इशाराच या वृत्तातून देण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत जिल्ह्यातील काँग्रेसचे राजकारण आणखी तापण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. एकीकडे सामान्य कार्यकर्त्यांचा संताप उफाळून येत असताना दुसरीकडे तथाकथित 'दादा' गटात मात्र प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. कारण, आतापर्यंत दबक्या आवाजात बोलले जाणारे सत्य आता चौकाचौकात उघडपणे चर्चिले जाऊ लागले आहे.

# दुपारच्या आगीत शेतकऱ्याचा गोठा, वैरण जळून खाक

## कानगाव शिवारातील घटना; संतोष वाघमारे यांचे लाखोंचे नुकसान

**मोझरी (शेकापूर) जनमाध्यम :** कानगाव शिवारात शुक्रवारी दुपारी अचानक लागलेल्या आगीत शेतकरी संतोष गोरख वाघमारे यांचा गोठा, वैरण व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. या आगीत सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

संतोष वाघमारे हे कानगाव येथील रहिवासी असून गावालगतच त्यांच्या शेतात विटा-सिमेंटचा गोठा बांधण्यात आला होता. गोठ्यामध्ये जनावरांसाठी वैरण, कडबा-कुटार, शेती मशागतीची अवजारे, सिंचनासाठीचे पाईप तसेच इतर कृषी साहित्य ठेवण्यात आले होते. शुक्रवारी दुपारी अचानक गोठ्याला आग लागली. भर दुपारचे ऊन आणि वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे आगीने काही वेळातच मोठे रूप धारण केले. आगीमुळे गोठ्यातील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले. स्थानिक नागरिकांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले; मात्र



आग नियंत्रणाबाहेर गेल्याने हिंगणघाट येथील अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. वाघमारे यांच्याकडे सुमारे चार एकर ओलिताची शेती असून विहीर व सोलर पंपाच्या साहाय्याने शेती केली जाते. अचानक झालेल्या या घटनेमुळे त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. संबंधित विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# नागरी आरोग्य सेवांचा उपसंचालकांनी घेतला आढावा

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेवांचा जिल्हा समन्वय अधिकारी तथा राज्य शासन उपसंचालक आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) मुंबई डॉ. सचिन तडस यांनी शहरी आरोग्य सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीचा घेतला आढावा.

यावेळी बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, जिल्हा निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विद्या पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी हेमंत पाटील, जिल्हा प्रशिक्षण पथक वैद्यकीय अधिकारी डॉ. सुर्वणा खोब्रागडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. संदिप नखाते, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी आम्रपाली मोरे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. विनीत झळके, डॉ. प्रशांत वाडीभस्मे, स्मिता वासनिक, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सोनू हाडके, प्रवीण बाचलकर उपस्थित होते.जिल्हा परिषदेच्या सिंधु सपकाळ सभागृहात आयोजित आढावा बैठकीत डॉ. सचिन तडस यांनी शहरी आरोग्य सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रभावी समन्वय, नियमित माहिती अद्ययावत करणे, तसेच नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यावर भर द्यावा व प्रलंबित बाबी तात्काळ पूर्ण करण्याच्या सुचना यावेळी अधिका-यांना दिल्यात.

# पिंपळगावात मोटारपंपाचा करंट लागून २२ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू

## आवारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर

**समुद्रपुर जनमाध्यम :** घरासाठी पाणी भरताना एका क्षणात मृत्यू समोर उभा ठाकेल, याची कुणालाच कल्पना नव्हती. समुद्रपूर तालुक्यातील पिंपळगाव येथे मोटारपंपाचा करंट लागून २२ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण गाव सुन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आशिष गजानन आवारी (वय २२) हा आपल्या घरी नळाला जोडलेल्या लहान मोटारपंपाद्वारे पाणी घेत होता. यावेळी अचानक मोटारपंपात विद्युत प्रवाह उतरल्याने त्याला जबरदस्त करंटचा झटका बसला. क्षणार्धात आशिष खाली कोसळला आणि घरात एकच आक्रोश उसळला. कुटुंबीयांनी त्याला तातडीने समुद्रपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.



हसतखेळत घराला आधार देणारा तरुण मुलगा अचानक निघून गेल्याने आवारी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावात सर्वत्र शोककळा पसरली असून नागरिकांतून हळहळ व्यक्त केली जात आहे.


दरम्यान, जिल्ह्यात वाढलेल्या पाणीटंचाईमुळे अनेक नागरिक घरगुती मोटारपंपांचा वापर करत आहेत. मात्र ओलसर जागा, निकृष्ट वायरिंग आणि सुरक्षेकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अशा दुर्घटना वाढत आहेत. पाण्यासाठी लावलेली मोटारच मृत्यूचे कारण ठरू नये, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. विद्युत उपकरणे वापरताना योग्य काळजी घेण्याचे आवाहनही करण्यात येत आहे.

## हंडाभर पाण्यासाठी महिलांचा एल्गार

# नवतपात सिंदी रेल्वे पेटली; संतप्त महिलांची नगरपालिकेवर थेट धडक

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** सूर्य आग ओकत आहे. नवतपाने नागरिकांचे जगणे असह्य केले आहे. आणि अशा काळात सिंदी रेल्वे शहरातील महिला पाण्याच्या एका थेंबासाठी अक्षरशः होरपळत आहेत. चार-चार दिवसांनी होणारा अपुरा पाणीपुरवठा, कमी दाबाने येणारे नळ आणि वारंवार तक्रारी करूनही ढिम्म असलेले पालिका प्रशासन याविरोधात अखेर महिलांचा संताप रस्त्यावर उतरला.

प्रभाग क्रमांक ८ आणि ९ मधील संतप्त गृहिणींनी शुक्रवारी थेट नगरपालिकेवर मोर्चाच काढत प्रशासनाला धारेवर धरले. हातात



रिकामे भांडे आणि डोळ्यांत संताप घेऊन आलेल्या महिलांनी पाणी द्या... नाहीतर खुर्च्या खाली करा असा आक्रमक इशारा दिला.

पालिका कर्मचारी, अधिकारी आणि नगरसेवकांना अनेक वेळा समस्या सांगूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप महिलांनी केला. अखेर संतापाचा बांध फुटल्यानंतर महिलांनी थेट नगराध्यक्षांच्या कक्षात घुसून जाब विचारला. अचानक मोठ्या संख्येने महिला पालिकेत दाखल झाल्याने प्रशासनाची अक्षरशः तारांबळ उडाली.

चार दिवसांनी नळ येतो, तोही धारेसारखा नाही तर थेंबथेंब... एवढ्या पाण्यावर संसार चालवायचा कसा असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला. वाढत्या उन्हात पाण्यासाठी होणारी फरफट, रिकामे हंडे आणि घरातील लहान मुलांचे हाल पाहून महिलांचा आक्रोश अधिक तीव्र झाला.

दरम्यान, महिलांच्या आक्रमक पवित्र्यानंतर प्रशासनाने तातडीने समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. मात्र आश्वासनांनी हंडे भरत नाहीत, असा घणाघात करत महिलांनी लवकर उपाय न झाल्यास आणखी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# गझलसम्राट भीमराव पांचाळे यांच्या अमृत महोत्सवी सत्काराची आर्वीत सांस्कृतिक पर्वणी आज

## सुरांच्या दरबारात रंगणार बहारदार गझल मैफल; संगीतप्रेमींमध्ये उत्साह

**आर्वी जनमाध्यम :** शब्दांना सुरांची झालर चढवत लाखो रसिकांच्या मनात घर करणारे जागतिक कीर्तीचे गझलनवाज पंडित भीमराव पांचाळे यांच्या अमृत महोत्सवी नागरी सत्कार सोहळ्याने आर्वी शहरातील सांस्कृतिक वातावरण भारावून जाणार आहे. विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विशेष कार्यक्रमात पांचाळे यांच्या बहारदार गझल मैफिलीचीही मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराने सन्मानित पंडित भीमराव पांचाळे यांनी आपल्या सुरेल, भावस्पर्शी आणि शब्दप्रधान गझल गायकीतून गेली पाच दशके महाराष्ट्रासह देशभरातील रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले आहे. त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने त्यांच्या संगीत साधनेला मानवंदना देण्यासाठी हा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम आज शनिवार, ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता शिलाराम मंगलम, तळेगाव रोड, आर्वी येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुमित वानखेडे राहणार असून उद्घाटक म्हणून डॉ. अरुण पावडे उपस्थित राहतील. याशिवाय सुधीर दिवे, स्वाती गुल्हाने आणि संदीप काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.कार्यक्रमात पंडित पांचाळे



यांच्या सुरेल गझलांनी वातावरण मंत्रमुग्ध होणार असून संगीत रसिकांसाठी ही एक सांस्कृतिक पर्वणी ठरणार आहे. त्यांच्या आवाजातील दर्द, शब्दांची ताकद आणि सुरांची जादू अनुभवण्यासाठी रसिकांमध्ये आतापासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रोटरी क्लब, लायन्स क्लब, लायन सेवा ग्रुप, रेड क्रॉस सोसायटी, कॉटन असोसिएशन, ऑईल मिल असोसिएशन तसेच आर्वी शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आर्वी शहर व परिसरातील सर्व संगीतप्रेमींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# थेंब थेंब पाण्यासाठी जनता त्रस्त... अन् इथे हजारो लिटर पाणी रस्त्यावर

## महात्मा गांधी पुतळा परिसरातील गळतीकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष; नागरिकांत संताप

**वर्धा जनमाध्यम :** एका बाजूला उन्हाळ्याच्या झळांनी नागरिक हैराण झाले असून अनेक भागांत पाण्याची टंचाई तीव्र होत आहे, तर दुसऱ्या बाजूला शहराच्या मध्यवर्ती भागातच हजारो लिटर पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सेवाग्राम रोडवरील महात्मा गांधी पुतळा परिसरातील पाण्याच्या व्हॉलमधून रोज मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असून, याकडे नगरपालिकेचे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या या ठिकाणी दिवसभर पाण्याची गळती सुरू असते.



रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या नजरेस ही बाब रोज पडते, मात्र नगरपरिषद प्रशासन आणि संबंधित कर्मचाऱ्यांना हे दृश्य दिसत नाही का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

उन्हाळ्यामुळे शहरातील अनेक भागांत नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असताना, सार्वजनिक पाणीपुरवठ्याची अशी उघडपणे होणारी नासाडी प्रशासनाच्या निष्क्रियतेचे प्रतीक असल्याची भावना व्यक्त होत आहे. सतत वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्यावर चिखल निर्माण होत असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे.नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन गळती दुरुस्त करावी आणि पाण्याची होणारी नासाडी थांबवावी, अशी मागणी केली आहे.

# जास्त व्याजाच्या जाळयात सर्वसामान्यांची लूट; 'ढोकेश्वर'चे दरवाजे बंद, ठेवीदार रस्त्यावर

## ४३ लाखांचा अपहार; वर्ध्यात आर्थिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**हिंगणघाट जनमाध्यम :** दुप्पट पैसे, कमी वेळात मोठा परतावा, सोन्यासारखी सुरक्षित गुंतवणूक अशा गोंडस घोषणांच्या आड लपलेल्या आर्थिक फसवणुकीचा आणखी एक धक्कादायक चेहरा वर्धा जिल्ह्यात उघड झाला आहे. श्री ढोकेश्वर मल्टीस्टेट अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड, लासलगाव या संस्थेने सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशांवर डल्ला मारत तब्बल ४३ लाख ८ हजार ६०० रुपयांचा अपहार केल्याचा आरोप समोर आला असून, हिंगणघाट पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २०१७ ते २०१८ या




कालावधीत 'आरडी', 'फिक्स डिपॉझिट', 'सुवर्ण ठेव योजना' अशा विविध योजनांच्या नावाखाली हिंगणघाटसह वर्धा जिल्ह्यातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करण्यात आल्या. बँकेपेक्षा जास्त व्याज या आमिषाला भुलून शेतकरी, मजूर, निवृत्त कर्मचारी आणि महिलांनी आयुष्यभराची साठवणूक या संस्थेत जमा केली. मात्र मुदत संपल्यानंतर ठेवीदारांना पैसे परत मिळण्याऐवजी कार्यालयांचे कुलूपच दिसले.

ठेवीदारांनी वारंवार हेलपाटे मारले, फोन केले, चौकशी केली; पण उत्तर मिळाले ते फक्त टाळाटाळीचे. अखेर फसवणूक झाल्याचे स्पष्ट होताच संतप्त गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे धाव घेतली.

या प्रकरणी श्रीराम काळे, अक्षय भुगूल, वैभव नरेंद्र चौधरी, स्पनील धुळे, प्रशांत तायडे, सौ. ललिता शशिकांत वाटेकर आणि सतीश पोपटराव काळे यांच्याविरोधात भादंवि कलम ४०९, ४२०, ३४ तसेच एमपीआयडी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर N8661527 वरील माझे GANESHKUMAR RUPCHAND DEWANI असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील GANESH RUPCHAND DEWANI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता :-** वॉर्ड नंबर ३५ दयाल नगर वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी RUBINA ANJUM असे नाव होते. माझ्या आधार पॅन कार्ड वरील RUBINA AMJAD KHAN PATHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
**पत्ता:-** सिंदी रेल्वे ता सेलू जिल्हा वर्धा ४४२१०५

# महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल- मुख्यमंत्री

## 'मुंबई टेक विक २०२६' चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



**मुंबई-**महाराष्ट्र एआय क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी यामुळे आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचे नेतृत्व करेल,' असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

मुंबईतील बीकेसी येथे 'मुंबई टेक विक २०२६' चे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी घेण्यात आलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिले. या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई मनपा आयुक्त अश्विनी भिडे, महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, तसेच प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने १० हजार कोटी रुपयांची एआय गुंतवणूक, दीड लाख रोजगार निर्मिती, सहा 'सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि विशेष 'एआय इनोव्हेशन क्षेत्रे' उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआय क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्यासाठी राज्य सरकार 'कम्प्युट-अॅज-अ-सर्व्हिस' सुविधा निर्माण करत आहे. त्याद्वारे नवउद्योजक आणि संशोधकांना २ हजार जीपीयू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उच्च क्षमतेच्या कम्प्युटिंग सुविधा परवडत नसल्यास नवकल्पना थांबते. त्यामुळे महाराष्ट्र शासन थेट पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सरकार फक्त धोरणात्मक चौकट तयार करू शकते; पण खरी स्टार्टअप परिसंस्था संस्थापक आणि उद्योजक घडवतात. डिसेंबर २०२२ मध्ये टेक उद्योजकांच्या संघटनेची संकल्पना प्रथम मांडण्यात आली होती, त्यावेळीच त्यांच्या कामातील ऊर्जा आणि दृष्टी पाहून हा उपक्रम मोठा होईल, असा विश्वास वाटला.आता प्रत्येक वर्षी अधिकाधिक संस्थापक, गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्या महाराष्ट्राशी जोडल्या जात आहेत. सलग तीन वर्षे महाराष्ट्र हा गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येनुसार देशातील अग्रगण्य राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशभरातून आणि विदेशातून मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना उद्देशून मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीचे आवाहन केले. आणि ते म्हणाले 'तंत्रज्ञान आणि एआय क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी हा सर्वोत्तम काळ आहे आणि महाराष्ट्र ही सर्वोत्तम कार्यभूमी आहे. येथे आधीच सक्षम परिसंस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रासाठी काम करा, भारतासाठी काम करा आणि जगासाठी नवकल्पना घडवा.'

राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अॅक्सेलरेशनपुरते मर्यादित नसून 'फंड ऑफ फंड्स'च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्या सोबत उभे राहण्यास तयार आहे, असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.गुन्हे तपास आणि न्यायप्रक्रियेसाठी तयार करण्यात आलेल्या 'क्राईम ओएस' प्लॅटफॉर्मचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या प्रणालीमुळे तपास, चार्जशीट तयार करणे आणि न्यायालयीन प्रक्रिया अत्यंत वेगवान होणार आहे. पूर्वी १५ हजार पानांच्या आरोपपत्रासाठी तीन-चार महिने लागत; आता एआयमुळे ते दहा-बारा दिवसांत शक्य होणार आहे.वैद्यकीय विमा योजनांतील गैरव्यवहार शोधणे, एचआर स्टॅकद्वारे शासकीय मनुष्यबळ व्यवस्थापन सुधारणे, वाहतूक नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आणि निगराणी व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांतही एआयचा प्रभावी वापर सुरू आहे. राज्य सरकारने विविध विभागांसाठी ५० एआय इंजिन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

# चर्चेअंती मनोज जरांगे पाटील उपोषणाचा निर्णय मागे घेतील-विखे पाटील

**मुंबई-**मराठा आरक्षणाबाबतच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा ३० मे पासून अंतरवाली सराटीत कडक उन्हात आमरण उपोषणावर बसण्याचा इशारा दिल्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. जरांगे पाटील यांच्या या इशाऱ्यामुळे शासकीय पातळीवर प्रचंड वेगाने चक्रे फिरू लागली असून, त्यांचे उपोषण रोखण्यासाठी महायुती सरकारकडून मनधरणीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप नेते प्रसाद लाड यांचे एक शिष्टमंडळ जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी रवाना झाले असून, सकारात्मक चर्चेनंतर जरांगे पाटील उपोषणाचा निर्णय मागे घेतील, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे. मात्र, दुसरीकडे मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांना आणि 'सगेसोयरे' अध्यादेशाला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी तीव्र विरोध करत 'ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास रस्त्यावर उतरू' असा इशारा दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वी सरकारला दिलेल्या १० महिन्यांच्या मुदतीचा दाखला देत सातारा गॅझेटिअरची अंमलबजावणी आणि कुणबी प्रमाणपत्रांच्या वाटपाबाबत जीआर न काढल्याबद्दल तीव्र उद्वेग व्यक्त केला होता. या पार्श्वभूमीवर बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्ट केले की, सातारा गॅझेटिअरच्या अंमलबजावणीमध्ये काही कायदेशीर व तांत्रिक अडचणी येत आहेत आणि त्या केवळ चर्चेच्या माध्यमातूनच सुटू शकतात. महाविकास आघाडी सरकारने आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात मराठा आरक्षणासाठी काहीही ठोस पावले उचलली नाहीत, असा आरोप करत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आम्हीच मराठा समाजाला टिकणारे आरक्षण दिले होते, याची आठवण त्यांनी करून दिली. सरकार जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत अत्यंत सकारात्मक असून त्यांच्या सर्व गैरसमजांचे थेट भेटीत निरसन केले जाईल, त्यामुळे त्यांच्यावर उपोषणाची वेळ येणार नाही, असा दावा विखे पाटील यांनी केला आहे.

# महाविकास आघाडीचे विधानपरिषद निवडणुकीचे जागावाटप जाहीर

## शिवसेना ४, काँग्रेस ८ तर राष्ट्रवादी काँग्रेस ३ जागांवर लढणार

**मुंबई-**विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महाविकास आघाडीकडून जागावाटप जाहीर करण्यात आले आहे. या निवडणुकीत काँग्रेस आठ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ४ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार तीन जागांवर लढणार आहेत. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आज झालेल्या बैठकीनंतर जागावाटप जाहीर करण्यात आले.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेनेचे खासदार अनिल देसाई, विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे व मिलिंद नार्वेकर यांच्यात आज बैठक पार पडली. या विधानपरिषदेच्या १५ जागांवर एकमत झाले असून नांदेड व नाशिक या दोन जागांबाबत येत्या दोन दिवसात निर्णय घेण्यात येणार आहे.

विधान परिषदेच्या जागे संदर्भात महाविकास आघाडीनेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अदिती नलावडे, मुंबई अध्यक्ष माजी आमदार मिलिंद अण्णा कांबळे उपस्थित होते.


# यंदा देशात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज

## जूनच्या सरुवातीपासून अनेक राज्यांमध्ये उष्णतेची लाट

**मुंबई-**भारतीय हवामान विभागान शुक्रवारी नैऋत्य मान्सूनसंदर्भातील दुसऱ्या टप्प्यातील दीर्घकालीन अंदाज जाहीर केला. यामध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीत देशातील अनेक महत्त्वाच्या भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला असून जून महिन्यापासून अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशाराही देण्यात आला आहे.

हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्र यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, यंदाच्या मान्सून हंगामात देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे.डॉ. महापात्र म्हणाले की, 'जून ते सप्टेंबर या कालावधीसाठीचा दुसऱ्या टप्प्यातील मान्सून अंदाज जाहीर करण्यात आला आहे. देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के पावसाची अपेक्षा आहे.'

ईशान्य हिंदुस्थानात दीर्घकालीन सरासरीच्या ९४ ते १०६ टक्क्यांदरम्यान म्हणजेच सामान्य पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र मध्य हिंदुस्थान, दक्षिण द्वीपकल्पीय भाग, वायव्य हिंदुस्थान आणि मान्सून कोअर झोनमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.जून महिन्याबाबत बोलताना डॉ. महापात्र यांनी सांगितले की, देशाच्या बहुतांश भागांत पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. मात्र वायव्य हिंदुस्थान, ईशान्येकडील काही भाग आणि दक्षिण द्वीपकल्पातील



काही प्रदेशांत सामान्य ते सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडू शकतो.

### जूनमध्ये तापमानही वाढणार

हवामान विभागाच्या अंदाजानुसार जून महिन्यात देशातील बहुतांश भागांत कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. मध्य, वायव्य आणि पूर्व हिंदुस्थानातील काही भाग याला अपवाद असतील. किमान तापमानही बहुतांश भागांत सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### अनेक राज्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा

हवामान विभागाने उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात आणि आंध्र प्रदेशमध्ये यंदा उष्णतेच्या लाटेचे दिवस सरासरीपेक्षा अधिक राहतील, असा इशारा दिला आहे. याशिवाय महाराष्ट्र, तेलंगणा आणि तामिळनाडूतील काही भागांमध्येही उष्णतेच्या लाटेची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

समुद्रातील परिस्थितीबाबत माहिती देताना डॉ. महापात्र यांनी सांगितले की, सध्या तटस्थ ईएनएसओ परिस्थिती हळूहळू एल निनोकडे सरकत आहे. जूनमध्ये एल निनो निर्माण होण्याची शक्यता ८२ टक्के असून जुलै आणि ऑगस्टमध्ये ती ९० टक्क्यांहून अधिक होण्याचा अंदाज आहे.

मान्सूनने अंदमान-निकोबार बेटांवर, तसेच पोर्ट ब्लेअर परिसरात पूर्णपणे प्रवेश केला असून तो पूर्व बंगालच्या उपसागरातील काही भागांपर्यंत पोहोचला आहे. पुढील आठवडाभरात मान्सूनची आणखी प्रगती होऊन तो अरबी समुद्रातील अधिक भाग, बंगालच्या उपसागरातील उर्वरित क्षेत्र, ईशान्येकडील राज्यांचे काही भाग आणि देशाच्या अतिदक्षिण भागात दाखल होण्याची शक्यता आहे.मान्सूनचा हंगाम साधारणपणे १ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत असतो. त्यानंतर सुमारे १७ सप्टेंबरपासून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होतो. त्यामुळे सध्या मान्सूनबाबत चिंता करण्याचे कारण नाही. उलट मान्सूनचे आगमन होत असून उष्णतेपासून मोठा दिलासा मिळत आहे. कालपासून अनेक ठिकाणी झालेल्या पावसामुळे उष्णतेच्या लाटेची तीव्रता कमी झाली आहे. वायव्य हिंदुस्थान, मध्य हिंदुस्थान आणि पूर्व हिंदुस्थानातील अनेक भागांत ३१ मेपर्यंत पावसाची शक्यता आहे. त्यामुळे ३१ मेपर्यंत तरी उष्णतेच्या लाटेची परिस्थिती पुन्हा निर्माण होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आता १० वर्षांची मर्यादा

## एनएमसीकडून मसुदा अधिसूचना जारी

**मुंबई-**वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी नऊ वर्षांची असलेली कालमर्यादा वाढवून १० वर्षांची करण्याचा निर्णय राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) घेतला आहे. नव्या नियमानुसार या १० वर्षांमध्ये चक्राकार वैद्यकीय आंतरवासिता अनिवार्य करण्यात आली आहे. यासंदर्भात एनएमसीने 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन (अमेंडमेंट) रेग्युलेशन्स, २०२६' या अधिसूचनेच्या मसुदा जाहीर केला आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) एमबीबीएस अभ्यासक्रमासंदर्भातील महत्त्वाचा निर्णय जाहीर करत 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन (अमेंडमेंट) रेग्युलेशन्स, २०२६' या मसुदा अधिसूचनेची घोषणा केली आहे. या नव्या दुरुस्तीमुळे एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना आता दहा वर्षांची मुदत मिळणार आहे. यामध्ये अनिवार्य रोटेटरी मेडिकल इंटर्नशिपचाही समावेश असेल. यापूर्वी ही मर्यादा नऊ वर्षांची होती.राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने १८ मे २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन रेग्युलेशन्स, २०२३'मधील कलम ५ अंतर्गत असलेल्या तरतुदीत बदल करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

त्यानुसार, प्रथम एमबीबीएस वर्षासाठी विद्यार्थ्यांना चार प्रयत्नांपेक्षा अधिक संधी दिली जाणार नाही; मात्र संपूर्ण पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीची कालमर्यादा एका वर्षाने वाढवण्यात येणार आहे. चार संधीमध्ये विद्यार्थी प्रथम वर्ष उत्तीर्ण न झाल्यास त्याला वैद्यकीय शिक्षण सोडावे लागणार आहे. त्याचप्रमाणे एक वर्षाच्या आंतरवासितेसह विद्यार्थ्याने १० वर्षात वैद्यकीय शिक्षण पूर्ण न केल्यास त्याला एमबीबीएसची पदवी मिळणार नाही. म्हणजेच प्रथम एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यापासून, आंतरवासितासह, दहा वर्षांपेक्षा अधिक काळ वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम सुरू ठेवता येणार नसल्याचे नव्या मसुद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

### वसतिगृहातील खोल्या अडविणाऱ्या विद्यार्थ्यांना बसणार चाप

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक अडचणी, वैयक्तिक कारणे, शैक्षणिक ताण अशा विविध कारणांमुळे अभ्यासक्रम पूर्ण करण्यात विलंब होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असला, तरी प्रत्यक्षात साडेचार वर्षांचे एमबीबीएस शिक्षण पूर्ण झालेले अनेक विद्यार्थी हे वसतिगृहातील खोली आंतरवासिता पूर्ण करण्याच्या नावाखाली वर्षानुवर्षे अडवून ठेवत असतात. यामध्ये पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाची सीईटी देणे, सीईटीमध्ये कमी गुण मिळाल्यास आंतरवासिता पूर्ण न करणे, काही विषयांची आंतरवासिता जाणीवपूर्वक टाळणे असे प्रकार विद्यार्थ्यांकडून सर्रास केले जातात. या नव्या नियमामुळे विद्यार्थ्यांच्या या गैरप्रकाराला आळा बसण्याची शक्यता वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### अधिसूचनेवर मागवल्या सूचना व हरकती

एनएमसीने या मसुदा दुरुस्तीवर संबंधित वैद्यकीय महाविद्यालये, शिक्षक, विद्यार्थी संघटना आणि नागरिकांकडून सूचना व हरकती मागवल्या आहेत. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत सूचना पाठवण्याची मुदत देण्यात आली आहे. प्राप्त होणाऱ्या हरकती आणि सूचनांचा विचार करून अंतिम नियमावली जाहीर करण्यात येणार आहे. सूचना आणि हरकती फक्त ई-मेलद्वारे स्वीकारल्या जाणार असून, त्यासाठी ug_gmer_amend_2026@nmc.org.in हा अधिकृत ई-मेल आयडी देण्यात आला आहे. अन्य कोणत्याही माध्यमातून पाठवण्यात आलेल्या सूचना ग्राह्य धरल्या जाणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही हा मसुदा उपलब्ध करण्यात आला.

## संक्षिप्त

### माजी सरपंचासह कुटुंबातील चार जणांची निर्घृण हत्या

**राजस्थान-** घरगुती वादातून एका माजी सरपंचासह त्याच्या कुटुंबातील चार जणांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांचे मृतदेह गाडीत ठेवून पेटवून देण्यात आले.



या संपूर्ण हत्याकांडात धक्कादायक बाब म्हणजे, माजी सरपंचाच्या पहिल्या पत्नीने आपल्या दोन मुलांच्या मदतीने हा संपूर्ण कट रचून अत्यंत क्रूरपणे अंमलात आणल्याचे समजते.अजमेर शहरापासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या श्रीरामपुरा गावात ही घटना घडली. गावातील महामार्गावर, पीडितांच्या घरापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर एक महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी जळालेल्या अवस्थेत आढळून आली. सुरुवातीला हा अपघात असल्याचे वाटत होते, मात्र पोलिसांनी तपास चक्र फिरवताच एका भयंकर हत्याकांडाचा खुलासा झाला. या हत्याकांडात रामसिंग चौधरी (माजी सरपंच), त्यांची आई पुसी देवी, दुसरी पत्नी सूर्यज्ञान देवी आणि पुतणी महिमा चौधरी यांची हत्या करण्यात आली आहे.गाडीत तीन मृतदेह पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत आढळले, तर रामसिंग यांच्या दुसऱ्या पत्नी सूर्यज्ञान देवी यांचा मृतदेह जवळच असलेल्या शेतात आढळून आला. त्यांचा गळा चिरून खून करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत रामसिंग यांची पहिली पत्नी सुनीता, मुलगी सरिता आणि एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

### जपानमध्ये हापूससह भारतीय आंब्यांना बंदी!

**नवी दिल्ली-** उन्हाळ्याच्या हंगामात जगभरात गोडवा पसरवणाऱ्या भारतीय आंब्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठा झटका बसला आहे. जपान सरकारने चालू हंगामात भारतातून आयात होणाऱ्या सर्व ताज्या आंब्यांवर थेट



बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. जपानच्या कडक 'बायो-सिक्युरिटी' मानकांची पूर्तता करण्यात भारतीय प्रक्रिया केंद्रे अपयशी ठरल्याने हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे, जवळपास २० वर्षांनंतर जपानने भारतीय आंब्यांबाबत असे पाऊल उचलले आहे. यापूर्वी 'फ्रुटफ्लाय'च्या प्रादुर्भावामुळे अशीच बंदी घालण्यात आली होती, जी भारताने प्रक्रियेचा दर्जा सुधारल्यानंतर २००६ मध्ये उठवली होती. आता पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे.एप्रिल ते जून हा काळ भारतीय आंब्यांच्या निर्यातीचा मुख्य आणि अत्यंत महत्त्वाचा हंगाम मानला जातो. मात्र, जपानच्या या निर्णयामुळे यंदा तिथल्या बाजारपेठेतून भारतीय आंबे पूर्णपणे गायब राहणार आहेत. महाराष्ट्राचा जगप्रसिद्ध हापूस , गुजरातचा राजा केशर, उत्तर भारताची शान असलेला लंगडा आणि दक्षिण भारतातील प्रसिद्ध बनगनपल्ली यांसारख्या सर्वच प्रीमियम आंब्यांच्या निर्यातीला जपानच्या सीमेवर रोखण्यात आले आहे. स्वतःच्या देशातील शेती आणि वनस्पतींचे परदेशी कीटकांपासून रक्षण करण्यासाठी जपान प्रशासन कमालीचे सतर्क असते आणि त्यासाठी ते कोणत्याही प्रकारची तडजोड न करता 'झिरो-टोलरन्स' धोरण राबवते, याचाच फटका भारताला बसला आहे.

### २८ दिवसांत २८ हजार जणांनी नोकऱ्या गमावल्या

**नवी दिल्ली-**जगातील टेक्नोलॉजी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. मे महिन्यात अवघ्या २८ दिवसांत २८ हजार जणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, तर वर्षभरात १ लाखांहून अधिक कर्मचारी नोकरी गेल्याने आता बेरोजगार झाले आहेत. कर्मचारी कपातीची




टांगती तलवार अद्याप कायम असल्याने हजारो कर्मचारी मानसिक तणावात आहेत.ज्या कंपन्यांनी कर्मचारी कपात केली आहे, त्यामध्ये मेटा, क्लाऊड फ्लेअर, लिंक्डइन आणि सिस्को यांसारख्या दिग्गज कंपन्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या नोकरकपातीमागे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' हे सर्वात मोठे कारण आहे. ले ऑफ डॉट एफवायआय या नोकरकपातीची माहिती देणाऱ्या जागतिक वेबसाइटच्या ताज्या आकडेवारीनुसार, एकटय़ा मे २०२६ मध्ये २८,००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्रामची मूळ कंपनी मेटाने आपल्या एपूण जागतिक कर्मचाऱ्यांपैकी तब्बल १० टक्के कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. मेटाने आपल्या ऑटोमेशन आणि नेक्स्ट जनरेशन डिजिटल उत्पादनांवर लक्ष पेंद्रित करण्यासाठी ७,००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना थेट 'एआय आधारित' प्रकल्पांवर शिफ्ट केले आहे. पेपलने मे महिन्यात ४,७६० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. सिस्कोने ४,००० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला. अमेरिकेतील कंपनी 'इन्टयुइट'ने जागतिक पातळीवर ३,००० कर्मचाऱ्यांना काढले आहे.

### ३० हजार फूट उंचीवर वैमानिकाला हार्ट अटॅक

**नवी दिल्ली-**अलीकडेच वाढलेल्या विमान अपघातांमुळे अनेक प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भारततही अनेकजण देशांतर्गत



प्रवासासाठी विमानाची तिकीटे उपलब्ध असतानाही ट्रेन किंवा इतर माध्यमांना प्राधान्य देत आहेत. त्यामुळे विमान प्रवासाविषयीची भीती आणखी वाढताना दिसत आहे. त्यातच आणखी एका बातमीने लोकांची झोप उडवली आहे, ती म्हणजे टेनेरिफहून बर्मिंगहॅमकडे जाणाऱ्या वूर या विमानाच्या पायलटला उड्डाण घेतल्यावर विमान ३० हजार फूट उंचीवर असताना हार्ट अटॅक आला. परंतु, सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सखोल पुनर्निरीक्षण

काही गोष्टी सूर्यप्रकाशाइतक्या स्वच्छ असतात; पण तरीही अनेकांना त्यासाठी प्रमाणपत्र हवे असते. 'सोनारानेच कान टोचलेले बरे' अशी मराठीत एक जुनी म्हण आहे. त्या म्हणीची आठवण अशावेळी आल्याशिवाय राहत नाही. मतदारयाद्यांच्या सखोल पुनर्निरीक्षणासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला, तो याच प्रकारचा आहे. मतदारयाद्या तयार करण्याचे, त्याची वेळोवेळी छाननी करण्याचे, त्यानुसार त्या दुरुस्त्या करण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे. या अवाढव्य कामासाठी आयोगाकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांची मदत घेऊन निवडणूक आयोग आपले हे कर्तव्य पार पाडत असते. त्यात काही चुका होतात. काही त्रुटी राहून जातात. राज्याचे निवडणूक अधिकारी त्याची दखल घेतात आणि आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करतात. तरीही मतदारयाद्यांवर अनेक स्थानिक प्रभाव पडतात आणि घोळ होतात. या स्थानिक प्रभावाला आणि घोळाला सर्व राजकीय पक्षांइतकीच प्रशासकीय यंत्रणेची अगतिकता जबाबदार असते राज्यात सरकार ज्या पक्षाचे असते, त्या पक्षाच्या प्रभावाखाली प्रशासन यंत्रणा असते, हा सर्वसाधारण अनुभव आहे. त्यामुळे, सत्ताधाऱ्यांच्या प्रभावाखालील मतदार याद्यांतूनही अनेकदा सत्ताधाऱ्यांना अनपेक्षित निकाल लागतात. नवे सत्ताधारी मग जुन्या सत्ताधाऱ्यांचा प्रभाव पुसून टाकण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करतात. ज्याच्याकडे तळापर्यंत संघटना आहे, अशा पक्षांना या सगळ्या प्रक्रियेत सर्वसाधारणतः यश मिळते. हा यशापयशाचा भाग निरीक्षण म्हणून ठीक असला, तरी तत्त्वतः यामुळे निवडणूक प्रक्रियेतील न्यायमूल्यावर मोठा आघात होतो. निवडणुकीच्या शुद्धतेवर प्रश्नचिन्ह उभे राहाते. हा तर्क पुढे लोकशाहीच्या मूलभूत उद्दिष्टांना हरताळ फासला जाण्यापर्यंत जातो. त्यामुळे, लोकशाही राज्यव्यवस्थेत निष्पक्ष निवडणूक यंत्रणेला; म्हणजेच निवडणुकांना जेवढे महत्त्व आहे, त्यापेक्षाही अधिक पावित्र्य निर्दोष मतदारयादीला आहे. मतदारयाद्यांच्या या निर्दोषत्वासाठीच केंद्र सरकारने मतदारयाद्यांचे सखोल पुनर्निरीक्षण करण्याचे ठरवले असून आतापर्यंत १३ राज्यांत ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अन्य राज्यांतही हे नियोजित आहे. महाराष्ट्रात सध्या या सखोल पुनर्निरीक्षणाची पूर्वतयारी सुरू आहे. पुनर्निरीक्षणाची प्रक्रिया १३ राज्यांत पूर्ण झाली असली, तरी या मोहिमेला सर्वात जास्त विरोध झाला, तो बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये, विहारमध्ये विरोधी पक्षाने आणि पश्चिम बंगालमध्ये राज्यातील तेव्हांच्या सत्ताधारी तृणमूल काँग्रेसनेच या प्रक्रियेला विरोध केला होता. मतदारयादीच्या सखोल पुनर्निरीक्षणाच्या नावाखाली आमच्या मतदारांनाच मतदान प्रक्रियेतून वगळले जात आहे. केंद्रातले सत्ताधारी याद्वारे सर्वत्र आपला विजय सुकर करत आहेत, असा प्रक्रियेला विरोध करणाऱ्यांचा मुख्य आक्षेप होता. या आक्षेपातूनच विहारमधून काही याचिका दाखल झाल्या होत्या. या याचिकांवर जानेवारीतच सविस्तर युक्तिवाद झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने त्यावेळी राखून ठेवलेला त्यावरचा निर्णय दिला. १२४ पृष्ठांच्या आपल्या विस्तृत निकालपत्रात मुख्य न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांनी काही जगावेगळा निकाल दिला नाही. काही धक्कादायक विधानंही केली नाहीत. देशाच्या निवडणूक याद्या तयार करण्याचा आणि त्या निर्दोष राखण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार त्यांनी मान्य केलाच, पण त्यासाठी कोणती कागदपत्रे ग्राह्य धरावीत हे प्राधान्यक्रमाने ठरवण्याचा अधिकारही त्यांचाच असल्याचे स्पष्ट केले आहे. आधार कार्ड किंवा रेशन कार्ड यांच्या मतदार पात्रतेसाठीच्या वैधतीवरही त्यांनी सविस्तर भाष्य केले आहे. निवडणूक आयोगाला नागरिकत्वाच्या वैधतेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार नाही आणि निवडणुकीत मतदानासाठी अपात्र ठरणे किंवा मतदारयादीत नाव नसणे म्हणजे ती व्यक्ती भारताची नागरिक नाही, असा अर्थ काढला जाऊ शकत नाही, हेही निकालपत्रात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. न्यायालयांचे निकाल बहुधा तांत्रिक असतात. त्यांच्यासमोर मांडल्या गेलेल्या मुद्द्यांबाबतचे स्पष्टीकरण तेवढे त्यात असते. अनेकदा वेगवेगळ्या याचिकांत असलेल्या वेगवेगळ्या मुद्द्यांवर स्पष्टीकरण देताना न्यायालयाची मते वेगवेगळी वाटतात. त्या सर्व मुद्द्यांचा एकत्रित अर्थ लावण्याचे काम नंतर करावे लागते. या निकालपत्रातल्या काही स्पष्टीकरणांबाबत तेच करावे लागणार आहे. '२००३ च्या मतदारयादीत ज्यांची नांवे होती, पण त्यांच्या वैधतेबाबत निवडणूक आयोगाला शंका आली असेल, तर अशी सर्व नांव येत्या एक महिन्याच्या आत नागरिकता अधिनियमांनुसार सक्षम अधिकाऱ्यांकडे पाठवली जावी आणि बिहारमधील येत्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी त्याबाबतचा निर्णय केला जावा', हे या निकालातले मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. 'मतदारयादीचे सखोल पुनर्निरीक्षण' आणि 'राष्ट्रीय नागरिक नोंदणी' या दोन स्वतंत्र बाबी आहेत. त्या एकसारख्या नाहीत. कोणाच्याही नागरिकत्वाच्या वैधतेबाबतचा निर्णय केंद्र सरकारचा सक्षम अधिकारीच घेऊ शकेल. मतदारयादीतून नाव वगळण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम नसेल. त्यासंदर्भात दाद मागता येईल. त्याची सुनावणी होईल. पूर्ण न्यायिक प्रक्रियेने त्याबाबतचा निर्णय अंतिम होईल. विहारमध्ये मतदारयादीतून नांव गळालेल्या ६८ लाख ६६ हजार व्यक्तींना या निर्णयाने त्यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे मिळाली असतील. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना मतदान करता आले नाही; त्याबाबत मात्र वेगळा दिलासा नाही, हेही निकालपत्रातून दिसते आहे. प्रत्यक्षात ते व्यावहारिक नाही, हेही सगळे जाणतातच. जो न्याय बिहारमधल्या वगळलेल्या नावांना, तोच न्याय अन्य राज्यातल्या अशा नावांनाही आहे, हे संबंधितांना समजावून घ्यावे लागेल, हाच याचा अर्थ.

डॉ. सचिन मांडवगणे

# शेतावरील बायोरिफायनरी

**शेतीतील या उरलेल्या भागाकडे आजपर्यंत आपण व्यवस्थापनाच्या समस्येप्रमाणे पाहिले; पण जर त्याकडे संसाधन म्हणून पाहायला सुरुवात केली, तर त्यातून एक नवी अर्थव्यवस्था उभी राहू शकते. व्हीएनआयटी, नागपूर येथील स्वाहा सेंटरने एक वेगळी दिशा स्वीकारली आहे. शेतीतील अवशेष जिथे निर्माण होतात, तिथेच त्यांची प्राथमिक प्रक्रिया करण्यावर भर दिला जात आहे. लहान, सोपी, मॉड्युलर तंत्रज्ञान वापरून काड, पेंढा किंवा सालांचे रूपांतर चारा, खत किंवा इतर उपयुक्त उत्पादनांमध्ये केले जाते.**

सामान्यतः शेतामध्ये किती उत्पादन झाले, असा प्रश्न जेव्हा विचारला जातो, तेव्हा आपण त्याचे उत्तर धान्य, फळे किंवा भाजीपाल्याच्या स्वरूपात देतो. इतके क्विंटल धान्य झाले, इतके टन उसाचे उत्पादन मिळाले, इतक्या पेट्या फळांच्या निघाल्या, असे आपण सांगत असतो. म्हणजेच, शेतजमिनीतून जे बाजारात विकता येते, ज्याला व्यापारी किंमत आहे आणि जे बाजारपेठेत जाऊन विकले जाईल, त्यालाच आपण 'उत्पन्न' मानत आलो आहोत.पण खरोखर शेतात फक्त धान्य उत्पादित होते का? फक्त फळे, भाज्या आणि फुलांचे उत्पादन होते का? याचे उत्तर अर्थातच नाही, असे आहे. धान्यासोबतच शेतात पेंढा, तणस, काड, देठ हे देखील निर्माण होतात. फळबागांमध्ये अनेक फळे पावसामुळे गळून पडतात, काही अर्धवट पिकतात, काही वाहतुकीअभावी खराब होतात. फुलांमध्येही मोठ्या प्रमाणात न विकली गेलेली फुलं उरतात. पण या सगळ्याला आपण उत्पन्न मानत नाही, कारण ते थेट बाजारात विकता येत नाही. प्रत्यक्षात, शेतजमिनीतून निर्माण होणारा प्रत्येक जैविक भाग हा त्या जमिनीचे उत्पादन असतो, तो बाजारात विकला गेला किंवा नाही तरी. फक्त आपल्याकडे त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन नव्हता.आणि कदाचित, शेतीच्या भविष्यातील खरी संधी ही याच 'उरलेल्या' भागामध्ये दडलेली आहे.

### उरलेला भाग खरोखर कचरा आहे का?

शेतशिवारात हा जो उरलेला भाग आहे, ज्याला आपण सामान्यतः काडी-कचरा, गळलेली फळे, खराब झालेला भाजीपाला किंवा टाकाऊ अवशेष म्हणतो, तो खरोखर 'कचरा' आहे का? की योग्य प्रक्रिया आणि योग्य दृष्टिकोन मिळाला, तर तोसुद्धा बाजारात विकला जाणाऱ्या उपयुक्त उत्पादनांचा कच्चा माल बनू शकतो? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण शेतीतील या उरलेल्या भागाकडे आजपर्यंत आपण व्यवस्थापनाच्या समस्येप्रमाणे पाहिले; पण जर त्याकडे संसाधन म्हणून पाहायला सुरुवात केली, तर त्यातून एक नवी अर्थव्यवस्था उभी राहू शकते. समाजाच्या मूलभूत गरजांकडे पाहिले, तर अन्न, वस्त्र आणि निवारा या गोष्टींच्या पलीकडे आजच्या आधुनिक जीवनाला काही गोष्टी अत्यावश्यक आहेत, त्या म्हणजे ऊर्जा, सेंद्रिय रसायने आणि पॉलिमस. ऊर्जा ही केवळ विजेपुरती मर्यादित नाही. वाहतुकीसाठी लागणारे इंधन, उद्योगांसाठी लागणारी ऊर्जा, घरगुती वापरासाठी लागणारी वीज हे सर्व त्यामध्ये येते. त्याचप्रमाणे सेंद्रिय रसायने हे आपल्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचे रासायनिक घटक आहेत. औषधे, अन्नप्रक्रिया, सौंदर्यप्रसाधने, शेती अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांचा उपयोग होतो. पॉलिमर्स तर आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत.मग प्रश्न असा निर्माण होतो की, शेतीतील हा 'कचरा' या गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणता येईल का?

### क्रूड ऑइल ते बायोमास

रिफायनरीचा बदलता प्रवास आज आपल्या या गरजा म्हणजेच इंधन, सेंद्रिय रसायने आणि पॉलिमर्स या पूर्ण कशा होतात? याचे उत्तर आहे क्रूड ऑइल.आजची आधुनिक अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर पेट्रोलियमवर आधारित आहे. क्रूड ऑईल पेट्रोलियम रिफायनरीमध्ये प्रक्रिया केले जाते आणि त्या प्रक्रियेतून विविध 'प्लॅटफॉर्म केमिकल्स' तयार होतात. त्यांच्यापासून पेट्रोल, डिझेल, गॅस, प्लॅस्टिक्स, विविध रसायने, सेंद्रिय रसायने आणि असंख्य पॉलिमर्स तयार होतात.म्हणजेच, आपण ज्या मूलभूत गरजांविषयी बोललो त्या म्हणजे ऊर्जा, सेंद्रिय रसायने आणि पॉलिमस. आज प्रामुख्याने पेट्रोलियम रिफायनरीच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत.पण इथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. जर पेट्रोलियम रिफायनरी क्रूड ऑइलपासून ही मूल्यनिर्मिती करू शकते, तर जैविक कच्च्या मालापासून विशेषतः शेतीतील अवशेषांपासून अशीच मूल्यनिर्मिती शक्य नाही का?



काडी, पेंढा, साली, गळलेली फळं, खराब झालेला भाजीपाला हे सर्व जर योग्य प्रक्रियेतून गेले, तर त्यांच्यापासून ऊर्जा, ऑरगॅनिक सिड्स, जैवआधारित पॉलिमर्स आणि इतर मूल्यवर्धित पदार्थ तयार होऊ शकतात. याच प्रश्नातून 'पेट्रोलियम रिफायनरी'पासून 'बायोरिफायनरी'कडे जाण्याचा प्रवास सुरू होतो.

### बायोरिफायनरी म्हणजे काय?

बायोरिफायनरी ही संकल्पना प्रत्यक्षात पेट्रोलियम रिफायनरीसारखीच आहे.पेट्रोलियम रिफायनरीमध्ये कच्चे तेल हे मूळ कच्चा माल म्हणून वापरले जाते. या कच्च्या तेलावर विविध प्रक्रिया केल्या जातात आणि त्यातून क्रमाने अनेक प्रकारची उत्पादने तयार होतात, जसे की, पेट्रोल, डिझेल, इथिलीन, प्रोपिलीन, बेंझीन, टोल्युएन, मिथेन वायू, हायड्रोजन वायू इत्यादी. याच तत्त्वावर आधारित संकल्पना म्हणजे बायोरिफायनरी. फरक इतकाच, की येथे कच्च्या तेलाऐवजी जैविक कच्चा माल वापरला जातो.आपल्या शेतीच्या संदर्भात हा जैविक कच्चा माल म्हणजे कृषी अवशेष म्हणजेच काड, पेंढा, साले, पल्प इत्यादी. या अवशेषांवर योग्य प्रक्रिया केल्यास त्यातून ऊर्जा, पोषणद्रव्ये आणि इतर मूल्यवर्धित उत्पादने तयार करता येतात. थोडक्यात, सांगायचे झाले, तर बायोरिफायनरी म्हणजे जैविक कचऱ्याचे मूल्यात रूपांतर करण्याची विज्ञानाधारित पद्धत आहे.

### शेतीतील अवशेषांचे दोन प्रवाह

शेतीतील अवशेषांकडे बारकाईने पाहिले, तर त्यांचे स्वरूप एकसारखे नसते. यामध्ये दोन प्रकार स्पष्ट दिसतात, एक म्हणजे धान्य पिकांमधून उरणारे काड, पेंढा आणि देठ यांचा 'ब्राऊन' अवशेष; आणि दुसरा म्हणजे फळे, भाज्या, फुले यांमधून निर्माण होणारा साले, पल्प आणि ओलसर कचऱ्याचा 'ग्रीन' अवशेष.या दोन्ही प्रकारांच्या रचनेत, आर्द्रतेत आणि वापराच्या शक्यतांमध्ये मूलभूत फरक आहे. त्यामुळे त्यांच्याकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरत नाही. प्रत्यक्षात, हे दोन्ही अवशेष दोन वेगवेगळ्या मूल्यवर्धन मार्गांकडे नेतात, जणू दोन स्वतंत्र, मॉड्युलर बायोरिफायनरी प्रणालींसारखे.

'ब्राऊन' अवशेषांमध्ये प्रामुख्याने लिग्नोसेल्युलोजिक घटक असल्यामुळे त्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या, तुलनेने कमी मूल्याच्या पण जास्त प्रमाणातील उत्पादनांसाठी होतो. जसे की, चारा, बायोगॅस, कंपोस्ट बायोक्रूड व बायोचार. याउलट 'ग्रीन' अवशेषांमध्ये पाणी, साखरेचे अंश, बायोक्टिव्ह संयुगे आणि नैसर्गिक रसायने असल्यामुळे त्यातून कमी प्रमाणात पण अधिक मूल्य असलेली उत्पादने तयार होऊ शकतात. जसे की न्यूट्रास्युटिकल्स, फंक्शनल घटक किंवा विशेष रसायने.

### बायोरिफायनरीचे प्रक्रिया मार्ग

ब्राऊन असो किंवा ग्रीन, कोणतीही बायोरिफायनरी उभी करायची असेल, आणि शेतीतील अवशेषांचे मूल्यवर्धन करायचे असेल, तर त्यामागे काही मूलभूत प्रक्रिया कार्यरत असतात. प्रत्यक्षात पाहिले, तर शेतीतील जैविक कचऱ्याचे उपयुक्त उत्पादनांमध्ये रूपांतर करण्यासाठी साधारणतः तीन प्रमुख प्रक्रिया मार्ग वापरले जातात.पहिला मार्ग म्हणजे बायोलॉजिकल रूट. या पद्धतीमध्ये सूक्ष्मजीवांचा उपयोग करून जैविक पदार्थांचे विघटन किंवा रूपांतर केले जाते. ही प्रक्रिया ऑक्सिजनच्या उपस्थितीतही होऊ शकते आणि ऑक्सिजनशिवायही होऊ शकते. उदाहरणार्थ, कंपोस्टिंगमध्ये ऑक्सिजन उपस्थित असतो, तर बायोगॅस निर्मितीमध्ये ऑक्सिजनचा अभाव असतो. फर्मेंटेशन, सॉलिड स्टेट फर्मेंटेशन, सबमर्स फर्मेंटेशन अशा विविध जैविक प्रक्रिया वापरून कचऱ्याचे मूल्यवर्धन केले जाते. या प्रक्रियांमधून ऊर्जा, सेंद्रिय आम्ले, एन्झाइम्स, पोषणद्रव्ये आणि इतर उपयुक्त संयुगे तयार होऊ शकतात.

दुसरा मार्ग म्हणजे थर्मोकेमिकल रूट. या प्रक्रियेमध्ये जैविक पदार्थांना उष्णता दिली जाते आणि त्यातून विविध प्रकारची उत्पादने मिळवली जातात. ही प्रक्रिया ऑक्सिजनच्या उपस्थितीत किंवा अनुपस्थितीत होऊ शकते. उदाहरणार्थ, पायरोलिसिसमध्ये ऑक्सिजनशिवाय उष्णता दिली जाते, तर कंबशनमध्ये ऑक्सिजनच्या उपस्थितीत ज्वलन केले जाते. गॅसिफिकेशन, पायरोलिसिस आणि कंबशन या थर्मोकेमिकल प्रक्रियांद्वारे ऊर्जा, वायू, बायोक्रूड, बायोचार आणि इतर उपयुक्त पदार्थ तयार होतात.


तिसरा महत्त्वाचा मार्ग म्हणजे मेकॅनिकल किंवा फिजिकल प्रोसेसिंग. प्रत्यक्षात कोणत्याही बायोरिफायनरीची सुरुवात अनेकदा याच प्रक्रियांपासून होते. काड किंवा जैविक अवशेषांचा आकार कमी करणे, चाळणीद्वारे वर्गीकरण, वेगळेकरण, मिश्रण, वाळवणे अशा प्रक्रिया या टप्प्यात येतात. उदाहरणार्थ, काडाचा भुगा केल्याशिवाय पुढील जैविक किंवा थर्मोकेमिकल प्रक्रिया प्रभावीपणे होत नाहीत. प्रत्यक्षात, कोणती प्रक्रिया वापरायची हे त्या अवशेषांच्या स्वरूपावर आणि आपल्याला कोणते अंतिम उत्पादन हवे आहे, यावर अवलंबून असते. काही वेळा केवळ एकाच प्रक्रिया मार्गाचा वापर होतो, तर अनेकदा बायोलॉजिकल, थर्मोकेमिकल आणि मेकॅनिकल या तिन्ही प्रक्रियांचा एकत्रित वापर केला जातो.

### शेतावरील मिनी बायोरिफायनरी

तंत्रज्ञान शेतात नेण्याची गरजही कल्पना जितकी आकर्षक वाटते, तितकीच तिची अंमलबजावणी आव्हानात्मक आहे. काड व पेंढा हलका असल्यामुळे त्याची वाहतूक आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. तर फळे व भाज्यांचा कचरा इतका ओलसर असतो की त्याला दूर नेणे पर्यावरणीयदृष्ट्याही योग्य ठरत नाही.म्हणूनच, उपाय शोधताना एक मूलभूत तत्त्व समोर येते ते म्हणजे कचरा हलवण्याऐवजी तंत्रज्ञान हलवले पाहिजे. व्हीएनआयटी, नागपूर येथील स्वाहा सेंटरने एक वेगळी दिशा स्वीकारली आहे. शेतीतील अवशेष जिथे निर्माण होतात, तिथेच त्यांची प्राथमिक प्रक्रिया करण्यावर भर दिला जात आहे. लहान, सोपी, मॉड्युलर तंत्रज्ञान वापरून काड, पेंढा किंवा सालांचे रूपांतर चारा, खत किंवा इतर उपयुक्त उत्पादनांमध्ये केले जाते. याच विचारातून या प्रक्रियेमध्ये स्थानिक मजूर, स्थानिक संसाधने आणि स्थानिक गरजा यांचा समावेश होतो. पुढील उच्च मूल्य प्रक्रिया क्लस्टर स्तरावर केली जाऊ शकते, पण मूल्यनिर्मितीची सुरुवात शेतावरच होते. शेतावरची मिनी बायोरिफायनरीमुळे एक महत्त्वाचा बदल घडतो. शेत केवळ अन्न उत्पादनाचे ठिकाण राहत नाही, तर ते एक 'मिनी बायोरिफायनरी' बनते. एकाच जमिनीवरून अन्न, चारा, ऊर्जा आणि खत यांची निर्मिती होते. हा बदल केवळ आर्थिक नाही, तर पर्यावरणीय आणि सामाजिकही आहे. आजपर्यंत आपण शेतीकडे अन्न उत्पादनाच्या दृष्टीने पाहिलं. पण भविष्यातील शेती ही केवळ धान्य, फळे किंवा भाजीपाला निर्माण करणारी व्यवस्था राहणार नाही. ती ऊर्जा, पोषण, रसायने आणि उद्योगनिर्मिती करणारी एक संपूर्ण जैवआधारित अर्थव्यवस्था बनू शकते. त्या नव्या अर्थव्यवस्थेची सुरुवात शेतात उरलेल्या 'कचऱ्या'कडे नव्या नजरेने पाहण्यापासून होईल. पुढील लेखांमध्ये आपण ग्रीन आणि ब्राऊन बायोरिफायनरी संकल्पनांकडे अधिक सविस्तरपणे पाहणार आहोत.

- प्रफुल्ल दाढे,
९०२८३ ८६७९८
- आदित्य पोटोडे,
९८३४९ ०२३५०
(लेखक स्वाहा सेंटर ऑफ एक्सलन्स, विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (व्हीएनआयटी), नागपूर येथे केंद्र प्रमुख आहेत)

## शेतकऱ्यांचे नियोजित शोषण थांबवा



**प्रति,**
**अमितजी शाह**
गृहमंत्री आणि सहकार मंत्री.
भारत सरकार नवी दिल्ली.

**विषय**-आम्ही पिठीसाखरेच्या प्रत्येक पोत्यासाठी ६० रुपये द्यायला तयार आहोत. पण,आम्हाला सोयाबीन, मका, धान्य आणि तेलासाठी किमान आधारभूत किंमत मिळत नाही.

**अभिवादन,**

आपण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मंत्र्यांसोबत कांदा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांवर चर्चा केली. आपण आणि मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या उपक्रमाचे आम्ही स्वागत करतो.आमचे मुख्यमंत्री तुम्हाला भेटले.साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी), जो सध्या ३१ सेंट प्रति किलो आहे, तो १० रुपये प्रति किलोपर्यंत कमी करण्याची मागणी आहे. या मागणीला आमचा विरोध नाही. आम्ही या विषयावर १३ जानेवारी २०२५ रोजी देवेंद्रजी यांना पत्र लिहिले होते. आम्ही ते पुन्हा सादर करत आहोत.

आज साखरेची किमान आधारभूत किंमत ३१ प्रति किलो आहे. मात्र, आम्ही साखर ४५ ते ५० रु प्रति किलो दराने विकत आहोत. याचा अर्थ असा की, साखरेची किमान आधारभूत किंमत ३१ रुपये प्रति किलो असूनही, कारखाने ती जास्त दराने विकू शकतात. ३१ रुपयांच्या किमान आधारभूत किंमतीचा अर्थ असा आहे की, कारखान्यांनी ऊस यापेक्षा कमी दराने विकू नये. आता, जेव्हा किमान आधारभूत किंमत ४१ रुपये प्रति किलो असेल, तेव्हा ऊस कारखाने ४१ रुपयापेक्षा कमी दराने ऊस विकू शकणार नाहीत. त्यामुळे, आम्हा ग्राहकांना ५५-६० रुपये प्रति किलो दराने साखर खाण्याची मानसिकता करावी लागेल. आमचा याला विरोध नाही. आमची चिंता फक्त एवढीच आहे की, जर सरकार उसासाठी संघीय आधारभूत किंमत देण्यास इतके इच्छुक असेल, तर ते सोयाबीन, कापूस, मका, गहू आणि तेलबियांसह इतर सर्व शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचे संरक्षण का देत नाही?

माननीय महोदय, १९९०-१९९१ पासून आपल्या देशात मुक्त अर्थव्यवस्थेचा नारा दिला जात आहे. परंतु ऊस आणि साखरेची अर्थव्यवस्था कधीच मुक्त अर्थव्यवस्था नव्हती. आयात शुल्क आणि निर्यात अनुदानाद्वारे उसाच्या आयातीला संरक्षण दिले गेले आहे. किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याची मागणी म्हणजे याच संरक्षणाची मागणी आहे. आयातीमुळे इतर पिकांच्या किमती कमी होतात की नाही? आमचा तुम्हाला एक विनम्र प्रश्न आहे: शेतकऱ्यांमध्ये हा भेदभाव का? कृपया आम्हाला मार्गदर्शन करा. हा अन्याय आहे का?

**विजय जावंधिया**
शेतकरी संघटना पाईक
मोबाईल: ०९४२१७२७९९८

## नैसर्गिक शेती हरित सोन्याची संधी

आखातातील युद्धामुळे अनेक देशांच्या लोकांच्या जीवनात मोठा संघर्ष निर्माण झाला आहे. भारतात खनिज तेल, नैसर्गिक वायू यांच्या आयातीच्या अभावामुळे ऊर्जा क्षेत्रावर युद्धाचा परिणाम दिसून आला आहे. नैसर्गिक वायू हा खत निर्मितीचा मुख्य कच्चा माल असल्याने गॅस तुटवण्याचा थेट परिणाम खतांच्या उत्पादनावर होतो. भारताची खतांच्या संदर्भातली स्थिती पाहिली तर आपण पूर्णपणे स्वावलंबी नाही हे स्पष्ट आहे. भारत युरिया खताचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करतो मात्र फॉस्फेट आणि पोटॅश या महत्त्वाच्या घटकांसाठी देशाला मोठ्या प्रमाणात आयात करावी लागते. ही आयात मुख्यतः आखातातील आणि इतर काही देशांवर अवलंबून आहे. इराण अमेरिका युद्ध दीर्घकाळ चालत राहिल्यामुळे खतांच्या आयातीवर परिणाम होऊ लागला आहे. परिणामी शेतकऱ्यांना आवश्यक असलेली खते वेळेवर मिळत नाही आणि ती अत्यंत महागही आहे. त्यामुळे शेतीचा खर्च वाढत आहे, उत्पादन घटते आणि शेवटी अन्नधान्याच्या किमती वाढवून सामान्य नागरिकांच्या ताटावर थेट परिणाम होऊ शकतो.

भारतामध्ये गेल्या काही दशकापासून रासायनिक खताचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. हर्मुजच्या निमित्ताने भारताने खत निर्मितीत आत्मनिर्भर होणे अधिक महत्त्वाचे ठरते.भारताने खतांच्या संदर्भात परकीय अवलंबित्व कमी केले पाहिजे. जागतिक संकटाच्या काळात खतांची आयात बंद झाली तर देशातील अन्नसुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो. सरकार खतांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी विविध उपाययोजना राबवत आहे. नवीन प्रकल्प उभारले जात आहे आणि शेतकऱ्यांना अनुदानाच्या माध्यमातून सहाय्य केले जात आहे. तथापि या प्रयत्नानंतरही पूर्ण स्वावलंबन साध्य झालेले नाही हे वास्तव आहे.

एका माहितीनुसार वर्ष २००० ते २००१ या काळात देशात सुमारे ३४.५ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर होत होता. वर्ष २०२० ते २०२१ मध्ये ८२ टक्के इतकी वाढ झाली आणि प्रतिवर्षी या दोन ते तीन टक्क्यांनी वाढ होत आहे. सततच्या रासायनिक खतांच्या वापरामुळे मातीची नैसर्गिक सुपीकता कमी होत आहे.एकीकडे भारत रासायनिक खतांची आयात करतो तर दुसरीकडे शेण आणि त्यापासून बनवलेले जैविक खत यांची आखाती देशासह अनेक देशांना निर्यात करत आहे.रासायनिक खतांच्या विकृतीवर दीर्घकालीन उपाय म्हणून सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीकडे वळण्याची आवश्यकता प्रकर्षाने लक्षात येते. नैसर्गिक शेती ही केवळ पर्यावरण पूरक पद्धत नाही तर ती शेतकऱ्यांसाठी आर्थिक दृष्ट्या लाभाची आहे.तथापि एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात केवळ नैसर्गिक शेतीच्या आधारे अन्नधान्याची आवश्यकता भागवता येईल का? याचे उत्तर सरळ होकारार्थी नाही. आरंभी नैसर्गिक शेतीमध्ये उत्पादन कमी होण्याची शक्यता असते.

**लीना गाडगीळ**

# वादळासह अवकाळी पावसाचा महावितरणला मोठा फटका

## वाहिन्यांचे पोल पडल्याने अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित

## महावितरणच्या शेकडो कर्मचाऱ्यांचे युद्धपातळीवर दुरुस्ती कार्य सुरू

**अमरावती/का.प्र.**

अमरावती शहरासह ग्रामीण भागात गुरुवारी दुपारनंतर आलेल्या वादळ, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने तसेच वीज वाहिन्या तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. विशेषतः भातकुली तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. महावितरणचे युध्द पातळीवर दुरूस्ती कार्य सुरू असून या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.



गारा आणि वादळाच्या तडाख्यामुळे लघुदाब वाहिन्यांसह ११ केव्ही व ३३ केव्ही वीजवाहिन्यांचे खांब पडल्याने वलगाव, टाकरखेडा संभू, खार तळेगाव, भातकुली तसेच बडनेरा परिसरातील अनेक गावांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे.

काही ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. महावितरणच्या प्राथमिक माहितीनुसार, ३३ केव्ही अकोली फिडरसह ११ केव्ही सायत, निंभा, भातकुली, गणोजादेवी, सोलर भातकुली आणि आसरा फिडरवरील वीज खांब व वाहिन्यांचे नुकसान झाले असून महावितरणचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या शेकडो कर्मचाऱ्यांसह तीन कंत्राटदार एजन्सी युद्धपातळीवर कार्यरत आहेत. रात्रीच्या अंधारामुळे पेट्रोलिंग आणि दुरुस्ती कार्यात अडथळे निर्माण होत असले तरी टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, वीज ग्राहकांनी या काळात संयम व सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.

# अंजनगाव बारीत पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न

## नागरिकांच्या आरोग्यावर गदा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

गावातील नागरिकांना मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा दर्जा दिवसेंदिवस अधिकाधिक खालावत असून गढूळ, दुर्गंधीयुक्त आणि अशुद्ध पाणी नळातून येत असल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोटाचे विकार, घशाचे आजार आणि त्वचारोगांच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, जलस्वराज्य-२ योजनेअंतर्गत तब्बल ८ कोटी रुपयांचा खर्च करूनही गावाला केवळ ४ ते ५ दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय सुरूच आहे. नळातून योग्य प्रमाणात पाणी येत नसल्याने अनेकांना पाण्यासाठी मशिनरी व पंपाचा आधार घ्यावा लागत आहे; त्यामुळे आर्थिक भारही वाढला आहे.याशिवाय, पाणीपुरवठ्याची जबाबदारी कंत्राटी कामगारांवर टाकल्याने पाणी सोडण्याच्या वेळेत सातत्य नसून कधीही अचानक पाणी सोडले जाते. यामुळे रोजगार, शेती व घरगुती कामांमध्ये नागरिकांची होणारी तारांबळ वाढली आहे. पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही ठोस योजना नसल्याने गावकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने दखल घेऊन स्वच्छ, सुरक्षित व नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे. अन्यथा व्यापक आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.



'परवा नळ आल्यावर पिवळे व क्षारयुक्त पाणी येत होते. असे पाणी पिण्यास अजिबात योग्य नाही. ग्रामपंचायत मात्र पाणीपट्टीकर वसुलीसाठी सतत तगादा करते; पण नागरिकांना योग्य सेवा नेमकी केव्हा मिळणार, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.'

**-निलेश चांदुरे,** नागरिक, अंजनगाव बारी

'८ कोटींची जलस्वराज्य–२ योजना आणि कोंडेश्वरहून ४६ लाखांचा पाणिपुरवठा या सर्वांत केवळ करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी झाली; पण पिण्याचे स्वच्छ पाणी मिळण्यात सत्ताधारी–विरोधक दोघेही पूर्णपणे अपयशी ठरले.'

**नरेंद्र बैस,** अंजनगाव बारी .



**अमरावती**-तपोवनच्या विकास आराखड्यासाठी दहा कोटी रुपये देण्याचे विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करावी त्यासाठी आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांनी पाठपुरावा करावा असे निवेदन अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी देऊन तपोवनच्या विकासात्मक समस्येवर सविस्तर चर्चा केली. याप्रसंगी तपोवनचे सचिव सहदेव गोळे, उपसचिव ऋषिकेश देशपांडे हे उपस्थित होते.

## अधिक मास पर्वावर भजनाचा कार्यक्रम

**कुऱ्हा**-गेल्या १७ मे २०२६ पासून सुरु झालेल्या अधिक मास पर्वावर विदर्भाचे तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री.अंबिका देवी संस्थान मध्ये अधिक मास महिन्यात येणाऱ्या पंधरवाडी एकादशीनिमीत्त वारकरी भजनी मंडळ पंचकोशीतील आणि आर्वी तालुक्यातील धनोडी बहादरपूर येथील श्री संत गजानन महिला भजनी मंडळ यांचे वतीने भरगच्च भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. महिला मंडळाच्या भजन गायणाऱ्या महिला यांच्या मधूर स्वरातून अतिशय सुंदर भजनाने भाविक मात्र भारावून गेलेत.महिलांच्या अध्यक्षा कुल्पना ठाकरे, सचिव चित्रा टोमणे, सदस्या सुशिला चौधरी, नलू कापसे, साना सुनिता इसळ, सविता मसाले वैशाली उमप, मंदा ठाकरे, बेबी खंडाते, तसेच तबला वादक मंथन शेराम, हार्मोनियम वादक आदित्य कडू आदी महिलांचा सहभाग होता.

# मेलोडी वाटून केंद्र सरकारच्या महागाईचा काँग्रेसने केला विरोध

**दर्यापूर/वार्ताहर**

दर्यापूर येथे तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या वाढत्या महागाईविरोधात अनोखे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात नागरिकांना तसेच प्रशासनाला मेलोडी चॉकलेट वाटून केंद्र सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला.

हे आंदोलन अमरावती लोकसभेचे खासदार बळवंत वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी खासदार वानखडे यांनी तहसीलदार रवींद्र कानडजे यांना मेलोडी चॉकलेट देत निवेदन सादर केले आणि केंद्र व राज्य सरकारच्या महागाईविरोधी धोरणांवर टीका केली.

खासदार बळवंत वानखडे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन कठीण झाले असून पेट्रोल, डिझेल, गॅस तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत आहेत. याविरोधात काँग्रेस पक्ष जनआंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांचा आवाज शासनापर्यंत पोहोचवत आहे.आंदोलनात सुनीलभाऊ गावंडे, श्रीरंग पाटील अरबट, बाळासाहेब टोळे, दिनकर गायगोले, आतिश शिरभाते, भारतभाऊ आठवले, संजू बेलोकार, इंजि. नितेश वानखडे, शिवाजीराव देशमुख, अस्लमभाई गाणीवाले, सागर देशमुख यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, खरेदी-विक्री संघाचे पदाधिकारी, युवक काँग्रेसचे सदस्य, नगरसेविका आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गोष्ट दुसऱ्या महायुद्धाची

**युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या थेट भूमीवरून**

**भाग ६**

पहिल्या महायुद्धात जर्मनीची हार झाल्यानंतर मित्र राष्ट्रांनी (ब्रिटन.फ्रान्स.अमेरिका ई.)जर्मनीवर अत्यंत जाचक अटी लावल्यात त्यामुळे जर्मनीत पहिले महायुद्ध संपताच एक बदल्याची भावना निर्माण झाली. त्याचेच रूपांतर दुसऱ्या महायुद्धात झाले.जर्मनीने सर्वात अगोदर ३ सप्टेंबर १९३९ ला पोलंडवर हल्ला केलां जर्मनीने रशियावर हल्ला करू नये व पोलंडचा पश्चिमेकडील प्रदेश मिळविण्यासाठी रशियाने १५च दिवसात जर्मनीशी मैत्री करून पोलंडवर आक्रमण केले.पोलंड शरण येताच जर्मनी व रशिया यांनी पोलंड चा प्रदेश आपसात वाटून घेतला.पोलंड ब्रिटनचा मित्र देश असूनसुद्धा ब्रिटनचे पंतप्रधान चेम्बरलेन यांनी जर्मनीविरुद्ध तडजोडीची भूमिका अवलंबली त्यामुळे ब्रिटिश चे राजे यांनी विन्स्टन चर्चिल यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली.हिटलर नि फ्रान्स वर हल्ला करून फ्रान्स ला सुद्धा पराभूत केले .फ्रांसने पहिल्या महायुद्धात जर्मनीला पराभूत केल्यानंतर कोपेंच्या जंगलातील आगगाडीच्या डब्यात अपमानास्पद करार केला होता हिटलरने स्वतः त्या जंगलातील त्याच रेल्वेच्या डब्यात जाऊन फ्रान्स सोबत करार केला व पहिल्या महायुद्धातील अपमानास्पद कराराचा बदला घेतला.

**जगातील प्रमुख राष्ट्र दोन गटात विभागली**

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीकडून सुरवातीला रशिया इटली;इराण; हंगेरी;बल्गेरिया तर ब्रिटन सोबत अमेरिका; फ्रान्स; नॉर्वे; डेन्मार्क;हॉलंड ही राष्ट्र होती.तर पोर्तुगाल ;स्पेन;स्वीडन; स्वितसरलँड ही राष्ट्रे तटस्थ होती.हिटलरने युरोपमधील फ्रान्स सोबतच नॉर्वे.डेन्माक.हौंलंड.व बेल्जियम वर सहज विजय मिळविला.

**युरोपमधील विजयानंतर जर्मनीचे रशियावर आक्रमण**


महायुद्धाच्या सुरवातीस रशिया जर्मनीसोबत होता परंतु हिटलरला रशियाचा साम्यवाद मुळीच मान्य नव्हता तसेच रशियात असलेले भरपूर प्रमाणातील खनिज ताब्यात घेण्यासाठी हिटलरने रशियावर सुद्धा हल्ला केला.जर्मनीच्या सैनिकांना रशियातील अत्यंत कडाक्याची थंडी सहन होऊ शकली नाही अतोनात बर्फामुळे सैनिकांना अन्नपुरवठा होणे अडचणीचे झाल्यामुळे जर्मनीचे सैनिक उपासमारीमुळेच मृत्यूमुखी पडायला लागले.

**जपानसुद्धा २ वर्षानंतर महायुध्दात उतरला**

पहिल्या महायुद्धात जपान हा ब्रिटन.अमेरिका.फ्रान्स ह्या गटासोबत होता परंतु पहिल्या महायुद्धात विजय मिळाल्यानंतर सुद्धा आपल्याला ब्रिटन.अमेरिकेने जपानच्या वाट्याला काहीच दिले. नाही ही खंत जपानमध्ये असल्यामुळे जपानने इंग्लंड.अमेरिका विरुद्ध ७डिसेंबर १९४१ला युद्ध पुकारले व काही अवधीतच.

हाँगकाँग सिंगापूर.अंदमान.ब्रम्हदेश. बाली जावा व ईस्ट इंडीज वर जपानने विजय मिळविला.जपानचे ब्रिटन प्रमाणेच अमेरिका सुद्धा लक्ष असल्यामुळे फिलिपिन्स मधील.पर्ल हार्बरवरील अमेरिकेच्या युद्ध स्थळावर प्रचंड हल्ला केला.जपानने फिलिपिन्स वर हल्ला केला ज्यामध्ये जपानचा विजय झाला व अमेरिकेने शरणागती पत्करली.

जपानने ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या हाँगकाँग वर हल्ला करून विजय मिळविला ज्यात ब्रिटिशांनी शरणागती पत्करली.जपानने सिंगापूर.अंदमान.ब्रम्हदेश वर सहज विजय मिळविला.



**जपानचा भारतावर आक्रमण करण्याचा अपयशी प्रयत्न**

जपानने भारता शेजारील तब्बल ९देश जिंकल्यानंतर पूर्वेकडील मणिपूर.नागालँड भागाकडून भारतात येण्यास सुरवात केली परंतु अतिशय दाट जंगल व कठीण असा डोंगराळ भागामुळे प्रवेश करणे कठीण जाई अशातच अमेरिका व ब्रिटन यांनी जपानी सैनिकांवर विमानाद्वारे हल्ला करून जपानचे भारतातील प्रवेशाची योजना असफल केली.

**इटलीचा हुकुमशहा मुसोलिनी यास इटलीतील जनतेनेच ठार केले**

ब्रिटन व अमेरिका यांनी इटलीवर मोठ्या प्रमाणात हल्ला केला त्यामुळे मुसोलिनी सैनिकी मदत मागण्यासाठी हिटलरकडे गेला परंतु जर्मनी ची प्रत्येक आघाडीवर तसेच रशियामध्ये हार होत असल्यामुळे हिटलर मुसोलिनीला मदत करू शकला नाही .मुसोलिनीला आपला पराभव दिसू लागला त्यामुळे मुसोलिनी यांनी पत्नीसह वेशांतर करून स्वित्झर्लंडला पळून जाण्यासाठी प्रयत्न केला परंतु इटलीतील मुसोलिनी विरोधी नागरिकांनी त्यास पकडून ठार केले व मृत शरीर मुख्य चौकात उलटे टांगून ठेवले.

**हुकुमशहा हिटलरची आत्महत्या**

सर्वत्र पराभव दिसत असताना व इटलीतीली नागरिकांनी मुसोलिनीला ज्या पद्धतीने मारले त्याची धास्ती हिटलर ने घेतली.आपण मृत पावल्यानंतर आपल्या शरीराचा एकही भाग सुद्धा कुणालाच मिळू नये याच्या सूचना हिटलरने स्वतःच्या अत्यंत मर्जीतील लोकांना दिल्यात व ३०एप्रिल १९४५ ला बंकरमध्ये स्वतः गोळी मारून व पत्नीने विष घेऊन आत्महत्या केली.आत्महत्या करताच हिटलर यांच्या विश्वासू कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शरीरावर पेट्रोल टाकून तात्काळ दोन्ही मृत शरीर जाळून टाकले व निर्माण झालेली राख सुद्धा अन्यात स्थळी विसर्जित करण्यात आली.हिटलरने आत्महत्या करताच जर्मन सैनिकांनी दहाव्या दिवशी म्हणजेच ९मे २०४५ला रशियाला शरणागती पत्करली.

**जपानवर अणुबॉम्ब हल्ला व दुसरे महायुद्ध समाप्त**

हिटलरने आत्महत्या केल्यानंतर जर्मन सैनिकांनी सर्वत्र शरणागती पत्करली.परंतु जपान अजूनही अमेरिका व ब्रिटनच्या युद्ध तळावर हल्ले करतच होता .दोन्ही देशांना मागील सहा वर्षापासून चालू असलेले महायुद्ध लवकर संपवायचे होते त्यामुळे अमेरिकेने६ऑगस्ट ला हिरोशिमावर पहिला तर ९ऑगस्ट १९४५ला नागासकीवर दुसरा अणुबॉम्ब टाकला ज्यात जपानची न भूतो न भविशोतो हानी झाली ज्यामुळे जपानने तात्काळ शरणागती पत्करली.१९३९ते १९४५असे ६वर्ष चाललेल्या महायुध्दात जवळपास सैनिक व नागरिकांसह ८कोटी नागरिक मृत्यूमुखी पडले.

■ **अशोक कविटकर**

वन अधिकारी (निवृत्त)

ह.मु.ऑस्टिन टेक्सास.

# अंजनगाव शहराचा होणार कायापालट

## उन्हाच्या झळा कमी करण्यासाठी नगराध्यक्षांसह वृक्षप्रेमी सरसावले

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

यावर्षीच्या कडाक्याच्या उन्हाने अंजनगावकर चांगलेच होरपळून निघाले आहेत. वाढते सिमेंटचे रस्ते आणि घरांच्या बांधकामांमुळे शहराचे तापमान दरवर्षीपेक्षा जास्त वाढले आहे. या वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आता नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी पुढाकार घेतला असून, शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला आहे.

शहरात सिमेंट काँक्रीटचे रस्ते आणि मोठमोठी बांधकामे झाल्यामुळे झाडांची संख्या घटली आहे. परिणामी, वातावरणात मोठे बदल होऊन उष्णतेचा त्रास वाढला आहे. ही बाब लक्षात घेऊन नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी 'जिथे खुली जागा, तिथे झाड' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून मोहीम राबवण्याचे ठरवले आहे. त्यांच्या या संकल्पाला शहरातील अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि वृक्षप्रेमींनी पाठबळ दिले आहे.



या वृक्षारोपण मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते पवन सारडा यांनी वृक्षप्रेमींचा एक विशेष ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून सर्व समाजसेवक आणि तरुणांना एकत्र आणले जात असून, सर्वांनी या 'हरित अंजनगाव' मोहिमेत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.येणाऱ्या पावसाळ्यात शहराच्या विविध भागात, शाळांच्या मैदानावर आणि सार्वजनिक खुल्या जागांवर मोठ्या प्रमाणावर झाडे लावून त्यांचे जतन केले जाणार आहे. या निर्णयामुळे अंजनगावच्या नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, निसर्गाच्या संवर्धनासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. अंजनगाव सुर्जी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून प्रा. संजय देशमुख आणि रवींद्र हंतोडकर हे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सातत्याने वृक्षारोपणाचे कार्य करत आहेत. आता त्यांना नगराध्यक्षांच्या रूपाने खंबीर साथ मिळाल्याने या मोहिमेला मोठी गती मिळणार आहे.

# सहा महिन्यांपासून सोलर मीटर जळाले

## महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे ग्राहक त्रस्त

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

महावितरणाच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील एका सोलर ग्राहकाचे मीटर गेल्या पाच ते सहा महिन्यांपूर्वी जळाले असून, वारंवार अर्ज, तोंडी विनंत्या आणि अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही अद्याप नवीन मीटर बसविण्यात आले नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संबंधित ग्राहकांनी महावितरणचे कनिष्ठ अभियंता चंचल सदाफळे यांच्याकडे अनेकदा संपर्क साधला. प्रत्येक वेळी 'तुमचे मीटर आले आहे', 'वलगावपर्यंत पोहोचले आहे', 'उद्या लावून देतो' अशी आश्वासने देण्यात आली; मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झाली नाही, असा आरोप ग्राहकांनी केला आहे.सोलर मीटर बंद असल्यामुळे सोलर निर्मितीचे पॉईंट, रीडिंग आणि वीज वापराची माहिती दिसत नसल्याने ग्राहक आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत. रीडिंग घेण्यासाठी कर्मचारी येतात; मात्र जळालेले मीटर पाहून परत जात असल्याचेही नागरिकांनी सांगितले.यासंदर्भात पडोळे मॅडम यांनाही लेखी अर्ज देण्यात आला असून 'पाहतो','पत्र दिल' अशी उत्तरे मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र महिनोनमहिने समस्या कायम असल्याने नागरिकांचा संयम सुटू लागला आहे.स्थानिक नागरिकांनी आरोप केला की, महावितरणचे काही अधिकारी व कर्मचारी केवळ निवेदन स्वीकारण्यापुरते मर्यादित राहिले असून, प्रत्यक्ष काम मात्र होत नाही. 'सामान्य नागरिकांनी किती दिवस फेऱ्या मारायच्या? प्रत्येक वेळेस खोटी आश्वासने देऊन नागरिकांची दिशाभूल केली जात आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.टाकरखेडा संभू परिसरात महावितरणाच्या कामकाजाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

# अमरावतीत वाचन संस्कृतीचा अनोखा पॅटर्न!

## 'पुस्तक तुमच्या दारी' वाचन उपक्रमाचा आज समारोप, दरवर्षी १५० ते २०० बालवाचक घेतात लाभ


**अमरावती/का.प्र.**

डिजिटल युगात मोबाईल आणि स्क्रीन टाईमच्या विळख्यात अडकलेल्या आजच्या पिढीला पुन्हा पुस्तकांकडे वळवणे हे एक मोठे आव्हान बनले आहे. मात्र, याच आव्हानाला पेलत अमरावती शहरात गेल्या एक दशकापासून वाचन संस्कृतीची एक मूक क्रांती सुरू आहे. 'मी अमरावतीकर वाचक' या महत्त्वाकांक्षी वाचक प्रकल्पांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'पुस्तक तुमच्या दारी' या मोफत उन्हाळी वाचन उपक्रमाचा जाहीर समारोप सोहळा येत्या शनिवारी ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ६:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक स्व. छकन उर्फ स. दे. पांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ङश्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालय, अमरावतीङ यांच्या वतीने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.गेल्या १० वर्षांपासून हे मोफत फिरते वाचनालय अमरावती आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे कवाड खुले करत आहे. केवळ उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्येच नव्हे, तर वर्षभर मुलांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून ही संस्था अविरतपणे कार्यरत आहे. विशेष कौतुकास्पद बाब म्हणजे, कोणतीही जाहिरात न करता दरवर्षी या उपक्रमात तब्बल १५० ते २०० विद्यार्थी वाचक अत्यंत उत्साहाने सहभागी होतात. यंदाच्या उन्हाळी सुट्ट्यांमध्येही मुलांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, या मोफत वाचन उपक्रमाचा मुख्य समारोप सोहळा खडकाडीपुरा, अमरावती येथील केंद्र संचालिका रंजना छकन पांडेङ यांच्या निवासस्थानी पार पडणार आहे.

समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून नामवंत लेखिका व कवयित्री प्रा.चित्रा पुरुषोत्तम चौधरी आणि श्री शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, अमरावतीचे आदरणीय मुख्याध्यापक प्रसाद देशमुख उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

हा कौतुकास्पद उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठलानंद सरस्वती फिरते वाचनालयाचे अध्यक्ष सुनील ह. पांडे, सचिव विनोद वैद्य, तसेच सह-सचिव सुजाता सुनील पांडे आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमोल ठाकर यांनी मोलाचे योगदान दिले आहे.तसेच, या वाचन विकास चळवळीला गती देण्यासाठी संगिता हातगांवकर, मिनाक्षी भालेराव,सुजाता पांडे, क्षमा वैद्य, वैशाली गाडे, सुनीला पैकीने, रंजना पांडे, श्री सुनील भालेराव, सौ. ॲड. अपर्णा ठाकरे आणि मार्गदर्शक नंदकिशोर बजाज यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आणि पालकांनी परिश्रम घेतले आहेत. अधिक माहितीसाठी किंवा वाचनालयाच्या उपक्रमाशी जोडले जाण्यासाठी संस्थेच्या देशपांडे लेआऊट, दस्तुर नगर, अमरावती येथील मुख्य कार्यालयाशी किंवा मोबाईल क्र. ९३७२७९१९४३ वर संपर्क साधता येईल.




# का त्याला डोक्यावर घेऊ नका?

✍सिध्दू चिलवंत

उलट डोक्यावर घेऊन नाचायला हवे ! कारण जे या कोवळ्या पोराने केले ना ते ३०-३५ वर्षीय जरगट, निबरडक तरुणांनाही जमलेच नाही!

काय तर म्हणे ...आयपीएल मधील परफॉर्मन्स उपयोगशून्य आहे, टी२०ला काही अर्थ नाही, ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमध्ये जाऊन टेस्ट आणि वनडे खेळ म्हणावे, तिथे भंबेरी उडेल, बाऊंड्रीज छोट्या केल्यात..., कालच्या वैभवच्या पोस्टवर इ.अनेक तिरकस कॉमेंट्स आल्या. मित्रहो, मला सांगा, पाटा खेळपट्टया, छोट्या बाऊंड्रीज एकट्या वैभवसाठीच होत्या का? नाहीना? मग का नाही जमले इतरांना? तसेच असते तर ख्रिस गेलचे एका सीझनमधील ५९ षटकारांचे २०१२चे, १४ वर्षांतले रेकॉर्ड १४ सोडा ७ वेळा तरी मोडले असते, मग ते का नाही जमले एकालाही? हे इतके सोपे असते तर ट्रॅविस हेड, ईशान, शुबमन, अभिषेक, विराट, रोहित इ. धुरंधर हे काम का नाही करू शकले ? नॉनस्ट्रायकरला उभ्या बॅटरला ते का नाही जमले?

एका हंगामात ६५ षटकार २६६ चेंडूत म्हणजे प्रत्येक ४ बॉलनंतर १ षटकार ख्रिस गेल नावाचे वादळ आठवतंय ? ६ फूट २ इंचाचा अक्राळ विक्राळ धिप्पाड कॅरेबिअन, बोलर्सचा कर्दनकाळ, त्याचे ५९ षटकार ४६६ चेंडूत; तेव्हा तो ३३ वर्षांचा होता आणि वैभव फक्त १५ !!! अजून त्याचे कालचे रेकॉर्ड्स सांगू ? ..ख्रिसचे ५९ षटकार प्रत्येक ८ व्या बॉलला तर वैभवाचे ६५ षटकार प्रत्येक ५ व्या बॉलला. या IPL च्या त्याच्या ६८० पैकी ४९० धावा केवळ पॉवरप्लेमध्ये आल्यात, हे IPLच्या १८ वर्षांच्या इतिहासात कुणीच करू शकलेले नाही.

२९ बॉल ९७ रन = ३३४.४८ चा ९०+ रन्सच्या इनिंग्समधील ऐतिहासिक सर्वोच्च स्ट्राइक रेट. पॉवरप्लेमध्ये ८ षटकार, हाही एक विक्रम. एलिमिनेट रमध्ये १२ षटकार, हाही एक विक्रम. पॉवरप्लेमध्ये ४ फास्टेस्ट फिफ्टी, हाही एक विक्रम. इतर किरकोळ विक्रम सांगत नाही; आता सांगा, हे पराक्रम करणे भुईमुगाच्या शेंगा खायचे काम आहे का ?

काय तर म्हणे त्याचे वजन नियंत्रणात नाहीय ... अजून तो बेबी फॅट बबलू बॉय आहे, म्हणून त्याचे गालगुच्चे घेऊ नका ! म्हणे त्याला फिल्डिंग का करू देत नाहीत ...आरे काय बोलताय राजेहो ! फिल्डिंगसाठी परिपक्व hand and eye co ordination लागते जे या वयात कठीण असते; तो जखमी होऊ नये म्हणून व्यवस्थापन त्याची काळजी घेतेय. मित्रहो, नजर न लागो, आज तो भारताची शान आणि राष्ट्रीय संपत्ती होऊन बसलाय !

अजून काय तर म्हणे आयपीएलमध्ये सगळे फिक्स असते! मुंबई ४ वर्ष झाली माती खाते, ते काय अंबानीवर पाठीवर हल्ली पलाश्टिकचे पोते घेऊन रेल्वे फलाटावरच्या चमटलेल्या रिकाम्या पाण्याच्या बाटल्या गोळा करून भंगारवाल्याला विकायची वेळ आलीय म्हणून का ? उगाचच आपले 'उचलली जीभ' अन् 'जीव करतो उठ-बैस'!

लक्षात घ्या ...आपल्या १५ वर्षाच्या पोराला आपण सुरक्षेखातर एकट्याला बस-ट्रेनमध्येपण बसू देत नाहीत, तिथे वैभव एकसे एक धुरंधर फास्ट बोलर्सचा १५० किमी स्पीडचा बॉल निधड्या छातीने स्टेडिअमबाहेर लीलया फेकून देतोय. प्रत्येक निष्णात बोलर भयभीत होऊनच त्याला सामोरा जातोय. आज IPL चा TRP घसरलेला असताना केवळ त्याचा खेळ पाहण्यासाठी स्टेडिअम खचाखच भरत आहेत; असंख्य महिला या पोराचा चमत्कारी खेळ पाहण्यासाठी TVसमोर बसत आहेत. आज समग्र क्रिकेट जगतात केवळ वैभव हाच चर्चेचा एकमेव केंद्रबिंदू बनला आहे; सारे क्रिकेट दिग्गज त्याच्यातील असामान्यत्वाची तोंड भरून वाहवा करत असताना इतरांनाच बद्धकोष्ठतेचा त्रास का होतोय कळत नाही ! त्यांतही आपल्या भारतीयांच्याच पोटात दुखावं म्हणजे कशाचा कळस म्हणावा !

तुम्हाला टी २० रूचत नसेल तर नकाना पाहू ! कुणी हळदी-कुंकू, अक्षता घेऊन आलंय का तुमच्या घरी ? अस्सल क्रिकेट म्हणजे टेस्ट क्रिकेट हे बेंबीच्या देठापासून बोंबलत तुम्हीच कशाला सांगायला पाहिजे ? अवघ्या जगाला माहिताय ते ! पण काळ बदलतो तसे जग बदलते, आणि बदल हा निसर्गाचा नियमच आहे, तो स्वीकारायलाच हवा ! रेडिओसारखे करमणुकीचे दुसरे उत्तम साधन नाही पण आज रेडिओ किती जणांच्या घरी आहे सांगा ! अन् का नाही तेही सांगा ! बदललोच ना आपण ! तसंच क्रिकेटही बदलले. टेस्ट क्रिकेटमध्ये पूर्वी १० पैकी ७-८ सामने ड्रॉ व्हायचे, गेल्या ५ वर्षांतले किती सामने वांझोटे झाले ? १०% सुद्धा नाही ! आवो पाच दिवसीय सामन्याचा दुसऱ्या तिसऱ्याच दिवशी अक्षरशः 'निकाल' लागतोय; नव्या पिढीवरील झटपट क्रिकेटचाच हा प्रभाव नाही का ? कशाला गप्पा ठोकताय पावऱ्याहो ! असो.

आज वैभव लहान मुलगा आहे; अजून धड त्याचे शरीरही पूर्ण घडलेले नाहीय; त्याचे मसल्स अजून विकसित व्हायचेत, उंची वाढायचीय, ज्यासाठी त्याला किमान १८ वर्षे पूर्ण करावी लागतील. तरीही हा खेळ आहे..बॅड पॅच त्यालाही येईल, आव्हाने त्याच्यासमोरही आहेत;तो जायबंदी झाला नाही,

**आज समग्र क्रिकेटजगतात केवळ वैभव हाच चर्चेचा एकमेव केंद्रबिंदू बनला आहे; सारे क्रिकेट दिग्गज त्याच्यातील असामान्यत्वाची तोंड भरून वाहवा करत असताना इतरांनाच बद्धकोष्ठतेचा त्रास का होतोय कळत नाही ! त्यांतही आपल्या भारतीयांच्याच पोटात दुखावे म्हणजे कशाचा कळस म्हणावा !**

प्रसिद्धीच्या शिखरावर तोही नक्कीच वाहवत जाऊ शकतो, यश मिळवणे सोपे परंतु टिकवणे कठीण हे त्याच्या मनावर बिंबवणे अजून बाकी आहे; पण त्याचा विनोद कांबळी न होता नशिबाने साथ दिली तर इंग्लंड, इंग्लंड, ऑस्ट्रेलियाच्या हिरव्या खेळ पट्टया काय, झपाझप आत बाहेर घुसणारी स्विंग बोलिंग काय, आस्ते-आस्ते तेथील अनुभवां तूनच शिकेल की तोही हे सारे ! जरा दम धरा ! अजून त्याला टीम इंडियाची कॅपसुद्धा मिळालेली नाही, आरे इतक्यातच कसे घालून पाडून बोलताय राजेहो !'कामदाराला काम नाही, अन् रिकाम्याला दम नाही' म्हणतात ते यालाच !

कालचे डोळ्यांचे पारणे फेडणारे त्याचे दोन फटके सांगतो ... साकिब हुसेनने त्याला स्लोअर टाकला, तत्क्षणी तो ओळखून त्याने लाँग ऑफच्या बाहेर भिरकावला, दुसरा जो पॅटला कव्हर्सच्या डोक्यावरून मारलेला सिक्सर, बॅटचा वळवलेला कोन आणि फटक्याला दिलेली दिशा पाहून कॉमेंट्री करणारे लिटल मास्टर सुनिल गावस्करसुद्धा थक्क झाले ! म्हणाले 'केवळ अद्भूत !'

आणखी एक ... मागच्याच मॅचमध्ये ऑफ स्टम्पवरील, हेल्मेटच्या उंचीवर आलेल्या घातक बाऊंसर त्याने आडव्या बॅटने टोलवला ... काय झाले? ... मिडऑफवर कॅच आऊट ! कालच्या मॅचमध्ये अगदी तसाच बाऊंसर ... त्याचा अगदी सहज अप्रतिम अप्पर कट ... विकेटकीपरच्या डोक्यावरून सिक्सर. केवळ दोन दिवसांत त्याने ही चूक सुधारली ! हा चमत्कार नाही तर काय !

वयाच्या ४थ्या वर्षी हातांत बॅट धरलीय त्यानं ! दररोज ४०० किमी प्रवास करत रोज ६०० बॉल प्रॅक्टिस करत घडलाय तो! दिग्गज राहूल द्रविड यांनी मार्गदर्शन केले आहे त्याला, ते काय त्यांना वेड लागलेय म्हणून? आयपीएल फालतू ? आजघडीला जगातली सर्वात मोठी लीग आहे ती ! जगातले सगळे तरबेज खेळाडू आयपीएल खेळायला मिळावे म्हणून मरमर करतायत, वंचित पाकिस्तानी क्रिकेटपटू त्यांच्या सरकारला शिव्या घालतायत; सगळ्या जगातले कोट्यावधी क्रिकेट रसिक IPL पाहतायत, त्यांच्या काय कानांत बिड्या आहेत ? असो.

... पण जर वैभव पुढची २५ वर्षे सातत्याने असाच सफाईदारपणे चुकांतून सावरत आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळू शकला तर ते किती अमर्याद अद्भूत असेल, क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळताना त्याला पाहणे किती रोमांचक असेल, किती अशक्य विक्रम घडतील, याचा विचार करून तरी बोला की सोयऱ्याहो !

काय तर म्हणे बोलरला काही किंमतच नाही राहिली ! लक्षात घ्या क्रिकेट हा पहिल्यापासून बॅट्समनचाच खेळ मानला जातो; का ? तर जसा प्रत्येक बॉल बॅट्समनचा खेळ खलास करू शकतो; तसा प्रत्येक फटका चौका छक्का जाऊ शकतो का ? नाही म्हणून !

आज तो उत्तम खेळतोय, मी त्याचं कौतुकच करणार; आपण आपल्या लेकराचे कौतुक नाही करायचं तर कोणी करायचे, गंमत म्हणजे हेही इथे म्हणता येत नाहीय; सगळे जग त्याच्यावर स्तुतीसुमने उधळत असताना आपणच गरळ ओकायची हा अविवेकीपणा नाही काय ! पण उद्या जर तो अपयशाचा धनी झाला तर त्याच्यावर टीका करणाराही मीच असेन ! तुम्हाला वैभवचं कौतुक करायचं नसेल तर नका करू, पण त्याच्यातील हे असामान्य कौशल्य खुल्या दिलाने मान्य न करण्याचा कोतेपणा कशासाठी ? कालच स्वतःच्या X हँडलवर दस्तुरखुद्द ख्रिस गेलने, ज्याचा विक्रम वैभवने ध्वस्त केलाय त्यानेच वैभवला 'न्यू सिक्स मशीन' म्हणत त्याचं कौतुक केले आहे. मग ...

---

# टागोर, ट्रेन आणि गीतांजली!

✍समीर गायकवाड

२६ डिसेंबर १९७७ च्या दिवशी तत्कालीन रेल्वेमंत्री मधू दंडवते यांच्या हस्ते मुंबईच्या व्हिटी म्हणजेच आताच्या सीएसएमटी रेल्वे स्टेशनवर हिरवा झेंडा दाखवून गीतांजली एक्सप्रेसचे लोकार्पण करण्यात आले. मुंबई ते हावडा असा तिचा रूट होता. महान कवी रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या जगप्रसिद्ध पुस्तकाचे नाव ह्या ट्रेनला देण्यात आले होते. 'गीतांजली' म्हणजे 'गाण्यांची भेट'.

ही ट्रेन सुरू झाली, तेव्हा ती भारतातील पहिली क्लासलेस ट्रेन म्हणून ओळखली जात होती, म्हणजेच, सर्व वर्गांमध्ये समान सुविधा असलेली आणि वातानुकूलित डबे नसलेली ट्रेन असे तिचे स्वरूप होते. हुगळी नदीच्या काठी असलेल्या हावडा शहरातले हे स्टेशन, भारतातलं सर्वात मोठे आणि सर्वात व्यस्त, तसेच सर्वात जुन्या जंक्शनपैकी एक रेल्वे जंक्शन आणि मुंबईचे व्हीटी त्याच्या तोडीस तोड!

हिंगेर कोचोरी, कोरा पाकेर संदेश, मोघलाई पराठा, दम आलू, फिश करी, मटण करी ह्या हावडा स्टेशनच्या स्पेशल डिशेस. भेटकी माशाची फिश करी अजूनही लोकप्रिय आहे, स्थानिक बंगाली ह्याला बारामुंडी मासा म्हणतात. इथला लज्जतदार चहा विसरता येत नाही! गीतांजली एक्सप्रेस पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, छत्तीसगढ़ आणि महाराष्ट्र ह्या पाच राज्यातून धावते. दादर, कल्याण, कसारा, इगतपुरी, नाशिकरोड पर्यंत ह्या गाडीत एका विशिष्ट क्लासचं पब्लिक येतं. जळगाव, भुसावळ, बडनेरा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया ह्या भागातून प्रवास करताना राज्यातला असमतोल प्रवासातही जाणवू लागतो.

राज नंदगाव, दुर्ग, रायपूर, बिलासपूर क्रॉस करताना छत्तीसगढच्या आदिवासी भागाचा प्रत्यय त्या त्या स्थानकावर येतो. झारसागुडा, राउरकेला स्टेशन्सचा आगाज घामेजल्या देहाच्या प्रवाशांनी होतो. ट्रेन ओडीशा क्रॉस करून झारखंडमध्ये शिरते. ट्रेन छत्तीसगढमधून जाताना काही स्थानिक विक्रेते 'डुबकी कढी' घेऊन येतात, त्याचा अद्भुत दरवळ जाता जात नाही. उडीद डाळीचे मुटके असलेली कढी असे याचे वर्णन आपण करू शकतो. हरभरा डाळीपासून बनवलेल्या बफौरीची चव कुणीही विसरू शकत नाही.

चना पोडा, गरम वडा, खाजा आणि दालमा यांचे गंध आले की समजायचे की आपण ओडीशामधून जात आहोत! लिट्टी चोखा, झालमुरी, गव्हाच्या पिठापासून बनवलेले गोडसर ठेकूआ यांचा स्वाद झारखंडच्या स्टेशन्सवरून आपल्या डब्यात प्रसवू लागतो! खास करून चक्रधपूर आणि टाटानगर स्टेशन्सवर हा अनुभव येतोच! खरगपूर स्टेशन आले की, आपण बंगालमध्ये आल्याची वर्दी मिळते. वाफाळता चहा आणि तेलीभाजा यांची एकत्र टेस्ट जिभेला खवळून जाते! शिणलेल्या अंगाने आपण हावडा स्टेशनला उतरतो तेव्हा मुंबईत असल्याचा फील येतो कारण, तिथला गोंगाट आणि घामेजलेपण!

ह्या सर्व प्रवासात साईड विंडो असणारा स्लीपर बर्थ मिळाला तर तो आनंद द्विगुणित होतो! कारण प्रत्येक शहरागणिक इथला निसर्ग कूस बदलतो, खाद्य पदार्थ आपली जिव्हा अधिकाधिक समृद्ध करत जातात! ह्या सर्व प्रवासात आपण जर रवींद्र संगीत ऐकले वा रवींद्रनाथांच्या कविता वाचल्या तर ह्या प्रवासाचे मर्म उलगडते! ट्रेनमधल्या माणसांचे पोत बदलत जातात आणि आपण कितीही धनाढ्य असलो तरी आपली असलियत आपल्या समोर उभी ठाकते! हा एकत्रित परिणाम असतो त्या सकल घटकांचा जे आपल्या सोबत प्रवासात येत जात राहतात!

ज्या हुगळी नदीच्या काठी हावडा शहर वसले त्या नदीला, तिच्यावरच्या प्रसिद्ध हावडा ब्रिजला आपण अनेक सिनेमांत पाहिलंय. वहिदा रेहमान, राजेश खन्ना, धर्मेंद्र अभिनित 'खामोशी' मधलं 'वो श्याम कुछ अजीब थी' हे गाणे इथल्या हावडा ब्रिजखाली शूट झालेले. 'दो बिघा जमीन' पासून ते 'भूल भुलैय्या पार्ट थ्री' पर्यंत हा ब्रिज हिंदी सिनेमाचा घटक झाला. 'राम तेरी गंगा मैली' मधला मणीलाल, आरके'ला ह्याच हावडा स्टेशनवर भेटलेला. इथेच त्याने आपल्या पापाची कबुली दिली आणि त्याच्या हातून अब्रूचे धिंडवडे निघालेल्या पहाडी मुलीची कहाणी आपल्या सर्वांपर्यंत पोहोचली. हावडा ब्रिज ह्या नावाने ज्यावर सिनेमा बनवला गेला त्या पुलाचे खरे नाव रवींद्र सेतू असेच होते; मात्र हे नाव फारसे प्रचलित झाले नाही. ही बाब देखील मधू दंडवते यांच्या पर्यंत पोहोचली असेल! असो!

जे दुःख गंगेच्या वाट्याला आले तेच हुगळीलाही सोसावे लागले. हुगळी ही गंगा नदीची सर्वात पश्चिमेकडील उपनदी. तिच्या वरच्या भागात, ती भागीरथी म्हणून ओळखली जाते. ती पुढे जाऊन फरक्काच्या प्रवाहात मिसळते, परिणामी तिचा वेग आणि जलसाठा लक्षणीयरीत्या वाढतो. नवोद्वीपजवळ जलंगी नदीशी तिचा संगम होतो आणि अखेरीस ती बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. अजय, दामोदर, रूपनारायण आणि हळदी ह्या तिच्या उपनद्या. ह्या प्रत्येकीची कथा वेगळी आहे!

नवोद्वीप आणि ईस्कॉनचे, चैतन्य महाप्रभू यांचे नाते सर्वश्रुत आहेच! वासनेतून सुरु झालेला प्रवास आत्म्याच्या शोधात संपतो, गंगेच्या ह्या प्रवाहाला हेच तर सुचवायचे नसेल ? पद्मा मंडल आणि निशा दास ह्या दोन बंगाली बायकांमुळे ह्या बाबीचा विचार अशा पद्धतीने करण्याची दृष्टी मिळाली. पहिल्या काही भेटीत पद्मा मंडल, मला फारशी जिज्ञासू तल्लख वाटली नव्हती. मात्र तो गैरसमज होता हे लवकरच लक्षात आले. एक वेश्या असूनही तिला गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या कविता लक्षात होत्या. काही कविता तर तिने मुंबईला आल्यानंतर हेतुतः तोंडपाठ केल्या होत्या, त्याचे मूळ होते 'गीतांजली एक्सप्रेस' मध्ये!

कोलकत्याहुन मुंबईला येणाऱ्या बऱ्याच ट्रेन्स आहेत, त्यांच्या अनेक कहाण्या आहेत, त्यातलीच गीतांजली एक्सप्रेसची ही एक हटके नोंद. मुंबईत बंगाली वेश्यांची संख्या का वाढत राहिली आणि ह्या बायकांना बंगालमधून मुंबईत कसे आणले जायचे यावर खरेतर विस्तृत अभ्यास व्हायला हवा. आजघडीला वयाची साठी पार केलेल्या बायका कामाठीपुऱ्यात, बुधवार पेठेत अथवा गंगा जमुनामध्ये किंवा कबाडी बाजारमध्येही दृष्टीस पडत नाहीत. त्या कुठे गेल्या असतील हा सवाल वाजिब नाही, त्यामुळे मी तो विचारत नाही!

मात्र साधारणतः दशकापूर्वी ह्या बायका नजरेस पडायच्या. त्यातील काहींना बोलते केल्यावर त्या सांगायच्या की, 'बंगालमधल्या कोणकोणत्या भागातून त्यांना कोलकत्यात कसे आणले गेले आणि अखेरीस रेल्वेद्वारे त्यांची रवानगी मुंबईत कशी झाली!' त्यांचा हा सफर दर्दनाक होता आणि त्या आठवणींना पुन्हा पुन्हा टोकरायचे म्हणजे त्यांना त्या जखमा पुन्हा बहाल करण्यासारखं होय.



ह्या बायका जेव्हा पौगंडावस्थेत होत्या तेव्हा त्यांना इथे आणलेले. क्वचितच काहींना प्रौढ अवस्थेत आणलेले, बाकी सगळ्या जणींना ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना आणलेले. इथे आल्यावर सुरुवातीला त्यांनी विरोध केला मात्र आपले भाग्य बदलता येत नाही, हे वास्तव त्यांनी जेव्हा स्वीकारलं तेव्हा त्यांनी स्वतःला 'रंडी'च्या साच्यात उतरवले! एकेक करून त्या ह्यात मुरत गेल्या, झिजत गेल्या, कुढत करपत गेल्या आणि अखेरीस लयास गेल्या!

बंगालमधील वीरभूम, मेदिनीपूर, बांकुरा, मालदा, मुर्शिदाबाद, साऊथ चोबीस परगणा ह्या जिल्ह्यातल्या बायका ह्या धंद्यात अधिक दिसतात कारण ह्या सर्व जिल्ह्यात मागास बहुल जातींची लोकसंख्या अधिक आहे. अशा बायकांपैकीच, विनिता दास आणि पद्मा मंडल दोघीही एकाच शहरातल्या, कूच बिहार हे त्यांचे शहर! त्या दोघींना इथे का यावे लागले हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे, मात्र ज्या रेल्वेमधून त्यांना आणले गेले ती गीतांजली एक्सप्रेस होती! ही ट्रेन अतिशय वेगवान असल्याने त्यांची ने-आण करण्यासाठी तिचा वापर करणे दलालांना सोयीस्कर ठरले होते.

विनिता आणि पद्मा दोघींनाही तो दिवस टक्क लक्षात होता ज्या दिवशी त्यांना गीतांजली एक्सप्रेसमधून इथे आणले होते. रेल्वेमधल्या सुविधांनी त्या हरखून गेल्या होत्या. मुंबईत आणल्यानंतर त्यांनी अनेक दिवस यातना सोसल्या मात्र काही केल्या गीतांजली एक्स्प्रेसमधील सुख त्या विसरू शकल्या नाहीत. त्यांच्या आयुष्यातले ते सर्वोच्च सुख होते.

दशकानंतर त्या कूचबिहारला आपल्या नातलगांना भेटायला गेल्या तेव्हा गीतांजलीनेच त्यांनी प्रवास केल्या मात्र आधीचा तो आनंद त्यांना लाभला नाही. पुन्हा कधीही त्यांनी गीतांजलीने प्रवास केला नाही. किंबहुना त्यानंतर फक्त एकदाच त्या बंगालला गेल्या.

वृद्धत्वाकडे झुकल्यावर त्या कुठे गेल्या याचा कुणीही शोध घेतला नाही. मुळात हा देहभोगाचा परीघ आपल्या सभ्य पांढरपेशी जीवनाच्या परिघात अंतर्भूत होत नाही. असो.

निशा, पद्मा, रितू, नीलम ह्यांच्यासारख्या जितक्या म्हणून बायका बंगालमधून मुंबईला आणल्या जातात, त्या काही काळासाठी जर आपल्या गावी शहरी गेल्या तर त्यांची प्रथम पसंती गीतांजलीला असते! आताशा तिकीटांचे दर खूप वाढल्याने ह्यांचा वावर स्लीपर कोचमध्येच दिसतो. त्यांना जो फील येतो त्याची तुलना कशाशीही करता येत नाही आणि त्याची अनुभूती बाकी लोकांना कधीही येऊ शकत नाही!

मुंबई भेटीत पद्मा मंडलने 'गीतांजली' मधल्या एका कवितेचा अर्थ सांगितला होता-ही जपमाळ, भजन आणि माळ ओढणे सोडून दे! मंदिराच्या या बंद दारांच्या एकाकी, अंधाऱ्या कोपऱ्यात तू कोणाची उपासना करतोस? तुझे डोळे उघड आणि बघ, तुझा देव तुझ्यासमोर नाही!

जिथे शेतकरी मुरमाड जमीन नांगरतो आणि रस्ता तयार ककरण्यासाठीचा दगड फोडतो, तेथे ईश्वर असतो. तो उन्हात, पावसात, वाऱ्या वावदानांत त्यांच्यासोबत असतो आणि त्याचे दिव्य वस्त्र धुळीने माखलेले असते. तू देखील तुझे स्वच्छ वस्त्र उतरव आणि त्याच्याप्रमाणेच धुळीच्या भूमीवर उतर!

**पद्मा, निशा, रितू ह्या सगळयाजणी रवींद्रनाथांच्या कविता वाटतात! एकांतात कधी त्यांना वाचायचा प्रयत्न केला तर अपराध भावनेने हृदय भरून येते आणि मन स्वार होते गीतांजली एक्सप्रेसमध्ये नि त्यांच्या गावी जाऊन पोहोचते, जिथे अजूनही त्या शोधत असतात त्यांचे निरागस अल्लड बालपण, त्यांचे भूतकाळातले सुखी जीवन!**

नेमकी हीच कविता का सांगावीशी वाटली, याचे उत्तर देताना पद्माचे डोळे पाणावले होते. तिच्या नरम मृदू गुलाबी ओठांना कंप सुटला होता. पदराला चाळा करत ती उत्तरली - 'इथे मुंबईत आले तेव्हा ईश्वराची खूप आराधना करत असे

पण मी इथे का आले आणि ह्याच अवस्थेत किती दिवस असेन, याचे उत्तर ईश्वरपाशीही नव्हते! मग मी ठरवले की, आधी त्यालाच शोधेन मग त्याच्यावर विश्वास ठेवायचा की नाही ते ठरवेन!'

आता, पद्माला ईश्वराचा अर्थ गवसलाय, तिने त्याचा शोध थांबवलाय. ज्यांनी तिला ह्या दलदलीत लोटले त्यांना तिने माफ केलेय. ती रूढार्थाने ज्ञानी नसली तरी तिचे ज्ञान एखाद्या तपस्वी योगी पुरुषाहूनअधिक वाटते. तिच्या जाणिवा आता समृद्ध झाल्यात. स्वतःच्या पेशाकडे पाहताना तिला आता शरम वाटत नाही की, किळसही वाटत नाही. अतिशय तटस्थपणे ती ह्या देहव्यापाराकडे पाहते! मला तर ती एखाद्या योगिनीसारखी वाटते!

काळेभोर लांबलचक मुलायम केस मोकळे सोडून, शून्यात नजर लावून बसलेल्या पद्माकडे पाहिले की रवींद्रनाथ आठवत; आता मात्र त्यांच्या कविता आठवतात! गुरुदेव आज हयात असते तर त्यांनी तिच्यावर कविता लिहिली असती. कधीकधी वाटते की, ह्या सर्व बायका म्हणजे गुरुदेवांच्या गीतांजलीच होत, समाजाने त्यांचा कणकण ओरबाडून घेतला तरीही त्या समाधानी आहेत, त्यांची स्वतःविषयी तक्रार नाही आणि ज्यांनी त्यांना हे करण्यास भाग पाडले आहे त्यांना तर, त्यांनी कधीच माफ केलं आहे!

गीतांजली एक्सप्रेसने प्रवास करताना ह्या बायकांना नजरेपुढे आणले तर त्यांची घालमेल अंशतः तरी अनुभवता येते! स्त्रीकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन काही अंशी तरी बदलतो. हुगळीच्या काठावर बसून रवींद्रनाथांना वाचताना ह्यांची तडफड मनात तरळून गेली तर आपल्यात नक्कीच काही बदल जाणवतात! ह्या सकल अनुभूतीला आणखी एक कारण आहे, रवींद्रनाथांचे आजोबा द्वारकानाथ टागोर यांच्या मालकीचे पन्नासहून अधिक वेश्यांचे कोठे होते! वारसा हक्क आणि जमीनदारी ह्यातून रग्गड पैसा मिळूनही ऐशआरामाच्या ओढीने त्यांनी कोठ्यांची मालकी विकत घेतली. त्यातून त्यांना किती पैसा मिळाला हे कळायला मार्ग नाही.

मात्र काही काळानंतर त्यांची संपत्ती लयास गेली. रवींद्रनाथांना हे सर्व आवडत नव्हते, त्यांनी त्यांची बरीचशी कागदपत्रे जाळून टाकली.

त्यावर त्यांनी कधीही खुलून लिहिले नाही. मात्र त्यांनी शब्दबद्ध केलेल्या विनोदिनी आणि श्यामा सारख्या पात्रांचा बारकाईने अभ्यास केला तर काही शोकात्म कयास नक्की लावता येतील!

व्यक्तिशः मला तरी पद्मा, निशा, रितू ह्या सगळ्याजणी रवींद्रनाथांच्या कविता वाटतात! एकांतात कधी त्यांना वाचायचा प्रयत्न केला तर अपराध भावनेने हृदय भरून येते आणि मन स्वार होते गीतांजली एक्सप्रेसमध्ये नि त्यांच्या गावी जाऊन पोहोचते, जिथे अजूनही त्या शोधत असतात त्यांचे निरागस अल्लड बालपण, त्यांचे भूतकाळातले सुखी जीवन!

मानवी जीवनाचा खरा अर्थ शोधण्याची प्रक्रिया निरंतर जारी राहते. दरम्यान आयुष्याचा प्रवासही सुरु राहतो. गीतांजली एक्सप्रेसचा प्रवास एकदा तरी घडला पाहिजे..

# अकोला शहरात पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेसचा एल्गार

## महागाईच्या मुद्द्यावर केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी

■ प्रतिनिधी | अकोला ■

पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या सातत्याने वाढत असलेल्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असून वाढत्या महागाईने जनतेचे कंबरडे मोडले आहे. इंधन दरवाढीचा थेट परिणाम वाहतूक, अन्नधान्य, भाजीपाला तसेच दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंवर होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर महानगर काँग्रेस कमिटी अकोला व अकोला तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी दि. २९ मे रोजी अकोला शहरातील वाजीफदार पेट्रोल पंप येथे केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात भव्य आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनाचे नेतृत्व अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी केले.



यावेळी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर जोरदार टीका करत 'जनतेवरचा अन्याय सहन केला जाणार नाही' असा इशारा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

आंदोलनादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांनी 'महागाई बंद करा', 'जनतेचा पैसा परत द्या', 'पेट्रोल-डिझेल दरवाढ मागे घ्या', 'मेलोडी खावो सब भुल जाओ' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य कुटुंबांचे मासिक बजेट कोलमडत असून घरगुती गॅसच्या दरवाढीमुळे महिलांनाही मोठा आर्थिक फटका बसत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. यावेळी बोलताना आमदार साजिद खान पठाण यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत सांगितले की, इंधनावरील वाढत्या करांमुळे महागाईचा भडका उडाला आहे. सामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, लघुउद्योजक व मध्यमवर्गीय कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली असून सरकारने तातडीने पेट्रोल-डिझेल व गॅस दर कमी करावेत, अशी मागणी त्यांनी केली. महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांनी देखील केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करत जनतेच्या प्रश्नांवर काँग्रेस रस्त्यावर उतरल्याचे स्पष्ट केले. वाढती बेरोजगारी, महागाई आणि इंधन दरवाढ यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये असंतोष वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. या आंदोलनात जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष प्रकाश तायडे, नगरसेवक आजाद खान, नगरसेविका सुवर्णरेखा जाधव, मोईन मोंटु खान, मो. इरफान, विजय देशमुख, प्रशांत गावंडे, मोहम्मद एजाज, मोहम्मद वसिम, संदेश वानखडे, सुनील वानखडे, मोहम्मद जाकीर, इजहार उल्ला, उल्हास किस, शेख अर्शद, अशोक विजय देशमुख, शीला वावळ, शरीफ शाह, दिवाण प्रमोद ओक, कपिल पाटील, शहा, वर्षा चंद्रशेखर, आबिदा अहमद, अली शाहरुख, एस. के. रेश्मा, सलमान खान, ताबिदा, अरबीना, उजमा खान, महंमद जफर, मिलिंद विश्वनाथ नकाशे, विनोद डोंगरे, विनोद सहारे, शिवा राऊत, मोहम्मद मुदस्सिर, धन राऊत, रोशनी रवी, जय गणवीर, अमित सुधीर डोंगरे, प्रमोद डोंगरे, प्रदीप डोंगरे, जगन्नाथ लोगे, खिजर खान यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे काही काळ परिसरात राजकीय वातावरण तापले होते. पोलिस बंदोबस्तात आंदोलन शांततेत पार पडले. आगामी काळात महागाईविरोधात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

# नीट-यूजी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी अकोल्यात विद्यार्थ्यांचा एल्गार



■ प्रतिनिधी | अकोला ■

देशभरात गाजत असलेल्या नीट-यूजी २०२६ प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी अकोल्यात सम्यक विद्यार्थी आंदोलन आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या या प्रकाराविरोधात संतप्त विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेवर तीव्र टीका केली.

देशातील सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी नीट-यूजी परीक्षा देण्यासाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली. पालकांनी आर्थिक अडचणींना सामोरे जात मुलांच्या शिक्षणासाठी संघर्ष केला; मात्र प्रश्नपत्रिका फुटीमुळे संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर संशय निर्माण झाला आहे. या घटनेने विद्यार्थ्यांचा मानसिक ताण वाढला असून देशातील परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला विविध मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. नीट-यूजी २०२६ प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी नीटची फेरपरीक्षा तातडीने जाहीर करून ती पूर्णपणे विनामूल्य घेण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) अधिनियम २०२४ ची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. केंद्र सरकारने राधाकृष्णन समितीच्या शिफारशी तात्काळ लागू करून नीट परीक्षा घेण्याची जबाबदारी राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) कडून काढून केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे (यूपीएससी) सोपवावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

देशभरातील विविध राज्यांमध्ये झालेल्या प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणांची एनटीएमार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करत शिक्षण व्यवस्थेतील वाढते व्यापारीकरण थांबविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने व्यावसायिक शिकवणी वर्गांवर नियंत्रण ठेवणारा स्वतंत्र कायदा करावा, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली. प्रश्नपत्रिका फुटीच्या तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या घटनांचा उल्लेख करत आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, संबंधित अधिकारी आणि अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुद्ध सदोष मनुष्यवध व आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

या आंदोलनाचे नेतृत्व सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभियंता धिरज इंगळे यांनी केले. शासनाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा गंभीरपणे विचार करून तात्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

आंदोलनात धैर्यवर्धन पुंडकर (राज्य उपाध्यक्ष), प्रमोद देंडवे (जिल्हाध्यक्ष), मिलिंद इंगळे (महासचिव), राजकुमार दामोदर (युवक आघाडी जिल्हा महासचिव), गजानन गवई, अक्षय डोंगरे, अनिकेत शिरसाठ, अंकुश धुरंधर, सोमेश दाभाडे, सम्राट वाहुरवाघ, प्रतुल विरघट, मजहर खान, दामोदर जगताप, अंकुश बलखंडे, मनोहर बनसोड, सौरभ बहादुरकर, शैलेश शिरसाठ, आदित्य तायडे, नंदकुमार डोंगरे, नागेश हेरोळे, नागेश उमाळे, आकाश जंजाळ, आर्यन वानखडे, रोशन ताजने, राजू बोदडे, प्रदीप इंगळे, सुनीता हिरोळे, लक्ष्मी वानखडे, अनुराधा ठाकरे, वैभव भटकर, प्रसाद बेलूलकर, सुभाष अवचार, दुर्गा अवचार, अमोल वानखडे, संदेश तायडे, मनोहर वानखडे, सुगत डोंगरे, दादाराव पवार, कार्तिक देशमुख, शुभम सौतकर, सागर इंगळे, राहुल सुरवाडे, साहिल बोदडे, आशिष सोनोने, भूषण वानखडे, योगेश वडाळ, शेखर इंगळे, नितीन सपकाळ, पराग गवई, निलेश देव, सम्राट तायडे, सुरेंद्र ऑइबे, शुभम नाईक, गोलू खिल्लारे, राहुल लवाळे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६५/२०२६ — प्रोसेस नं.४५४/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : २४/०४/२०२६

**अर्जदार :** अर्जदार : १. सुरेश रतनलालजी बजाज -वय ६६ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त २. सुष्मा किशोर पटवारी -वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम ३. राजेश रतनलाल बजाज - वय ५३ वर्षे, धंदा-टॅक्स कन्सल्टंन्ट ४. प्रितेश प्रल्हाद गडोदिया - वय ३९ वर्षे, धंदा - नोकरी ५. अल्पेश प्रल्हाद गडोदिया - वय ३६ वर्षे, धंदा - नोकरी अर्जदार क्र. १ रा. के ३०२, ऐश्वर्या कोर्टयार्ड सीएचएस, आकुर्डी, चिखली रोड, न्यू पुणा हॉटेल जवळ, चिखली बु. पुणे ४१२११४ अर्जदार क. २ रा. ०८, लक्ष्मी हेरीटेज, धामनगांव रोड, यवतमाळ, ४४५००१ ३०१, अर्जदार क्र. ३ रा. फलॅट क्र.फलॅट क्र. ३०१ पाल्म बिच हाईटस, सेक्टर ३६, पोतदार शाळेजवळ, सिवुड नेरूल, नवी मुंबई. ४००७०६ अर्जदार क. ४ व ५ मांगेशी पॅराडाईज क्र.फलॅट क्र. ३०१ बिल्डींग नं. ६, मोहोने रोड, शाहद, कल्याण, ठाणे ४२११०३.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ ते ३ चे वडील तसेच अर्जदार क्र. ४ व ५ चे आजोबा मयत नामे रतनलाल शंकरलाल बजाज हे दि. २३/१०/२०२४ रोजी मौजे ठाणे येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक १७/०६/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क . स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७/२०२६ — प्रोसेस नं.५५३/२०२६
चौ.ता. २४/०६/२०२६ — दिनांक : २५/०५/२०२६

**अर्जदार :** अर्जदार : १. सरस्वताबाई गोविंद वाघ -वय ७२ वर्षे, धंदा घरकाम २. कु. हर्षदा अनिल वाघ - वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण अर्जदार क. १ रा. वडगांव रोठे, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. २ रा तुनकी, ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा ह.मु. व्दारा सरस्वताबाई गोविंद वाघ वडगांव रोठे, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. २ तर्फ पालनकर्ता आजी अर्जदार क. १

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते २ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क १ यांचा मुलगा व अर्जदार क २ याचे वडील मयत नामे अनिल गोविंदराव वाघ हे दि. ०५/०३/२०२६ रोजी मौजे वडगांव रोठे, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २४/०६/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क . स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८०/२०२६ — प्रोसेस नं.४९२/२०२६
चौ.ता. २४/०६/२०२६ — दिनांक : ०६/०५/२०२६

**अर्जदार :** अर्जदार: १. श्रीमती शोभा नामदेव गावडे - वय ६८ वर्षे, धंदा- घरकाम २. रमेश नामदेव गावडे - वय ४४ वर्षे, धंदा- शेती ३. रविंद्र नामदेव गावडे - वय ३८ वर्षे. धंदा- शेती ४. सौ. मिनाक्षी दत्तात्रय माने - वय ४२ वर्षे, धंदा-घरकाम अर्जदार क १ ते ३ रा. प्रताप चौक, मालेगांव रोड, तेल्हारा ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क ४ रा. कारखाना गेटजवळ, सदाशिव नगर, ता. मालशिराज, जि. सोलापुर

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ४ चे वडील मयत नामे नामदेव रामभाउ गावडे हे दि. १५ / १२ / २०२४ रोजी मौजे तेल्हारा, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २४/०६/ २०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क . स्तर, तेल्हारा


# चार दिवसांपासून वीज खंडित; हळद लागवड ठप्प

- **सस्ती महावितरणाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांत संताप**
- **तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्राअंतर्गत येणाऱ्या चांगेफळ–शिरपूर शेतशिवारातील शेतीसाठीचा वीजपुरवठा गेल्या चार दिवसांपासून खंडित असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. हळद व कापूस लागवडीचा हंगाम सुरू असताना शेतजमीन तयार असूनही वीजअभावी पाण्याची सोय होत नसल्याने लागवडीची कामे ठप्प झाली आहेत.

वेळेत लागवड न झाल्यास उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी महावितरण विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.



'सस्ती वीज उपकेंद्राचा गलथान कारभार सुरू असून गेल्या चार ते पाच दिवसांपासून चांगेफळ–शिरपूर शेतशिवारातील वीजपुरवठा खंडित आहे. हळद व कापूस लागवडीसाठी शेती पूर्ण तयार असतानाही वीज नसल्याने लागवड करता येत नाही. लागवडीला उशीर झाल्यास उत्पादनावर परिणाम होईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून वीजपुरवठा सुरळीत करावा.'

**आसीम अहमद,** शेतकरी, शिरपूर

वीजपुरवठा बंद असल्यामुळे शेतातील मोटारी बंद पडल्या असून पिकांसाठी आवश्यक पाणी देता येत नाही. परिणामी लागवड लांबणीवर पडत असून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महावितरण विभागाने तातडीने दुरुस्ती करून वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४५५/२०२५ — जा. क्र. १२४२/२०२६
ने.ता. २३/०६/२०२४ — दिनांक : १४/०५/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुध्द**

**प्रतिवादी :-** संतोष धन्नु ढगे व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. ३) उल्हास वसंत मोरे रा. गुरुकुल नगरी, संतोष नगर, खडकी, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२८,५६४/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर . दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २३ माहे जुन, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. १४ माहे मे, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४५४/२०२५ — जा. क्र. १२३९/२०२६
ने.ता. २३/०६/२०२४ — दिनांक : १४/०५/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुध्द**

**प्रतिवादी :-** सलीम बेग अफसर बेग व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) सलीम बेग अफसर बेग रा. देशपांडे प्लॉट, वाशिम बायपास, अकोला ता. जि. अकोला क्र. २) सैयद फारूक सैयद हाशम रा. स्कायपार्क, गंगा नगर, वाशिम बायपास, अकोला ता. जि. अकोला क्र. ३) आशिया परवीन सलीम बेग रा. देशपांडे प्लॉट, वाशिम बायपास, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२७,०३१/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २३ माहे जुन, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. १४ माहे मे, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला


# खानापूर-त्र्यंबकपूर शिवारात अनोळखी इसमाचा मृतदेह

## ओळख पटविण्यासाठी अकोट ग्रामीण पोलिसांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील खानापूर-त्र्यंबकपूर शेतशिवारात जळगाव नहाटे मार्गावरील निंबाच्या झाडाखाली एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून नातेवाईकांचा शोध सुरू असल्याची माहिती अकोट ग्रामीण पोलिसांनी दिली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ मे रोजी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना उघडकीस आली. मृत इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून तो मृत अवस्थेत आढळून आला. याप्रकरणी मुक्तार खान अउब खान यांनी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आला असून ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मृत इसमाची उंची अंदाजे ५ फूट ५ इंच, बांधा सडपातळ व मजबूत, रंग सावळा, डोक्याचे केस लहान व काळे, दाढी काळी-पांढरी अशी आहे. अंगात लाल रंगाचा टी-शर्ट व फिकट निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट परिधान केलेली होती.

या इसमाची ओळख पटल्यास किंवा नातेवाईकांची माहिती मिळाल्यास मर्ग तपास अधिकारी शिवकुमार तोमर (मो. ८६६८४०४२१५) तसेच पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे (मो. ८८०५९८७४५८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अकोट ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

# तेल्हारा बसस्थानकाचा राज्यात डंका !

## स्वच्छता व व्यवस्थापनात अमरावती विभागात 'क' वर्गात प्रथम; तेल्हारा आगारावर कौतुकाचा वर्षाव

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा बसस्थानकाने स्वच्छता, शिस्त आणि प्रवासी सुविधांच्या जोरावर राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान २०२५-२६' अंतर्गत अमरावती विभागातील 'क' वर्ग बसस्थानकांमध्ये तेल्हारा बसस्थानकाने प्रथम क्रमांक पटकावत मानाचा तुरा रोवला आहे.




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यातील बसस्थानके स्वच्छ, सुंदर व प्रवाशांसाठी आदर्श बनविण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली होती. संभाजीनगर, मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक आणि अमरावती विभागांमध्ये झालेल्या या स्पर्धेत तेल्हारा बसस्थानकाने उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अमरावती विभागात 'अ' वर्गात उमरखेड, 'ब' वर्गात परतवाडा तर 'क' वर्गात तेल्हारा बसस्थानकाने बाजी मारली. बसस्थानक परिसरातील स्वच्छता, रंगरंगोटी, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, परिसराची निगा, शिस्तबद्ध व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांचे प्रभावी नियोजन या सर्व निकषांमध्ये तेल्हारा बसस्थानक अव्वल ठरले. या यशामागे आगार प्रमुख मिथुन शर्मा यांच्या नेतृत्वाखाली चालक, वाहक, अधिकारी, कर्मचारी तसेच कामगार संघटनांचे सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरल्याची चर्चा आहे. बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवणे, प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे आणि प्रशासनाची काटेकोर अंमलबजावणी यामुळेच तेल्हारा आगाराला हा बहुमान मिळाल्याचे बोलले जात आहे.

या यशामुळे तेल्हारा शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून सर्व स्तरातून आगार प्रशासनावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. प्रवाशांकडूनही बसस्थानकातील बदलांचे स्वागत होत असून 'तेल्हारा बसस्थानक आता खऱ्या अर्थाने आदर्श बसस्थानक बनत आहे,' अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# पुण्याच्या मृत्यूकांडानंतर वर्धा जागा होणार का?

## पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारूने १४ बळी; गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अवैध धंद्यांचेच राज्य

**वर्धा/ जनमाध्यम**

पुण्यातील पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू सेवनामुळे तब्बल १४ जणांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असताना, वर्धा जिल्ह्यातही अवैध दारू व्यवसायाचे जाळे दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुण्यासारखी दुर्घटना वर्ध्यात घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का असा संतप्त प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

राज्याचे गृहराज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या जिल्ह्यातच अवैध धंद्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून पोलीस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि संबंधित यंत्रणांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. दारूबंदीचा जिल्हा म्हणून




ओळख असलेल्या वर्ध्यात खुलेआम सुरू असलेली अवैध दारू विक्री, गावागावातील अड्डे, बाहेरून होणारी तस्करी आणि रात्रीच्या अंधारात चालणारी वाहतूक पाहता कायद्याची भीतीच उरली नसल्याचे चित्र आहे.पिंपरी-चिंचवडमधील दुर्घटनेत विषारी दारूने अनेक संसार उद्ध्वस्त झाले. काही कुटुंबांतील कर्ते पुरुष गेले, तर काही घरांवर अक्षरशः शोककळा पसरली. ही घटना केवळ पुण्यापुरती मर्यादित नसून संपूर्ण राज्यासाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. कारण अवैध दारूचा काळाबाजार हा केवळ शहरापुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातही खोलवर रुजला आहे. वर्धा जिल्ह्यातील परिस्थिती तर यापेक्षाही गंभीर असल्याचे बोलले जात आहे.विशेष म्हणजे, वर्धा हा गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्याला लागून असलेला जिल्हा असून येथे कायदा-सुव्यवस्थेबाबत अधिक कठोर पावले उचलली जातील, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात अवैध व्यवसाय करणाऱ्यांचेच फावले असल्याचे चित्र आहे. अनेक वेळा विविध वर्तमानपत्रांनी अवैध धंद्यांवर प्रकाश टाकला, सामाजिक संघटनांनी आवाज उठवला; मात्र कारवाईच्या नावाखाली केवळ दिखाऊ मोहिमा राबवल्या गेल्याची चर्चा आहे.

दारूबंदीच्या नावाखाली सुरू असलेले हे 'काळे साम्राज्य' आता जीवघेणे ठरू लागले आहे. गुजरातसह इतर राज्यांतून येणारी निकृष्ट दर्जाची दारू, भेसळयुक्त रसायनांचा वापर आणि स्थानिक स्तरावर तयार होणारी विषारी हातभट्टी यामुळे कधीही मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.पुण्यात १४ जणांचा बळी गेल्यानंतरही जर वर्ध्यातील पोलीस प्रशासन आणि गृह विभाग जागे होत नसतील, तर मग कारवाई नेमकी कधी होणार असा संतप्त प्रश्न आता सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे. काही नागरिकांनी तर जिल्ह्यातील अवैध दारू अड्ड्यांवर संयुक्त धडक मोहीम राबवण्याची मागणी केली आहे.गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच जर कायद्याचा धाक उरला नसेल, तर सामान्य नागरिकांनी विश्वास तरी कोणावर ठेवायचा? पुण्याच्या मृत्यूकांडातून प्रशासन धडा घेणार की आणखी एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार, याकडे आता संपूर्ण वर्धा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

पुण्यातील पिंपरी-चिंचवड येथे विषारी दारूमुळे १४ जणांचा मृत्यू झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला कठोर निर्देश दिले आहेत. अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांची कोणतीही गय करू नका. दोषींवर कठोर कारवाई करा, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. राज्यभरातील पोलीस व उत्पादन शुल्क विभागाला सतर्क राहण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# ओबीसींची जनगणना दडपून कोणाचे हित जपता

## वर्धा येथे केंद्र सरकारला प्रश्न; सामाजिक न्यायासाठी ओबीसी समाज आक्रमक



**वर्धा/ जनमाध्यम**

देशात सामाजिक न्यायाच्या नावाने राजकारण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी आता प्रत्यक्ष कृती दाखवावी, अशी आक्रमक भूमिका घेत ओबीसी समाजाने जातनिहाय जनगणनेची मागणी जोरात लावून धरली आहे. '१९३१ नंतर ओबीसींची अधिकृत जनगणना झालीच नाही, मग विकासाच्या गप्पा कोणत्या आधारावर मारता असा थेट प्रश्न करत वर्ध्यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन धाडण्यात आले.

ओबीसी समाजाच्या विविध संघटनांनी एकत्र येत केंद्र सरकारवर सामाजिक वास्तव लपविण्याचा आरोप केला. लोकसंख्या किती, शिक्षणात सहभाग किती, सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रतिनिधित्व किती आणि आर्थिक स्थिती काय, याची खरी आकडेवारीच उपलब्ध नसल्याने ओबीसी समाज आजही धोरणांच्या काठावर उभा आहे, अशी संतप्त भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली.निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, राज्यघटनेने सामाजिक न्याय व समानतेचा मार्ग दाखविला असताना ओबीसी समाजाला अंधारात ठेवणे ही मोठी अन्यायकारक बाब आहे. मंडल आयोगानेही मागासवर्गीयांची अचूक माहिती असणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. मात्र केंद्र सरकार आजही जातनिहाय जनगणनेपासून दूर पळत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.ओबीसी समाजाने चार प्रमुख मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहेत. जनगणनेच्या प्रश्नावलीत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट करणे, आगामी जनगणनेत स्वतंत्र जातनिहाय नोंद करणे, जनगणनेची माहिती सार्वजनिक करणे आणि लोकसंख्येच्या प्रमाणात विविध क्षेत्रांमध्ये प्रतिनिधित्व व कल्याणकारी योजना निश्चित करणे, या मागण्यांचा त्यात समावेश आहे.

संख्या लपवून हक्क हिरावण्याचे राजकारण आता चालणार नाही. ओबीसी समाज आपले अधिकार मिळविल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. वर्धा येथे उठलेला हा आवाज आता राज्यभर घुमण्याची चिन्हे दिसत असून, आगामी काळात ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## साहूरमध्ये उष्माघाताचा कहर

# मजुरी करणाऱ्या दोन वृद्ध महिलांचा दुर्दैवी मृत्यू

**साहूर/ जनमाध्यम**

सध्या सुरू असलेल्या प्रचंड उष्णतेने ग्रामीण भागातील जनजीवन अक्षरशः होरपळून निघत असताना साहूर येथे उष्माघाताने दोन वृद्ध महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, वाढत्या तापमानाने सर्वसामान्यांच्या जीवावर उठल्याची भावना व्यक्त होत आहे. मृत महिलांमध्ये रुखमाबाई नामदेव पाचारे (वय ७०) व सुशीला बलदेव राईकवार (वय ७०) यांचा समावेश आहे. ही घटना २६ व २७ मे रोजी दुपारी दोन ते तीन वाजताच्या सुमारास घडली. दोघीही अत्यंत गरीब कुटुंबातील असून, उदरनिर्वाहासाठी रोज उन्हात मजुरी करण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता.प्राप्त माहितीनुसार,घरातील हलाखीची परिस्थिती,उष्णतेपासून बचावासाठी कोणतीही सुविधा नसणे आणि गेल्या काही



दिवसांपासून सुरू असलेल्या 'नवतपा'च्या तीव्र झळा यामुळे त्यांची प्रकृती खालावली. घरात कुलर अथवा पंख्याचीही पुरेशी व्यवस्था नसल्याने असह्य उष्णतेचा त्यांच्या शरीरावर गंभीर परिणाम झाला.मे महिन्याच्या अखेरीस सूर्य आग ओकत असून, नागरिक अक्षरशः भाजून निघत आहेत. अशा परिस्थितीत गरीब आणि मजुरी करणाऱ्या कुटुंबांवर उष्णतेचा सर्वाधिक परिणाम होत असल्याचे हे दुर्दैवी उदाहरण मानले जात आहे.या घटनेनंतर साहूर परिसरात शोककळा पसरली असून, प्रशासनाने उष्माघाताबाबत तातडीने जनजागृती करावी तसेच गरजू नागरिकांसाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## फासे पारध्याच्या लेकीची 'दिव्य' भरारी; जनमाध्यमच्या बातमीची खासदारांकडून दखल

# ९१.२० टक्के मिळविणाऱ्या दिव्याचा कुटुंबासह सन्मान

**वर्धा/ जनमाध्यम**

समाजाने ज्यांना वर्षानुवर्षे उपेक्षेच्या सावलीत ठेवले, त्या फासे पारधी समाजातून एक लेक शिक्षणाच्या बळावर आकाशाला गवसणी घालत आहे. आकोली येथील पारधी बेड्यावर राहणाऱ्या कु. दिव्या काळे हिने सीबीएसई बारावी परीक्षेत तब्बल ९१.२० टक्के गुण मिळवत केवळ स्वतःचेच नव्हे, तर संपूर्ण पारधी समाजाचे मस्तक अभिमानाने उंचावले. फासे पारध्याची लेक लाखात एक या शीर्षकाखाली जनमाध्यमने प्रसिद्ध केलेल्या बातमीची दखल घेत वर्धा लोकसभेचे खासदार अमर काळे यांनी थेट पारधी बेड्यावर जाऊन दिव्याचा कुटुंबासह सत्कार केला.

सेलू तालुक्यातील आकोली येथील कारखाना परिसरालगत



असलेल्या पारधी बेड्यावर खासदार अमर काळे पोहोचताच तेथील वातावरण भावनिक झाले. झोपडीसमोर उभी असलेली दिव्या, डोळ्यांत स्वप्नांची चमक आणि चेहऱ्यावर संघर्षाचे तेज घेऊन खासदारांचे स्वागत करत होती. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर मानल्या जाणाऱ्या भटक्या समाजातील मुलगी सीबीएसईसारख्या कठीण शैक्षणिक पद्धतीत ९१.२० टक्के गुण मिळवते, ही बाब अनेकांसाठी अविश्वसनीय ठरत आहे.दिव्याचे वडील रविंद्र काळे हे शेती व्यवसायाशी जोडलेले असून आईने नववीपर्यंत शिक्षण घेतले आहे. अत्यंत मर्यादित साधनसामग्री, शैक्षणिक वातावरणाचा अभाव आणि सामाजिक उपेक्षा या सर्व अडथळ्यांवर मात करत दिव्याने मिळवलेले हे यश संघर्षाच्या मातीतून फुललेल्या कमळासारखे ठरले आहे.

खा. अमर काळे यांनी दिव्याला पुष्पगुच्छ देऊन तिचे अभिनंदन केले व ही मुलगी केवळ पारधी समाजाची नाही, तर संपूर्ण वर्ध्याची प्रेरणा आहे,अशा शब्दांत तिच्या जिद्दीचे कौतुक केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत पुढील शिक्षणासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासनही दिले.शासन लाखो रुपये खर्च करून भटक्या-विमुक्त समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करीत असताना, दिव्यासारखी मुलगी त्या प्रयत्नांना आशेचा नवा चेहरा देत आहे. पारधी समाजातील एका झोपडीतून निघालेली ही ज्ञानज्योत आता अनेक चिमुकल्यांच्या आयुष्याला दिशा देणारी ठरणार आहे.

# फोन करून बोलावले अन् केली मारहाण

**खरांगणा (मो.) -** फोन करून नियोजित ठिकाणी बोलावून एका व्यक्तीस तिघांनी बेदम मारहाण केल्याची घटना खैरी (कामठी) येथे उघडकीस आली. या मारहाणीत महेश वाघ (३८, रा. खैरी कामठी) जखमी झाले असून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.माहितीनुसार, महेश वाघ हे घरी असताना गणेश सहारे याने त्यांना फोन करून जि.प. शाळेजवळ बोलावले.

महेश तेथे पोहोचल्यावर दर्शन मोहिजे, गणेश सहारे आणि कान्हा झामरे हे तिघे तेथे उपस्थित होते. त्यावेळी दर्शन मोहिजे याने शिवीगाळ सुरू केली.

महेश यांनी त्यास विरोध केल्यानंतर तिघांनी मिळून त्यांना बेदम मारहाण केली. या घटनेत महेश जखमी झाले. नागरिकांनी हस्तक्षेप करून वाद शांत केला. जखमीवर उपचार करण्यात आले असून तक्रारीवरून खरांगणा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## इतिहासाला मिळाला राष्ट्रीय सन्मान

# चक्रवर्ती राजा भोज यांच्या नावाने स्मारक टपाल तिकीट

**कारंजा (घाडगे)/ जनमाध्यम**

भारतीय संस्कृतीचा गौरवशाली इतिहास आणि पराक्रमी वारशाला केंद्र सरकारने पुन्हा एकदा राष्ट्रीय सन्मान दिला आहे. सम्राट चक्रवर्ती राजा भोज आणि राणी कमलापती यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने विशेष स्मारक टपाल तिकीट जारी केले असून, या निर्णयामुळे भोयर-पवार समाजात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, या ऐतिहासिक मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या वर्धा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सरिता गाखरे यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे. सन २०२२ मध्ये जिल्हा परिषद अध्यक्षपदाची धुरा सांभाळत असताना सरिता गाखरे यांनी भारत सरकारच्या टपाल विभागाकडे सम्राट चक्रवर्ती राजा भोज यांच्या नावाने स्मारक टपाल तिकीट जारी करण्याचा अधिकृत प्रस्ताव पाठविला होता. त्यानंतर त्यांनी विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला. भोयर-पवार समाजाचा वैभवशाली इतिहास राष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी वारसा जपला जावा, हा या प्रयत्नामागील मुख्य उद्देश होता. राजा भोज आणि राणी कमलापती यांच्या नावाने जारी करण्यात आलेले हे टपाल तिकीट केवळ एक पोस्टल स्टॅम्प नसून, तो समाजाच्या सांस्कृतिक अस्मितेचा आणि ऐतिहासिक अभिमानाचा राष्ट्रीय गौरव ठरत आहे. केंद्र सरकारच्या विकासही आणि वारसाही या धोरणाअंतर्गत ऐतिहासिक वारशाला दिलेला हा सन्मान समाजासाठी प्रेरणादायी मानला जात आहे. या निर्णयानंतर समाजबांधवांकडून सरिता गाखरे यांच्या प्रयत्नांचे कौतुक होत आहे. समाजाच्या इतिहासाला योग्य तो सन्मान मिळावा, अशी भावना सरिता गाखरे यांनी व्यक्त केली. निर्णयामुळे चक्रवर्ती राजा भोज यांच्या कार्याचा आणि सांस्कृतिक योगदानाचा परिचय देशभरातील नव्या पिढीपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.




## दारूच्या नशेत 'स्टेअरिंग'! वाहतूक पोलिसांचा धडाकेबाज दणका

# अल्पवयीनासह दोघांवर कारवाई

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियंत्रण शाखेने आता 'नो मर्सी'ची भूमिका घेतली असून दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी बजाज चौक परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत दोन वाहनचालक दारूच्या नशेत वाहन चालविताना आढळून आले.

वाहतूक शाखेचे अंमलदार पोहवा मुकेश राऊत व पोशि दिलीप कामडी यांनी पेट्रोलिंगदरम्यान वाहन तपासणी केली असता इंदिरा नगर येथील किशोर रामकृष्ण वाढई (५०) हा दारूच्या नशेत वाहन चालविताना सापडला. मेडिकल तपासणीत अल्कोहोल आढळून आले. विशेष म्हणजे त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवानाही नव्हता. त्यामुळे त्याच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार कलम १८५ तसेच ३(१)/१७७ अंतर्गत कारवाई करण्यात आली.दरम्यान, आणखी धक्कादायक बाब म्हणजे १७ वर्षीय अल्पवयीन स्वप्नील विनोद मानकर हा देखील दारू पिऊन वाहन चालविताना



आढळला.

अल्कोहोल आढळल्याने पोलिसांनी त्याच्यावर कलम १८५ तसेच ४(१)/१८१/१७७ अंतर्गत कारवाई केली.दारू, वेग आणि बेफिकिरीष्ठ मृत्यूला निमंत्रण देणारी ही तिकडी मोडून काढल्याशिवाय अपघातांचे सत्र थांबणार नाही, असा इशाराच वाहतूक शाखेने दिला आहे. जिल्हाभर ही मोहीम दररोज राबविण्यात येणार असून बिना हेल्मेट, बिना सीटबेल्ट, अतिवेग आणि मद्यधुंद वाहनचालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक, वाहतूक नियंत्रण शाखा यांनी स्पष्ट केले.

# झाडांनाही श्वास हवा; सिमेंटच्या गट्टूमध्ये गुदमरतेय हिरवाई

## वैद्यकीय जनजागृती मंचाच्या पुढाकाराने प्रशासन सरसावले

**वर्धा/ जनमाध्यम**

शहराच्या सौंदर्यीकरणाच्या नावाखाली झाडांच्या खोडाभोवती बांधण्यात आलेले सिमेंटचे गट्टू आता त्यांच्या वाढीस अडथळा ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. वृक्ष लावणे पुरेसे नाही, त्यांना जगू देणेही तितकेच महत्त्वाचे आहे, हा संवेदनशील संदेश देत वैद्यकीय जनजागृती मंच, वर्धा यांनी शहरातील वृक्षांच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतला आहे. शहरातील अनेक वृक्षांच्या खोडाभोवती पाण्यासाठी आवश्यक जागा न ठेवता बांधलेले गट्टू झाडांच्या नैसर्गिक वाढीला अडथळा निर्माण करीत असल्याचे मंचाच्या सदस्यांच्या निदर्शनास आले. काही ठिकाणी हे गट्टू खोडाला इतके घट्ट आवळले गेले आहेत की वृक्षांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून आले.या पार्श्वभूमीवर मंचाच्या सदस्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून काही वृक्षांवरील गट्टू हटविण्याचा उपक्रम राबविला. त्यानंतर नगर परिषद वर्धाचे अध्यक्ष सुधीर पांगुळ तसेच मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत शहरातील सर्व



झाडांभोवतीचे अडथळादायक गट्टू हटविण्याची मागणी करण्यात आली.नगर परिषद प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य ओळखत सकारात्मक प्रतिसाद दिला असून वृक्षांच्या खोडाला हानी पोहोचविणारे गट्टू हटविण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

वैद्यकीय जनजागृती मंचाचे अध्यक्ष डॉ. सचिन पावडे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, 'पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या परिसरातील वृक्षांना अडथळा ठरणाऱ्या बाबी आढळल्यास प्रशासनाला माहिती द्यावी.हरित आणि निरोगी शहराच्या दिशेने उचललेले हे पाऊल आता नागरिकांमध्येही पर्यावरणाबाबत नवी संवेदनशीलता निर्माण करत आहे.

# सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेल्या ४५ प्रकरणांना तडजोडीचा दिलासा

**वर्धा/ जनमाध्यम**

न्यायालयीन लढाईत वर्षानुवर्षे अडकलेल्या आणि थेट सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढलेल्या तब्बल ४५ प्रकरणांना आता तडजोडीचा मार्ग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकारातून 'समाधान समारोह-२०२६' या विशेष उपक्रमांतर्गत २१, २२ आणि २३ ऑगस्ट रोजी आयोजित विशेष लोकअदालतीत ही प्रकरणे आपसी सामंजस्यातून निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे न्यायालयीन वादात अडकलेल्या पक्षकारांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

देशभरात प्रलंबित वाद तडजोड व मध्यस्थीच्या माध्यमातून सोडविण्यावर सर्वोच्च न्यायालयाने भर दिला



### कोणती प्रकरणे

- मालमत्ता विषयक – ०८
- शैक्षणिक संस्था – ०२
- कौटुंबिक – ०३
- कामगार – ०५
- भूसंपादन – ०९
- मालमत्ता कर – ०२
- नोकरी विषयक – १७

असून सहभागी न्याय आणि न्याय आपल्या दारी' या संकल्पनेला बळ देण्यासाठी 'समाधान समारोह-२०२६ हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून वर्धा जिल्ह्यातही विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हेमंत भ. गायकवाड आणि जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. ए. एस. एम. अली यांनी पक्षकारांना 'वादा पेक्षा समझोता बरा' या तत्वावर तडजोडीने प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या काही प्रकरणांतील पक्षकारांनी स्वतःहून लोकअदालतीत प्रकरण निकाली काढण्याची तयारी दर्शविली आहे. संबंधित ४५ प्रकरणांची यादी नुकतीच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे प्राप्त झाली आहे.या सर्व प्रकरणांमध्ये सुवर्णमध्य साधण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव विवेक देशमुख यांच्या नेतृत्वात कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. लोकअदालतीदरम्यान ऑनलाईन पद्धतीने न्यायाधीशांसमोर सुनावणी होणार असून दोन्ही बाजूंची मते जाणून घेत तडजोडीच्या माध्यमातून निपटारा केला जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या तडजोडपात्र प्रकरणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. संबंधित पक्षकार तसेच वकील आभासी व्यासपीठाद्वारे लोकअदालतीत सहभागी होऊ शकतात. आपसी सामंजस्यातून प्रकरणे निकाली काढल्यास वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाचणार आहे.

**विवेक देशमुख,** सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,वर्धा

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**कारंजा (घा.)-**स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन एका तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गवंडी येथे उघडकीस आली. गौरव चौधरी (२५, रा. गवंडी) असे मृत तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार, गौरव चौधरी यांनी घरातच गळफास घेत आत्महत्या केली. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच एकच खळबळ उडाली. नातेवाईकांनी तातडीने त्यांना खाली उतरवून तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच कारंजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून चौधरी कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# कंझरा-नांदगाव खंडेश्वर रस्त्याचे काम रखडले

## उद्घाटनाचे नारळ फुटून तीन महिने उलटले -नागरिकांमधून संताप व्यक्त

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे कंझरा ते नांदगाव खंडेश्वर या मुख्य रस्त्याचे कामाचे उद्घाटनाचा नारळ फुटून तीन महिन्याचा कालावधी उलटला तरी सुद्धा या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली नाही. त

यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात या रस्त्याचे बांधकाम व दुरुस्ती चे भूमिपूजन व उद्घाटन होऊन तीन महिने उलटले आहेत. मात्र, अद्यापही प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही तेव्हा केवळ 'उद्घाटनाचे नारळ' फुटले, परंतु काम कधी सुरू होणार? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे.



तालुक्यातील कंझरा ते नांदगाव खंडेश्वर हा मार्ग दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या रस्त्याच्या कामाचे रितसर उद्घाटन झाल्याने लवकरच हा रस्ता चकाचक होईल अशी परिसरातील वाहनधारक व नागरिकांना अशा होती परंतु तीन महिने होऊन हि रस्त्यावर साधी गिट्टी सुद्धा पडलेली नाही. केवळ निवडणुकीच्या तोंडावर श्रेय घेण्यासाठी या रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले होते काय असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहे.

सध्या या रस्त्यावर जागोजागी मोठ मोठे खड्डे पडले असून, त्यामुळे वाहन चालकाच्या पाठीचे व मणक्याचे आजार वाढले व वाहनाचे सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. येत्या काही दिवसात पावसाळा सुरू होणार असल्याने हा रस्ता पूर्णपणे चिखलमय होऊन वाहतुकीसाठी बंद होण्याची भीती वर्तवल्या जात आहे.


> उद्घाटनाचे फलक अजूनही रस्त्याच्या कडेला दिसत आहे मात्र प्रत्यक्ष कामाला सुरुवात नाही. या दिरंगाईमुळे संतप्त झालेल्या परिसरातील नागरिकांनी आक्रमक पाऊल उचलण्याचे ठरविले. आठवड्याभरात या रस्त्याचे काम सुरू न झाल्यास आंदोलन करण्यात येईल.
>
> **-अनुश मोरे, कंझरा**

# भातकुलीत चक्रीवादळाचा तडाखा

## -खासदार बळवंत वानखडे यांनी केली पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** खासदार बळवंत वानखडे यांनी भातकुली येथे आलेल्या नैसर्गिक चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांना दिलासा दिला. या वादळात शहरातील शेकडो गरीब नागरिकांच्या घरांचे तसेच मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.





नुकसानग्रस्त परिसराची पाहणी करताना खासदार बळवंत वानखडे यांनी तहसीलदार तसेच नगरपरिषद प्रशासनाला तातडीने पंचनामे पूर्ण करून बाधित नागरिकांना शासन स्तरावरून आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळवून देण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत प्रशासनाने त्वरित मदतकार्य सुरू ठेवावे, असेही निर्देश दिले.

या पाहणी दौऱ्यात तहसीलदार मांडवे , नगरपरिषद मुख्याधिकारी भाग्यश्री बोरेकर, डॉ. रामेश भोरा, नरेंद्र ठाकूर, मयूर देशमुख, खलील भाई, फैमूद खा पठाण, नामदेवराव ढवळे, तमीज खा, राजू मेश्राम यांच्यासह काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि भातकुली शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनगाव तहसील कार्यालयात शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

## मारहाणीच्या निषेधार्थ आक्रमक पवित्रा

**अंजनगाव सुर्जी :** येथील तहसील कार्यालयात शेतकऱ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. अतुल खारोडे (देवगांव) असे आत्महत्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतक-याचे नाव आहे. माहितीनुसार शेतकरी अतुल खारोडे यांनी तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारावरील कमानीवर चढवून आत्महत्याचा प्रयत्न केला. गळ्यात दुपट्टा लटकून त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. पांधन रस्त्याच्या वादातून काही व्यक्तींनी अतुल खारोडे यांना मारहाण केली होती. या प्रकरणात त्यांना न्याय मिळत नसल्याने आणि प्रशासनाने दखल घेतली नसल्याने त्यांनी निषेधार्थ हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व महसूल प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अतुल खारोडे यांची समजूत काढली आणि न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर खारोडे यांना सुरक्षित खाली उतरविण्यात आले. या घटनेमुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे नावाचे वातावरण निर्माण झाले होते.



# शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. २७ मे ते १० जुन २०२६च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

# रॉयल्टी असणाऱ्या वाहनांवर कारवाई करू नका

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध रेती तस्करी करणाऱ्या वाहनांवर पोलीस विभागाच्या वतीने कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच रॉयल्टी असणाऱ्या वाहनांवर पण कार्यवाही होत आहे.

यामुळे ट्रान्सपोर्टर्सनी मंगळवार २६ मे रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये नाराजी व्यक्त केली आणि रॉयल्टी असणाऱ्या वाहनांवर कार्यवाही न करण्याची मागणी केली. पत्रकार परिषदेमध्ये सांगण्यात आले की एक महिन्यापासून रेतीबंद असल्यामुळे गाडी मालक, चालक, लेबर यांचा रोजगार बंद झाला आहे. मोटर मालक हा रेती वाहतूकदार आहे, माफिया नाही. फायनान्स कंपनीच्या ईएमआय थकीत असल्यामुळे मोटर मालक अडचणीत आहे.



राज्यातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा ,वर्धा ,अमरावती येथे रेती वाहतुकीला शासकीय अधिकाऱ्यांकडून अडचणी निर्माण केल्या जातात. विना रॉयल्टी पास असणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करावी तसेच जेथून रेती आणली आहे त्या रेती घाट मालकाबरोबर तिथल्या शासकीय अधिकाऱ्यावर पण कार्यवाही करण्यात यावी. पण ज्यांच्याकडे पास आहे त्या वाहनांना तपासणी करून जागेवरच सोडून द्यावे. अधिकारी वर्ग छोट्या छोट्या अडचणी तयार करून आमचे वाहन महिनो गिनती जमा करतात. यामुळे आम्हाला मोठी अडचण येत आहे. रॉयल्टी असल्यावर ही कारवाही करतात.

नियमात असणारी वाहने दोन किंवा तीन महिने जमा राहतात. त्यामुळे उदरनिर्वाह बंद होते. म्हणून नाईलाज मोटर मालक संबंधित अधिकाऱ्यांशी तडजोड करून गाडी सोडून घेतो. मग रॉयल्टी घेतल्यावर ही तडजोड करावी लागत असेल तर रॉयल्टी पेक्षा रॉयल्टी न घेता वाहतूकदार वाहतूक करतात. त्यामुळे अवैध वाहतुकीला जास्त प्रतिसाद मिळत आहे.

नागपूर हायकोर्टाने रॉयल्टी असणारे वाहन विना शर्त मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. गजानन काळबांडे यांचे वाहन पोलिसांनी जप्त केले होते ते कोर्टाच्या निर्देशानंतर सोडण्यात आले. त्यामुळे रॉयल्टी असणाऱ्या वाहनांवर कार्यवाही न करण्याची मागणी करण्यात आली आहे. पत्र परिषद मध्ये सचिन भोपळे, गोपाल धर्माळे,पंकज देशमुख, मिलिंद जंवजाळ, करीम लालूवाले आदि उपस्थित होते.

# मनापा आयुक्त वर्षा लड्डा यांनी विविध विकासकामांची केली पाहणी | अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**अमरावती/प्रतिनिधी-** अमरावती महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विकासकामांना वेग देण्यात येत असून, या कामांची गुणवत्ता आणि प्रगती तपासण्यासाठी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज सकाळी ७.३० वाजता विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर सुरू असलेल्या काँक्रीटीकरण, पेव्हिंग ब्लॉक आणि प्रधानमंत्री आवास योजना कामांची माहिती संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांकडून घेऊन त्यांनी कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

पाहणी दौऱ्याची सुरुवात बियाणी चौक ते इर्विन चौक या महत्त्वाच्या मार्गापासून करण्यात आली. या मार्गावरील रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पेव्हिंग ब्लॉक बसविण्याचे काम झाले असून, शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. उपअभियंता दिनेश हंबर्डे यांनी आयुक्तांना कामाची सविस्तर माहिती दिली. काम पुर्ण झाल्यामुळे आयुक्तांनी सदर कामाची तपासणी केली.

यानंतर आयुक्त वर्षा लड्डा यांनी प्रभाग क्रमांक १८ मधील दस्तुरनगर ते छत्री तलाव या मार्गावरील काँक्रीटीकरणाच्या कामाची पाहणी केली. यावेळी अभियंता अजय विंचुरकर यांनी प्रकल्पाची माहिती सादर केली. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रस्ते विकास प्रकल्प (भाग-क) योजनेतून हे काम हाती घेण्यात आले आहे. रस्त्याची एकूण लांबी १००० मीटर आहे. सध्या या कामाची ५५ टक्के प्रगती झाली असून, मुख्य काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरू असून, ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येणार आहे. या कामाची गती वाढविण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

त्यानंतर आयुक्तांनी प्रभाग क्रमांक १९ मधील मानवी अपार्टमेंट ते अकोली टी-पॉईंट या महत्त्वाच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाची पाहणी केली. यावेळी अभियंता श्रीरंग तायडे आणि विवेक देशमुख यांनी आयुक्तांना कामाच्या सद्यस्थितीची माहिती दिली. रस्त्याची एकूण लांबी २२०० मीटर आहे. सध्या या कामाची ६५ ते ७० टक्के प्रगती झाली आहे. रस्त्याच्या उर्वरित ५०० मीटर भागाचे काँक्रीटीकरणाचे काम सध्या सुरु असून ते लवकरच पुर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. हा रस्ता अत्यंत वर्दळीचा असल्याने काम दर्जेदार व गतीमान करण्याचे निर्देश दिले.

प्रभाग क्र.१९ मधील सातुर्णा ते अकोली रेल्वे टी पॉईंट रस्त्याचो कॉंक्रिटीकरण, पेव्हींग ब्लॉक व नाली बांधकाम कामाची पाहणी यावेळी आयुक्तांनी केली. तांत्रिक अडचणी दूर करुन सदर काम पुर्णत्वास नेण्याचे निर्देश यावेळी यांनी दिले. सदर रस्त्यावरील अनावश्यक बांधकाम साहित्य त्वरीत उचलण्याचे निर्देश दिले.



रस्ते विकासकामांच्या पाहणीनंतर महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी प्रधानमंत्री आवास योजना घटक क्रमांक ३ अंतर्गत सुरू असलेल्या गृहप्रकल्पांचीही मौका पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी मौजे बेनोडा सर्व्हे क्रमांक २६/२ येथील एकूण ८० सदनिका तसेच मौजे बेनोडा सर्व्हे क्रमांक २७/२ येथील एकूण ९७ सदनिकांची पाहणी करण्यात आली. पाहणीदरम्यान आयुक्तांनी लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यात आलेल्या सदनिकांची प्रत्यक्ष पाहणी करून रहिवाशांशी संवाद साधला. नागरिकांकडून सुविधा, बांधकामाची गुणवत्ता आणि परिसरातील सोयीसुविधांबाबत माहिती घेतली. यावेळी आयुक्तांनी संबंधित विकासकांना प्रकल्पाचे उर्वरित बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच प्रकल्पातील काही मूलभूत सुविधांच्या कामांमध्ये विलंब होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार, जवळपास १२२ लाभार्थ्यांनी अद्याप त्यांचा लाभार्थी हिस्सा महानगरपालिकेकडे जमा केलेला नाही. त्यामुळे बांधकामाची गती मंदावली असून, विजेची आणि पिण्याच्या पाण्याची जोडणी यांसारख्या मूलभूत सुविधांच्या कामांवर परिणाम होत आहे. यासंदर्भात आयुक्त वर्षा लड्डा यांनी लाभार्थ्यांना १० जूनपर्यंत आवश्यक रक्कम भरून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच निर्धारित मुदतीत लाभार्थी हिस्सा जमा न केल्यास प्रतीक्षा यादीतील पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचे वाटप करण्यात येईल.

पाहणीदरम्यान आयुक्त वर्षा लड्डा यांनी संबंधित अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांना कामाचा दर्जा अबाधित ठेवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. नागरिकांच्या पैशातून होणारी विकासकामे गुणवत्तापूर्ण आणि दीर्घकालीन असावीत, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# आचारसंहितेमुळे जून महिन्यातील विभागीय व महिला लोकशाही दिन रद्द


**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे, आगामी जून २०२६ महिन्यातील 'विभागीय लोकशाही दिन' आणि 'महिला विभागीय लोकशाही दिन' आयोजित करण्यात येणार नाही, अशी माहिती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रकानुसार दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन, तसेच महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. या दिवशी नागरिक व महिला आपल्या तक्रारी व समस्या थेट प्रशासनासमोर मांडतात. परंतु, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या १८ मे २०२६ च्या प्रसिद्धीपत्रकानुसार सध्या राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू आहे. शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागू असते, त्या ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करता येत नाही. या कायदेशीर तरतुदीचा दाखला देत प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जून २०२६ मध्ये अमरावती विभागातील विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिन आयोजित करता येणार नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अमरावतीत ३० मे रोजी ग्रामजयंतीनिमित्त 'विश्वशांतीकरीता सामुदायिक प्रार्थना'

**अमरावती/प्रतिनिधीः-** युगप्रभात फाउंडेशन, अमरावती यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंती पर्वाचे औचित्य साधून येत्या शनिवार, दिनांक ३० मे २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता भव्य सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम स्थानिक पंचवटी चौक, अमरावती येथे पार पडणार आहे.

'धर्म-पंथ देशाचे भांडण!
न मिटे ऐक्य-प्रेमाविण!
ते प्रेम साधाया प्रार्थने समान!
पातळी नाही उमध!!'

या राष्ट्रसंतांच्या उदात्त विचारांना उजाळा देत, समाजात बंधुभाव, ऐक्य आणि जागतिक शांतता निर्माण व्हावी या उद्देशाने या 'विश्वशांतीकरीता सामुदायिक प्रार्थना' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



सध्याच्या काळात मानवी मूल्ये जपण्यासाठी आणि समाजात सलोखा राखण्यासाठी सामूहिक प्रार्थनेचे मोठे महत्त्व आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि संत गाडगे बाबा यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन आयोजित या मंगलमय सोहळ्यात अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सामुदायिक प्रार्थना आयोजन समिती, अमरावती च्या वतीने करण्यात आले आहे.

# परदेशात उच्च शिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## अमरावती विभागातील पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे, अशी माहिती धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे. शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च युएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १५०० युएस डॉलर तर युकेसाठी ११०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल.लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न ८ लाख रुपये तसेच विद्यापीठांची क्युएस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल केली जाईल. तर क्युएस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक TOEFL किंवा IELTS यासारख्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.


## शेती विषयक जाहिरात

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यामधील मौजे वीरपुर गट नंबर ८/२ अ ( क्षेत्रफळ - २. ४२ हे. आर ) या शेताच्या खरेदी -विक्री संबंधी काही हरकत /आक्षेप असल्यास त्यांनी आज दिनांकापासून आठ दिवसाच्या आत खालील मोबाईल क्रमांकवर संपर्क साधावा.

**मो.: ९८६०३००६१५, ८७६६९१२५०६**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५२/२०२६
**श्रीमती प्रमिलाबाई अधिक दोन -वि- गैरअर्जदार विजय**
पुढील ता.२४.०६.२०२६

## जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Pramilabai Wd/o Shankarlal Chandak, Age 76 Yrs. Occu.: Household
Aadhar No.: 369960875633
2. Ajay S/o Shankarlal Chandak, Age 55 Yrs. Occu.: Business
Aadhar No.: 368223061321
3. Mukesh S/o Shankarlal Chandak, Age 55 Yrs. Occu.: Service
Aadhar No.: 652334285394
All R/o Near Ram Mandir, Chhangani Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :**
1. Vijay S/o Shankarlal Chandak, Age 53 Yrs. Occu.: Business
Aadhar No.: 235482316203
R/o Rajna (Purna) Tq. Caandur Bazar, Dist. Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शंकरलाल मुलतानमल चांडक** हे दिनांक 10.12.2020 रोजी **मासोद, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रमिलाबाई अधिक दोन विरुध्द गैरअर्जदार विजय** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमिलाबाई अधिक दोन विरुध्द गैरअर्जदार विजय** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती



## शेत विक्रीबाबत जाहीर सुचना

श्री.विठ्ठलेश्वर संस्थान ट्रस्ट, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती र.नं. अे-२९८/अमरावती या न्यासाच्या मालकीची ताब्यात असलेली शेत जमीन विक्री करावयाची आहे.
मिळकतीचे वर्णन -

१) मौजे खूर्माबाद, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील गट नं.१३९, भोवगट वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ ०१ हे.६४ आर, आकार रु.८.१३, पैकी ० हे.०६ आर, पोटखराब क्षेत्र (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे सर्व्हे नं.३६/३, क्षेत्रफळ ४ एकर ०२ गुंठे) (कुळ मोतीराम उदेभान न्हावी यांचे ताब्यातील)
२) मौजे बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील गट नं.२१/१, भोवगट वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ ०१ हे.५० आर, आकार रु.८.२५ (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे सर्व्हे नं.२१/५, क्षेत्रफळ ३ एकर २८ गुंठे) (कुळ अ.सलीम अ.सईद, अ.जमिल अ.सईद, अ.खलील अ.सईद, अ.नईम अ.सईद, अ.इस्माईल अ.सईद, व अ.कय्यूम अ.सईद यांचे ताब्यातील)
३) मौजे लेहेगांव, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील गट नं.२५, भोवगट वर्ग-२, एकुण क्षेत्रफळ ०२ हे.८८ आर, आकार रु.१५.३५, पैकी ० हे.३६ आर, पोटखराब क्षेत्र (न्यासाच्या परिशिष्ट १ प्रमाणे सर्व्हे नं.२४, क्षेत्रफळ ३३ एकर ०२ गुंठे) (न्यासाच्या ताब्यातील)

आपली लेखी मागणी/निविदा दिनांक २६.०६.२०२६ रोजी पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावी. आलेले सर्व निविदा त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता पंचासमोर उघडण्यात येईल, निविदा/लेखी मागणी पाठविणाऱ्यांची सभेला उपस्थिती आवश्यक राहील. मंजूर निविदेप्रमाणे २५ टक्के ईसार करावा लागेल. निविदा मंजुरीचा अथवा नाकारण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाचा राहील.

मे जॉईट कमिश्नर साहेबांची परवानगी मिळाल्यानंतरच खरेदी देण्यात येईल. परवानगीचा व खरेदीचा खर्च घेणाऱ्यालाच करावा लागेल. मे जॉईट चॅरिटी कमिश्नर अमरावती यांनी परवानगी नाकारल्यास अथवा अन्य जास्त किंमत देणाऱ्या व्यक्तिस परवानगी दिल्यास अमानत/ईसार बिनव्याजी परत करण्यात येईल.

**दिनांक २६.०५.२०२६**

**सचिव,**
**श्रीमती हर्षदा हर्षवर्धन देशमुख**
**श्री.विठ्ठलेश्वर संस्थान ट्रस्ट, दर्यापूर,**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**
**र.नं. अे-२९८/अमरावती,**
**रा.राम मंदिराजवळ, देशमुख वाडा**
**दर्यापूर, मो.७४९९९६६७२४**

# अधिक मासाच्या पुण्यस्नानासाठी गेलेल्या तिघांचा मृत्यू

## -वणा नदीत नियमबाह्य रेती उपसा? -खड्ड्यांत बाप-लेकीसह मैत्रिणीचा दुर्दैवी अंत

**वर्धा/प्रतिनिधी:-** अधिक मासाच्या पुण्यस्नानासाठी गेलेल्या एका कुटुंबावर काळाने घाला घातला. शेडगाव (आजदा) येथील वणा नदीत निर्माण झालेल्या जीवघेण्या खड्ड्यांनी बाप-लेकीसह तिच्या मैत्रिणीचा बळी घेतल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या दुर्घटनेमागे नियमबाह्य रेती उपसा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष कारणीभूत असल्याचा संतापजनक आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

माहितीनुसार, शेडगाव येथील अतुल किनकर, त्यांची मुलगी रेबीना किनकर आणि तिची मैत्रीण गुंजन मेश्राम हे शुक्रवारी सकाळी अधिक मासाचे औचित्य साधून वणा नदीत स्नानासाठी गेले होते. नदीकाठावर दुचाकी उभी करून तिघेही पाण्यात उतरले; मात्र नदीत निर्माण झालेल्या खोल खड्ड्यांचा



अंदाज न आल्याने क्षणात तिघेही पाण्याच्या गर्तेत ओढले गेले.

स्थानिकांच्या मते, नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर रेतीचा उपसा करण्यात आला होता. विशेष म्हणजे, नियमांना हरताळ फासत बोट आणि तब्बल ४० फूट बूम असलेल्या पोकलँड मशीनच्या सहाय्याने नदीचे अक्षरशः खोदकाम करण्यात आले. त्यामुळे नदीत ठिकठिकाणी २५ ते ३० फूट खोल खड्डे निर्माण झाले असून हेच खड्डे आता मृत्यूचे सापळे ठरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

तिघेही बराच वेळ घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता नदीकाठी दुचाकी आढळून आली. त्यानंतर समुद्रपूर व हिंगणघाट पोलिसांना माहिती देण्यात आली. दरम्यान, दुर्घटनेची माहिती मिळताच रेती उपशात वापरली जाणारी पोकलँड व बोट घटनास्थळावरून हटविण्यात आल्याची जोरदार चर्चा परिसरात रंगली होती.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पोहण्यात निष्णात असलेल्या मांडगाव येथील किशोर बावणे व पुरुषोत्तम बावणे या भावंडांना मदतीसाठी बोलावले. या दोघांनी जीव धोक्यात घालून नदीत उडी घेत शोधमोहीम ☞(पान २ वर)

विधान परिषद निवडणूक

# हर्षजीत देशमुख काँग्रेसचे उमेदवार

आज दाखल करणार नामांकन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे १७ पैकी १५ जागांवर एकमत झाले आहे. यामध्ये काँग्रेस आठ, उद्धवसेना चार आणि राष्ट्रवादी शरद पवा पक्ष ३ जागांवर लढणार आहे. तर उर्वरित दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल, अशी माहिती आहे. काँग्रेस पक्ष विधान परिषदेच्या चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड या जागा लढवणार आहे. अमरावती मधून हर्षजीत देशमुख काँग्रेसचे उमेदवार फायनल झाले आहे. नागपूर वरून अमरावतीत येऊन शनिवार ३० मे रोजी ते आपला नामांकन अर्ज दाखल करणार आहे. नागपूर येथील उद्योजक हर्षजीत देशमुख यांनी पूर्वी अमरावती वरून विधानपरिषद निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. जिल्ह्यातील मतदारांशी त्यांनी संपर्कही वाढवला. काँग्रेसचे मजबूत उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसकडून कोण उमेदवार राहणार हा चर्चेचा विषय ठरला होता. एका मजबूत उमेदवाराची काँग्रेसला आवश्यकता होती. तो उमेदवार हर्षजीत देशमुख ठरणार आहेत. स्थानिक मतदारसंघ निवडणुकीत एकूण ४५३ मतदार आहे. यामधून काँग्रेसकडे १२० मतदार आहे. शिवसेना ☞(पान २ वर)

# बँकेचा विश्वास धुळीस

## मिनी बँक संचालकांवर कारवाई होण्याची शक्यता

### मुऱ्हा देवी येथील मिनी बँकेकडून महिला बचत गटांची ३३ लाखांची फसवणूक

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग व्यवहार सोपे व्हावेत आणि मुख्य बँकांवरील गर्दी कमी व्हावी, या उदात्त हेतूने सुरू करण्यात आलेल्या 'मिनी बँक' मॉडेलला अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मुऱ्हा देवी येथे मोठा तडा गेला आहे. राष्ट्रीयकृत बँकेचा लोगो वापरून विश्वास संपादन करणाऱ्या मिनी बँक संचालकाने महिला बचत गटांच्या कष्टाच्या पैशावर डल्ला



मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अखेर तिसऱ्या दिवशी सीएससी (CSC) कंपनीने संबंधितावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मुऱ्हा देवी येथे सेंट्रल बँक ऑफ इंडियाशी संलग्न असलेले मिनी बँक सेंटर कार्यरत आहे. या सेंटरवर गावातील शेतकरी, कष्टकरी आणि महिला बचत गटांनी मोठ्या विश्वासाने आपले पैसे जमा केले होते. मात्र, जेव्हा महिला ☞(पान २ वर)

ज्या महिला बचत गटांच्या तक्रारी प्राप्त झाल्या, त्यांच्या खात्यांची सखोल चौकशी केली असता ३३ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अजूनही काही तक्रारी येण्याची शक्यता असून हा आकडा वाढू शकतो. मिनी बँक कंपनीच्या वतीने दोषीवर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**-राहुल वाठोळकर** (मॅनेजर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अंजनगाव सुर्जी)

# श्वानाला वाचवण्यासाठी उतरलेला तरुण विहिरीत अडकला

## अग्निशमन दलाकडून दोघांचीही सुखरूप सुटका!

**अमरावती/प्रतिनिधीः-** आपल्या लाडक्या पाळीव श्वानाचा जीव वाचवण्यासाठी एका २५ वर्षीय तरुणाने थेट विहिरीत उडी घेतली, मात्र विहिरीतील विषारी वायूमुळे (गॅस) दोघेही तिथेच फसल्याची थरारक घटना आज, शुक्रवार २९ मे रोजी सकाळी विद्यापीठ परिसरात घडली. मात्र, अमरावती अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि



साहसामुळे तरुण आणि त्याच्या श्वानाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.

शहरातील प्रसिद्ध उद्योजक निलेश परतानी यांचा २५ वर्षीय मुलगा युवराज निलेश परतानी हा आज सकाळी १० वाजेच्या सुमारास त्याचा पाळीव श्वान 'शकूर' याला घेऊन विद्यापीठ परिसरात ट्रेकिंगसाठी गेला होता. तिथे खेळत असताना अचानक श्वानाच्या गळ्यातील दोरी सुटली आणि तो पळत जाऊन एका विहिरीत पडला. आपल्या जिवलग श्वानाला विहिरीत पडल्याचे पाहून घाबरलेल्या युवराजने कसलाही विचार न करता त्याला वाचवण्यासाठी विहिरीत धाव घेतली.

ती विहीर एक 'गॅस विहीर' (विषारी वायू असलेली) असल्याने, विहिरीत उतरताच युवराज आणि त्याचा श्वान तिथेच अडकून पडले. ☞(पान २ वर)

# माजी सैनिकाच्या पत्नीने डोळ्यातील अश्रू पुसत मांडल्या वेदना

## -दर्यापूर मुख्याधिकारी यांच्या दालनात माजी सैनिक धडकले

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील सैनिक कॉलनीमधिल अतिक्रमण काढण्याची मोहीम दर्यापूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे यांनी हाती घेतली. दोन दिवसांपूर्वी या भागातील अतिक्रमणात असलेल्या घरांवर बुलडोजर चालविण्यात आला होता. बाकी राहलेले अतिक्रमण थांबवण्यासाठी शिंदेसेनेतर्फे आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. आज (दि.२९) शिंदेसेनेचे गोपाल अरबट, वंचित



बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय चौरपगार, साहेबराव वाकपांजर तसेच भारतीय बौध्द महासभेचे महासंघाचे विजय चौरपगार यांच्यासह सैनिक कॉलनीतील रहिवाशी असलेले आजी माजी सैनिक, महिलांनी नगरपरिषदेवर धडक देत मुख्याधिकारी यांना सैनिकांचे घरे पाडू नये अशी विनवणी केली. बऱ्याचवेळ चाललेल्या चर्चेदरम्यान ☞(पान २ वर)

# घनकचरा डेपो परिसरात वृद्धाचा मृतदेह आढळला

## उष्माघात की घातपात? संशय कायम

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील मूर्तिजापूर रोड परिसरातील रहिवासी तुळशिदास वासुदेवराव गावंडे (वय ८२) यांचा मृतदेह आज शिवर रोडवरील घनकचरा व्यवस्थापन डेपो परिसरात आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली




आहे. तुळशिदास गावंडे हे दोन ते तीन दिवसांपूर्वी घरातून गजानन महाराज मंदिराकडे जात असल्याचे सांगून निघाले होते. त्यानंतर ते परत न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. आज (दि.२९) शिवर रोडवरील घनकचरा व्यवस्थापन डेपो परिसरात सदर वृद्ध व्यक्ती ☞(पान २ वर)

# पत्रकार कॉलनीत बिबट्या दिसल्याची अफवा

## सोशल मीडियावर खोट्या पोस्ट व्हायरल

**अमरावती/प्रतिनिधीः** दोन दिवसांपूर्वी रामपुरी कॅम्प परिसरात बिबट्याचे आठ महिन्याचे पिल्लू आढळून आले होते. हे पिल्लू दिवसा नजरेत पडल्याने काही काळ घबराट पसरली होती. वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरक्षित पकडून बिबट्याच्या पिल्लाला पोहराच्या जंगलात नेऊन सोडले होते.या घटनेच्या दोन दिवसानंतर आज शुक्रवार २८ में रोजी पत्रकार कॉलनी मध्ये बिबट्या दिसल्याची अफवा संपूर्ण शहरात पसरली. सोशल मिडियावर उलट सुलट



पोस्ट व्हायरल झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम पसरला होता.

पत्रकार कॉलनीत बिबट्या आढळून आल्याची पोस्ट सोशल मिळाल्यावर वायरल होताच लोकांनी या घटनेची सत्यता पडताळण्यासाठी एक दुसऱ्याला विचारपूस केली. दावा करण्यात आला की, हा बिबट्या मादी असून तो आपल्या पिल्लांना शोधण्यासाठी ☞(पान २ वर)

# अभ्यासासाठी वडील रागावल्याने घर सोडून गेली मुलगी

## भुसावळ स्टेशनवरून १४ वर्षीय मुलगी सुरक्षित ताब्यात

### नांदगाव पेठ पोलिसांची तत्परता

**अमरावती/प्रतिनिधीः-** अभ्यासाच्या कारणावरून वडिलांनी रागावल्याचा राग मनात धरून, घरातून कोणालाही न सांगता बॅग घेऊन निघून गेलेल्या १४ वर्षीय मुलीचा नांदगाव पेठ पोलिसांनी अवघ्या ३ तासांत शोध लावला आहे. पोलिसांनी अत्यंत वेगाने तपासाची चक्रे फिरवून या मुलीला भुसावळ रेल्वे स्टेशनवरून सुखरूप ताब्यात घेत तिच्या पालकांच्या स्वाधीन केले. ही घटना गुरुवार, २८ मे रोजी



रात्री घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री राहत्या घरी वडिलांनी अभ्यासाच्या कारणावरून १४ वर्षीय मुलीला रागावले होते. याचाच राग मनात धरून ती बालिका रात्री ८:१५ वाजताच्या सुमारास घरातून बॅग घेऊन निघून गेली. मुलगी घरात न दिसल्याने घाबरलेल्या पालकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र ती कुठेही मिळून आली नाही. अखेर हताश झालेल्या पालकांनी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. अल्पवयीन मुलगी बेपत्ता ☞(पान २ वर)

# वाढत्या उकाड्यात 'व्होल्टेज'चा फटका

## वडाळी, भोईपुरावासीय त्रस्त- महावितरणवर धडक!

**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसांपासून अमरावती शहर आणि जिल्ह्यात तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. या असह्य गर्मीत वडाळी परिसरातील भोईपुरा आणि मीनाताई ठाकरे शाळा परिसरामध्ये सतत व्होल्टेज कमी-जास्त होत असल्याने नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. या समस्येमुळे अनेक नागरिकांच्या घरातील टीव्ही, फ्रिज, एसी आणि पंखे यांसारखी महागडी विद्युत उपकरणे जळून खाक



झाली आहेत. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून परिसरात नवीन डीपी बसवून थ्री-फेज लाईन टाकण्याच्या मागणीसाठी आज, शुक्रवार २९ मे रोजी परिसरातील संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालयावर धडक दिली.

नवीन डीपी व फेज लाईन टाकण्याच्या मागणीसाठी परिसरातील नागरिकांनी आज शुक्रवार २९ मे रोजी महावितरण कार्यालयावर धडक दिली. अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सतत व्होलटेज कमी जास्त होत असल्याने परिसरातील नागरिक त्रस्त झाले ☞(पान २ वर)

# अचलपूर-परतवाड्यात 'चार्ली मोबाईल'ची एंट्री

ग्रामीण पोलिसांची आपत्कालीन प्रतिसाद क्षमता होणार अधिक मजबूत

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागरिकांना अधिक जलद, प्रभावी आणि तत्पर पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस दलात अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा चार नवीन 'चार्ली मोबाईल' पेट्रोलिंग दुचाकींचा समावेश करण्यात आला आहे. या वाहनांचे वितरण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

परतवाडा पोलीस स्टेशन येथे तीन तर अचलपूर येथे एक अशा एकूण चार दुचाकींचे वितरण करण्यात आले. या दुचाकींमध्ये बॉडी-वॉर्न कॅमेरा, सार्वजनिक सूचना प्रणाली, वॉकी-टॉकी, सायरन तसेच बीकन लाईट्ससारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे पोलिसांना अधिक प्रभावी संवाद साधणे, पारदर्शक कारवाई करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ घटनास्थळी पोहोचणे शक्य होणार आहे. ग्रामीण भागातील दाट वस्ती, संवेदनशील परिसर तसेच रात्रीच्या गस्तीसाठी या 'चार्ली मोबाईल'चा मोठा उपयोग होणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष गस्त, संशयास्पद हालचालींवर तात्काळ नियंत्रण, वाहतूक कोंडीच्या ठिकाणी जलद मदत तसेच आपत्कालीन कॉलवर अल्पावधीत प्रतिसाद देण्यास या वाहनांची मदत होणार असल्याचे पोलीस प्रशासनाने ☞(पान २ वर)

# धावत्या रेल्वे समोर तरुणाची आत्महत्या

## बडनेरा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात आज शुक्रवार २९ मे च्या दुपारी एका तरुणाने धावत्या रेल्वे समोर येऊन आत्महत्या केली. सुनील गणेश राव रोडगे (रा.मिलचाळ नवी वस्ती बडनेरा ) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार सुनील गणेशराव रोडगे याला गंभीर आजार होता. त्याला नेहमी वेदना व्हायच्या. यामुळे तो मानसिक तणावात गेलेला होता. त्याने शुक्रवारी दुपारी बडनेरा स्टेशनवर धावत्या ट्रेन समोर उडी घेतली. भरधाव ट्रेनच्या समोर आल्याने तो चिरडला गेला. स्टेशनवर त्याचा विक्षिप्त मृतदेह सापडला. यामुळे नागरिकांनी त्याची माहिती तात्काळ पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह ताब्यात घेत पोस्टमार्टम साठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. सुनील रोडगे गेल्या काही दिवसापासून गंभीर आजाराने ☞(पान २ वर)

# गाळ माफियांना अभय?

## परिवहन विभागाची कारवाई फक्त दिखावा!

### ओव्हरलोड वाहनांचा सुळसुळाट कायम

**अचलपूर/प्रतिनिधीः-** मेळघाट, अचलपूर, चिखलदरा व अंजनगाव परिसरातील तलावांमधून सुरू असलेल्या गाळ व गौणखनिजांच्या ओव्हरलोड वाहतुकीकडे प्रशासनाने अनेक दिवस डोळेझाक केल्याचा आरोप होत असतानाच, आता अचानक सुरू झालेली परिवहन विभागाची कारवाई संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मोठे गाळ माफिया मोकाट फिरत असताना कारवाई मात्र किरकोळ



वाहनधारकांवरच होत असल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे.

तलावांमधून दिवसाढवळ्या क्षमतेपेक्षा अधिक गाळ वाहून नेणारे ट्रक व ट्रॅक्टर रस्त्यावरून धावत असतानाही अनेकदा संबंधित विभागाचे अधिकारी मौन बाळगत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही वाहनांवर कारवाई करून प्रशासन स्वतःची पाठ थोपटून घेत असले, तरी प्रत्यक्षात अवैध वाहतुकीचे ☞(पान २ वर)